रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक १८० । पृष्ठे १० ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in




# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. ६ डिसेंबर २०२५
किंमत ४ ₹

## आज महापरिनिर्वाण दिन

रायगड : भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन शनिवारी (दि.६) आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी रायगड जिल्ह्यातील हजारोंच्या संख्येने अनुयायी दादर येथील चैत्यभूमीमध्ये दाखल झाले आहेत. भारतीय बौद्ध महासभेच्यावतीने समता सैनिक दल या ठिकाणी नेमण्यात आले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहा डिसेंबर १९५६ मध्ये महापरिनिर्वाण झाले. महामानवाच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या दादर येथील चैत्यभूमीमध्ये दरवर्षी महापरिनिर्वाण पान २ वर

# अलिबाग-रोहा रस्त्यावर 60 कोटींचा धुरळा?



- आमदार-ठेकेदाराची मिलीभगत जनतेच्या जीवावर
- धुळीतून प्रवास करण्याची प्रवाशांवर वेळ
- नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न होतोय गंभीर

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**राज्यात महायुतीतील भाजप-शिवसेना यांच्यात दररोज खटके उडत असताना, भ्रष्टाचारामध्ये मात्र या दोन्ही पक्षांची मिलीभगत असल्याची चर्चा आहे. परंतु, याचा त्रास सर्वसामान्य जनतेला भोगावा लागत असल्याचे चित्र अलिबाग-रोहा रस्त्यावरील उडणाऱ्या धुळीमुळे समोर आले आहे. या रस्त्यासाठी १७० कोटींचा निधी मंजूर असून, आतापर्यंत ६० कोटी खर्च करण्यात आल्याची चर्चा आहे. मग, एवढ्या पैशांची कामे झाली तरी कुठे? कारण, रस्त्यावरुन जाताना अद्याप जनतेला धुरळाच खावा लागत आहे. मग, हा पैसा स्वखर्चाने रस्ता तयार करुन देण्याचे फसवे आश्वासन देणारे आमदार आणि ठेकेदाराच्या घशात गेला की काय, असा प्रश्न सर्वसामान्य जनतेकडून विचारला जात आहे.**

> **अलिबाग-रोहा मार्गावरील रस्त्याचे काम सोमवारपासून सुरु केले जाणार आहे. मजबुतीकरण, डांबरीकरण, काँक्रिटीकरण या धर्तीवर हे काम केले जाणार आहे.**
> **– मोनिका धायतडक,** मुख्य कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

स्वखर्चाने रस्ता तयार करून देईन, असे आश्वासन आ. महेंद्र दळवी यांनी मागील निवडणुकीपूर्वी दिले होते. मात्र, हे आश्वासन फेल ठरल्याची चर्चा सध्या जोरात सुरू आहे. अलिबाग-रोहा मार्गावर ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांतून प्रवाशांना प्रवास करावा लागत आहे. पावसाळ्यात चिखल, खड्ड्यांतून आणि आता धुळीतून प्रवास करण्याची वेळ प्रवाशांवर आली आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. या रस्त्याचे काम अपुरेच असल्याने प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. फसवे आश्वासन देणाऱ्या आमदारांविरोधात पान २ वर



### भ्रष्टाचारासाठी भाजप, शिंदे गटात एकी?

अलिबाग-रोहा मार्गावरील रस्त्याच्या कामासाठी अहमदाबाद या कंपनीला ठेका देण्यात आला आहे. ही कंपनी काम करीत असली, तरीदेखील या कंपनीच्या पडद्यामागील सूत्रधार भाजपमधील एक बडा नेता असल्याची माहिती समोर येत आहे. त्यांच्या कृपेने कामे न होताच, ६० कोटींहून अधिक रक्कम काढण्यात आल्याची चर्चा सध्या सुरू आहे. महायुतीमधील शिंदे आणि भाजप यांच्यात कितीही राजकीय वाद असले, तरीदेखील भ्रष्टाचारासाठी दोघांची एकी कायमच असते, असे बोलले जात आहे. मात्र, यामध्ये सर्वसामान्यांच्या पैशांची लूट करुन त्यांची अक्षरशः फसवणूक होत असल्याची चर्चा जोर धरत आहे.

### रस्ता तात्काळ दुरुस्त करा

अलिबाग-रोहा रस्त्याची खड्ड्यांमुळे दुरवस्था झाली आहे. रस्ता रुंदीकरण होईल तेव्हा होईल. परंतु, त्याआधी रस्त्याची तात्काळ डांबरीकरण करुन डागडुजी करावी, अशी मागणी जनतेकडून करण्यात येत आहे. याबाबत संबंधित विभागाने कार्यवाही न केल्यास उग्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# अवजड वाहतूक सुसाट

## जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अपघात रोखण्याबरोबर, विद्यार्थी, नागरिक व पर्यटकांचा प्रवास सुखकर व्हावा, यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी मांडवा ते अलिबाग मार्गावर अवजड वाहनांना वाहतुकीसाठी अटी-शर्तींवर बंदी घालण्यात आली. मात्र, जिल्हाधिकारी यांचे आदेश झुगारून या मार्गावरून अवजड वाहतूक सुसाट सुरू असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. मात्र, त्यांच्याविरोधात कारवाई होत नसल्याचा आरोप आहे. अवजड वाहनांना अभय का दिले जात आहे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



मांडवा येथे रोरो जेटीसह अन्य प्रवासी जलवाहतूक सेवा सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे मुंबईकडून अलिबागला येणारे व अलिबागवरून मुंबईकडे जाणाऱ्यांची संख्या वाढली आहे. रायगड हा पर्यटन जिल्हा असल्याने अलिबाग, मांडवा, किहीम, आक्षी, नागाव येथे मोठ्या प्रमाणात पर्यटक आपली वाहने घेऊन येत असतात. अलिबाग ते मांडव्याला वाहनांची वर्दळ वाढल्याने वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमच भेडसावत आहे. चोंढी व इतर ठिकाणी वाहतूक कोंडीचा सामना प्रवाशांसह विद्यार्थी व पर्यटकांना करावा लागत आहे. वाहतूक कोंडी सोडविताना प्रवाशांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. आजारी रुग्णांना घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिका या वाहतूक कोंडीमध्ये अडकून पडल्याने रुग्णाच्या जीवितास धोका संभावू शकतो.

अपघात कमी होण्यासाठी तसेच स्थानिक नागरिक, विद्यार्थी व पर्यटक यांचा प्रवास सुखकर होण्याच्या दृष्टीकोनातून उपाययोजना म्हणून जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी मांडवा जेट्टी ते अलिबाग या मार्गावर अवजड वाहनांना वाहतूक बंदी अधिसूचना जारी केली. दररोज सकाळी आठ ते दुपारी बारा तसेच सायंकाळी पान २ वर

## आंबा घाटात बसला अपघात

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

संगमेश्वर तालुक्यातील रत्नागिरीनागपूरमहामार्गावरीलआंबा घाटातील चक्री वळणाजवळील दरीत खासगी प्रवासी बस कोसळून अपघात झाल्याची घटना शुक्रवार, दि. ५ डिसेंबर रोजी पहाटे अंदाजे साडेचार वाजण्याच्या सुमारास घडली.मिळालेल्या माहितीनुसार, १ डिसेंबर रोजी नेपाळ येथून नि ११० महिला-पुरुष प्रवाशांना घेऊन निघालेली खासगी बस एमपी १३ पी १३७१ शुक्रवारी पहाटे आंबा घतातील चक्रीवळणाजवळ आली असता चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने सुमारे पन्नास फूट दरीत कोसळून झालेल्या अपघातात ३७ प्रवासी जखमी झाले असून, त्यातील आठ जण गंभीर जखमी आहेत. अपघाताचे वृत्त कळताच उपविभागीय पोलीस अधिकारी लांजा सुरेश कदम यांनी घटनास्थळी धाव घेत मदत केली.

## मिथेनॉल केमिकलचा टँकर पलटी



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग-पोयनाड रस्त्याच्या बाजूला मिथेनॉलने भरलेला टँकर शुक्रवारी दुपारी पलटी झाला. यावेळी मिथेनॉलची गळती झाली होती. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, टँकर पलटी झाल्याने चालक जखमी झाला आहे. चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मिथेनॉल या केमिकलने भरलेला टँकर मुंबईकडून अलिबागकडील थळ येथील आरसीएफ कंपनीमध्ये निघाला. अलिबाग-पेण मार्गावरून थळकडे येत असताना शुक्रवारी दुपारी मैनुशेठ वाडा येथे आल्यावर चालकाचा गाडीवरील ताबा सुटला. त्यामुळे टँकर रस्त्याच्या बाजूला पलटी झाला. यावेळी मिथेनॉलची गळती होऊ लागली. पान २ वर

## वेधक

### शस्त्रतस्करी प्रकरणात दोघांना अटक

**शेखपुरा :** बिहारमधील शस्त्र तस्करी प्रकरणात एनआयएनं राज्यातील तीन जिल्ह्यांमधील सात ठिकाणी जवळपास १२ तास छापे टाकले. या छाप्यात दोन संशयितांना अटक करण्यात आली. ही कारवाई ४ डिसेंबरला करण्यात आल्याची माहिती एनआयएनं दिली. एनआयएच्या म्हणण्यानुसार, बिहार, हरियाणा आणि उत्तर प्रदेश या तीन राज्यांमधील २२ ठिकाणी छापे टाकल्यानंतर गुरुवारी शस्त्रास्त्रं आणि दारूगोळा तस्करी प्रकरणात चार आरोपींना अटक करण्यात आली. बिहारमधील नालंदा, शेखपुरा आणि पाटणा जिल्ह्यातील सात ठिकाणी एनआयएच्या २२ पथकांनी छापे टाकत कारवाई केली.

### अनिल अंबानींची मालमत्ता जप्त

**मुंबई :** रिलायन्स अनिल अंबानी समूहाशी संबंधित बँक फसवणूक प्रकरणात ईडीने शुक्रवारी कारवाई केली आहे. याअंतर्गत १८ हून अधिक मालमत्ता, मुदत ठेवी, बँक बॅलन्स आणि न उद्धृत गुंतवणुकीतील शेअर्स तात्पुरते जप्त केले आहेत. जप्त केलेल्या मालमत्तेचे एकूण मूल्य अंदाजे १ हजार १२० कोटी रुपये इतके आहे. ही कारवाई रिलायन्स होम फायनान्स लिमिटेड, रिलायन्स कमर्शियल फायनान्स लिमिटेड आणि येस बँक फसवणूक प्रकरणांशी संबंधित आहे.

## राज्यपाल नियुक्त १२ आमदारांची याचिका उच्च न्यायालयाकडे

- कोल्हापूर सर्किट बेंचच्या न्यायमूर्तींनी दिले आदेश
- दोन आठवड्यात न्यायालयात प्रकरण वर्ग होणार

**। कोल्हापूर । प्रतिनिधी ।**

राज्यपाल नियुक्त १२ आमदारांची याचिका मुंबई उच्च न्यायालयाकडे वर्ग करा, असे आदेश कोल्हापूर सर्किट बेंचचे न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांनी गुरुवारी दिले. कोल्हापूर सर्किट बेंचमध्ये न्यायमूर्ती कर्णिक यांच्या बेंचसमोर राज्यपाल नियुक्त १२ आमदारांसंदर्भातील याचिकेची सुनावणी झाली.

सुनावणीदरम्यान, याचिकाकर्ते सुनील मोदी यांच्यावतीने ॲड. संग्राम भोसले यांनी राज्यघटनेच्या कलम १७३ (जी) नुसार १४ ऑक्टोबर२०२४रोजीराज्यपालांनी सात व्यक्तींची केलेली नियुक्ती बेकायदेशीर असल्याचा मुद्दा उपस्थित केला. यावर न्यायमूर्ती कर्णिक यांनी हा वाद केवळ कोल्हापूर बेंचपुरता मर्यादित नसून, महाराष्ट्रासाठी अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. त्यामुळे ही याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या प्रिन्सिपल बेंचसमोर सुनावली जाणे आवश्यक असल्याचे निरीक्षण नोंदवले. या अनुषंगाने दोन आठवड्यांत प्रकरण मुंबई उच्च न्यायालयाकडे वर्ग करण्याचे आदेश त्यांनी दिले. त्यामुळे ही याचिका पान २ वर

## सहकारी सेवा संस्थांच्या निवडणुका स्थगित

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुका ज्या टप्प्यावर असतील, त्या टप्प्यावर स्थगित करून पुढे ढकलण्याचे आदेश शासनाने काढले आहेत. पुढील आदेश येईपर्यंत अ आणि ब वर्गातील सहकारी संस्थेच्या निवडणुका पुढे ढकलल्या आहेत. शुक्रवारी अर्ज माघारी घेण्याचा शेवटचा दिवस असताना आदेश काढण्यात आला आहे. निवडणुकांची तयारी झाली असताना पुढे ढकलल्याने राजकीय पदाधिकारी नाराज झाले आहेत. मात्र, क आणि ड वर्गातील म्हणजेच गृहनिर्माण संस्थांच्या निवडणुका होणार आहेत.

# नगरपालिकांचा निकाल ठरल्यावेळीच!

## २१ डिसेंबरला होणार मतमोजणी; सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी ।**

राज्यात २ डिसेंबरला झालेल्या नगरपरिषद आणि नगरपंचायतीचा निकाल २१ डिसेंबरलाच लागणार आहे. नागपूर खंडपीठाने ३ डिसेंबरचा निकाल पुढे ढकलण्याचा निर्णय दिला होता. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. त्यानंतर शुक्रवारी याबाबत सुनावणी झाली. त्यानंतर न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवत २१ डिसेंबरलाच मतमोजणी करण्याचा निर्णय दिला आहे. त्यामुळे निवडणूक लढवलेल्या उमेदवारांना २१ डिसेंबरपर्यंत निकालाची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

### आदेशात काय?

कुठल्याही परिस्थितीत ३१ जानेवारीनंतर या निवडणुका पुढे ढकलल्या जाऊ नयेत. त्याला कुठल्याही उच्च न्यायालयाचा आदेश जबाबदार असता कामा नये. विहित मुदतीत निवडणुका झाल्या पाहिजेत, हे भान उच्च न्यायालयाने ठेवावे, असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

शुक्रवारी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने ३१ जानेवारी २०२६ पूर्वी निवडणुका झाल्या पाहिजेत, याचा पुन्हा उल्लेख केला. ठरलेल्या वेळेत निवडणूक कशी होईल ते पाहावे, असे सरन्यायाधीशांनी निवडणूक आयोगाला म्हटले आहे. नागपूर खंडपीठाने दिलेल्या निर्णयाला काही जणांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. २१ डिसेंबरला मतमोजणी करण्याऐवजी ती लवकर व्हावी, अशी मागणी त्यांनी याचिकेत केली होती. त्यावर सुनावणीवेळी २ डिसेंबरला मतदान झाले त्याची २१ डिसेंबरला मतमोजणी ठेवली आहे.

२० तारखेला ज्या निवडणुका व्हायच्या आहेत. त्या काही कारणास्तव निवडणूक आयोगाने पुढे ढकलल्या तरी २१ डिसेंबरलाच मतमोजणी झाली पाहिजे, असं न्यायालयाने म्हटले आहे. त्याशिवाय महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारीपर्यंत पूर्ण कराव्यात, असे निर्देश न्यायालयाने निवडणूक आयोगाला दिले आहेत. पान २ वर

## दिल्लीतून इंडिगोची सर्व विमाने रद्द

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे इंडिगो एअरलाइन्स कंपनी अडचणीत सापडली आहे. इंडिगोने शुक्रवारीही (५ डिसेंबर) देशभरातील शकडो विमान उड्डाणं रद्द केली आहेत. दिल्ली विमानतळावरील इंडिगोची सर्व उड्डाणं रद्द करण्यात आली आहेत. त्यामुळे विविध विमानतळांवर मोठ्या प्रमाणात प्रवाशांच्या प्रवासावर परिणाम झाला आहे. याआधीही इंडिगोची ५०० हून अधिक उड्डाणं रद्द करण्यात आली होती.

विमानतळ अधिकाऱ्यांनी सांगितलं की, आज मध्यरात्री ११.५९ वाजेपर्यंत एअरलाइनची सर्व उड्डाणं रद्द राहतील. या समस्येचं निराकरण करण्यासाठी ग्राऊंड टीम सर्व पान २ वर

## दिघी पोर्टवरून दरवर्षी दोन लाख वाहनांची निर्यात होणार | ग्राहकांना होणार थेट फायदा

# रायगड बनणार ऑटोमोबाईल निर्यात केंद्र

**। रायगड । प्रतिनिधी ।**

मदरसनने आपल्या संयुक्त उपक्रम कंपनी 'समवर्धन मदरसन हामाक्युरेक्स इंजिनिअर्ड लॉजिस्टिक्स लिमिटेड' (एसएएमआरएक्स) मार्फत शुक्रवारी दिघी पोर्ट लिमिटेड (डीपीएल) सोबत भागीदारी जाहीर केली आहे. डीपीएल ही अदानी पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन लिमिटेड (एपीएसईझेड)ची उपकंपनी आहे. या करारानुसार महाराष्ट्रातील दिघी पोर्टवर वाहन निर्यातीसाठी एक विशेष सुविधा उभारली जाणार आहे. या धोरणात्मक भागीदारीमुळे




मुंबई-पुणे ऑटो बेल्टमधील वाहन उत्पादकांसाठी दिघी पोर्ट हे महत्त्वाचा ऑटोमोबाईल निर्यात केंद्र बनेल. एपीएसईझेडच्या १५ महत्त्वाच्या बंदरांपैकी एक असलेले दिघी पोर्ट आता 'मेक इन इंडिया' उपक्रमाखाली भारताच्या वाढत्या ऑटोमोबाईल उद्योगाला समर्थन देण्यासाठी आपली क्षमता वाढवली आहे. ज्यामुळे जागतिक बाजारात वाहनांची निर्यात आणि आयात अधिक सुरळीत होईल.

या भागीदारीबद्दल बोलताना अदानी पोर्ट्स आणि सेझचे सीईओ आणि पूर्णवेळ संचालक अश्वनी गुप्ता म्हणाले, ''दिघी पोर्टवरील मदरसनसोबतची ही भागीदारी भारतातील ऑटोमोबाईल लॉजिस्टिक्समध्ये मोठा बदल घडवून आणेल. एपीएसईझेडचे मजबूत पायाभूत नेटवर्क आणि मदरसनचे अनुभव एकत्र येऊन देशभरात वाहन वाहतुकीसाठी एक सुरळीत आणि मजबूत व्यवस्था तयार होईल. हा रोरो टर्मिनल केवळ व्यापार वाढवणार नाही, तर पुरवठा साखळी अधिक कार्यक्षम करेल आणि ग्राहक व स्थानिक समुदायांना दीर्घकालीन फायदा देईल.''

भागीदारीबाबत भाष्य करताना, मदरसन ग्रुपचे व्हाइस चेअरमन लक्ष वामन सेहगल म्हणाले, ''एपीएसईझेड सोबतची ही भागीदारी आमच्या जागतिक दर्जाच्या लॉजिस्टिक सेवांचा विस्तार करण्यासाठी खूप महत्त्वाची आहे. दिघी पोर्टवर हा रोरो टर्मिनल विकसित करून आम्ही आमच्या सेवांचा विस्तार करत आहोत आणि आमच्या ओईएम भागीदारांसाठी कार्यक्षमता वाढवणारा आणि खर्च कमी करणारा एक महत्त्वाचा सुविधा प्रकल्प उभारत आहोत. या सहकार्यामुळे भारताची ऑटोमोबाईल पुरवठा साखळी आणखी मजबूत होईल आणि ग्राहकांना थेट पान २ वर

# गृह, वाहन कर्ज कमी होणार

## रिझर्व्ह बँकेने रेपो रेट ०.२५ टक्क्यांनी घटवला

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय रिझर्व्ह बँकेने मोठा निर्णय घेतला असून, व्याजदरात मोठी कपात करण्यात आली आहे. गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी रेपो दरात ०.२५ टक्क्यांची कपात जाहीर केली आहे. आरबीआयनं रेपो रेटमध्ये केलेल्या कपातीमुळे गृहकर्ज आणि वाहन कर्जाच्या ईएमआयचा भार कमी होणार आहे. महागाई दर सातत्यानं कमी आणि आर्थिक विकास दरात चांगली वृद्धी होत असल्यानं आरबीआयनं व्याजदर घटवल्याचं सांगितलं जात आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीने शुक्रवारी नवे पतधोरण जाहीर करताना रेपो रेटमध्ये कपात करण्याची घोषणा केली. त्यानुसार रेपो रेटमध्ये ०.२५ टक्क्यांची कपात करण्यात आली आहे. त्यामुळे रेपो रेट आता ५.२५ टक्क्यांच्या पातळीवर येऊन पोहोचला आहे. रेपो रेटमध्ये ०.२५ टक्क्यांची कपात करण्याचा रिझर्व्ह बँकेचा हा निर्णय सर्वसामान्य ग्राहकांसाठी मोठा दिलासा मानला जात आहे. रेपो रेटमध्ये कपात झाल्याने आता सरकारी आणि खासगी बँकांकडून गृहकर्ज, वाहन कर्ज आणि वैयक्तिक कर्जाच्या दरात कपात केली जाऊ शकते. त्यामुळे सामान्य लोकांचा गृहकर्जाचा आणि वाहन कर्जाच्या मासिक हप्त्याची अर्थात ईएमआयची रक्कम घटण्याची दाट शक्यता आहे. यामुळे सामान्य ग्राहकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. पान २ वर

# एड्स जनजागृतीसाठी बाईक रॅली



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

जागतिक एड्स नियंत्रण दिन व पंधरवडा जनजागृती कार्यक्रमाच्या अनुषंगाने युवकांमध्ये एचआयव्ही/एड्सविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी अलिबाग येथे भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले. अलिबाग समुद्रकिनारा कमानी परिसरातून अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी-घुगे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीला सुरुवात झाली.

रॅलीचे आयोजन महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी अंतर्गत जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबागमार्फत करण्यात आले. यावेळी निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य) डॉ. किरण शिंदे, प्रशासकीय अधिकारी डॉ. प्रवीण कंदाडे, एचओडी पीसीएम नाझिया, एचओडी एसएमटी डॉ. साक्षी पाटील, दालसा मुख्य ॲड. सी.सी. कामथे, लायन्स क्लब श्रीबाग सेन्टिनियलच्या अध्यक्षा निहा घरत, ॲड. निहा राऊत, ॲड. अंकित बंगेरा आदी मान्यवर उपस्थित होते.

रॅलीदरम्यान 'अडथळ्यांवर मात करू, एकजुटीने एड्सला लढा देऊ', 'वचन पाळा, एड्स टाळा', 'स्त्रीशक्तीचा एकच नाराएचआयव्ही/एड्स हद्दपार करा' अशा घोषणांद्वारे जनजागृती करण्यात आली. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, होमिओपॅथिककॉलेज व नर्सिंग स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग नोंदवला. महावीर चौक शिवाजी पुतळा बालाजी नाका, मारूती रोडमार्गे रॅली पुन्हा समुद्रकिनारी दाखल झाली.

आयसीटीसी इंटेंसिफाइड आयईसी कॅम्पेनमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रथम क्रमांक उपजिल्हा रुग्णालय रोहा समुपदेशक महेश गोसावी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ मंगेश पाटील, द्वितीय क्रमांक उपजिल्हा रुग्णालय माणगाव समुपदेशक प्रिया निवाते, प्रयोगशाळा तंत्रज्ञ आरती राजपूत. तृतीय क्रमांक जिल्हा रुग्णालय अलिबाग आयसीटीसी ०१ समुपदेशक अर्चना जाधव, प्रयोगशाळा तंत्रज्ञ सुजाता तुळपुळे, डीएसआरसी समुपदेशक अश्विनी कदम, मोबाईल आयसीटीसी व्हॅनचे प्रयोगशाळा तंत्रज्ञ गणेश सुतार, वाहनचालक अतिश नाईक, क्लिनर रुपेश पाटील यांना विशेष कामगिरीबद्दल गौरविण्यात आले. लोकपरिषद पनवेल, महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्ट पेण, आधार ट्रस्ट पनवेल या स्वयंसेवी संस्थांनाही प्रमाणपत्र देण्यात आले. इंडेक्स टेस्टिंगमध्ये उत्कृष्ट कामगिरीबद्दल रिलायन्स हॉस्पिटल, लोधिवलीचा गौरव करण्यात आला.

रॅली यशस्वी करण्यासाठी जिल्हास्तरीय अधिकारी, हेमकांत सोनार, आयसीटीसी समुपदेशक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, नर्सिंग ऑफिसर व एनजीओ प्रतिनिधींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे स्वागत जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक संजय माने यांनी केले, तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन जिल्हा सहाय्यक एम अँड ई रश्मी सुंकले यांनी केले.

# पनवेलमध्ये दिव्यांग जनजागृती रॅली

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेलमध्ये दिव्यांग जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी विद्यार्थ्यांना पनवेल शहर वाहतूक शाखेतर्फे खाऊचे वाटप करण्यात आले. नवीन पनवेल विभागामध्ये रोटरी क्लब आयोजित दिव्यांग जनजागृती रॅलीसाठी सहभागी मुला-मुलींना प्रोत्साहन म्हणून पनवेल शहर वाहतूक शाखेतील वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांच्या सहकार्याने आदई सर्कल नवीन पनवेल या ठिकाणी दिव्यांग रॅली आल्यानंतर ५० ते ६० दिव्यांग मुलांसाठी कॅडबरी व पाण्याच्या बाटल्या वाटप करण्यात आल्या. या उपक्रमामुळे दिव्यांग मुलांमध्ये उत्साह, आपुलकीची भावना निर्माण झाला असून, हा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद आहे.




# गरजूंसाठी फिरता दवाखान्याचे उद्घाटन

**। पाली । प्रतिनिधी ।**

सुधागड पाली लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट व लँडमार्क केअर्स यांच्या सौजन्याने फिरता दवाखाना युनिटचे उद्घाटन दि. २७ नोव्हेंबर रोजी पाली येथे करण्यात आले. या युनिटमार्फत सुधागड पाली तालुक्यातील दुर्गम भागातील गरजू लोकांसाठी त्यांच्या दारी जाऊन आरोग्य सेवा देण्यासाठी कार्य करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख पाहुणे डॉ. दिपाली देशमुख राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, वैभव सावंत लँडमार्क, व्यवस्थापक उपस्थित होते. कार्यक्रासाठी गौतम कनोजे मुख्य व्यवस्थापक, जागृती विभाग डॉ. गीतांजली, राव हजारे सहाय्यक व्यवस्थापक, हेल्थकेअर वर्टिकल डॉ. तुषार, वैद्यकीय अधिकारी सुधागड कन्हैया सोमणे, सहाय्यक व्यवस्थापक पर्यावरण संवर्धन प्रकल्प विकास धुमाळ, अकाऊंटंट तालुका हेल्थ ऑफिस, सामाजिक कार्यकर्ते श्री. दपके, अमित निंबाळकर, दिनेश इंगळे, पंकज माने, मार्कस गायकवाड, राहुल ठोंबरे, मंगेश निरगुडे उपस्थित होते.

# कर्जतमध्ये दत्तजयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात गुरुदत्त जयंतीनिमित्त विविध दत्त मंदिरात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भक्तांनीदेखील दर्शनासाठी मंदिरांमध्ये गर्दी केली होती.



दत्त जयंतीचा उत्साह कर्जत तालुक्यात पाहायला मिळाला. तालुक्यात अनेक ठिकाणी दत्त मंदिर असून, त्या ठिकाणी अखंड हरिनाम सोहळ्याचे आयोजन केले होते. कर्जत तालुक्यात नेरळ येथील चिंचआळीमधील गुरुदत्त मंदिरात तीन दिवसांपासून हरिनाम सोहळा सुरू असून, गुरुवारी दत्त जन्मोत्सव साजरा झाला. नेरळ गावातील मोहाची वाडी येथेदेखील भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. वाकस येथील स्वयंभू गणेश मंदिर आणि दत्त मंदिराचा वर्धापन दिन सोहळा साजरा झाला. अवसरे येथे असलेल्या श्री स्वामी समर्थ मठामध्ये भाविकांनी सकाळपासून गर्दी केली होती.तेथे संगीताचे आणि धार्मिक कार्यक्रम सुरू होते. कळंब येथे असलेले प्रतिगाणगापूर येथील दत्त मंदिरात भक्तांनी अलोट गर्दी केली होती. या ठिकाणी पुणे आणि ठाणे जिल्ह्यातून शेकडो भाविक दर्शनासाठी येत असतात. वारे येथील साई मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. तर कशेळे येथील दत्त मंदिरात धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल होती. पळसदरी येथील अक्कलकोट स्वामी समर्थांचे वास्तव्य लाभलेल्या स्वामी समर्थ मठामध्ये भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. तर, चिंचवली येथील दत्त मंदिरात स्थानिक तसेच पनवेल आणि ठाणे जिल्ह्यातील भाविकांनी गर्दी केली होती.

# कारच्या धडकेत मोटारसायकलस्वार ठार

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी।**

चार चाकी वाहनाने भरधाव वेगाने येऊन टीव्हीएस ज्युपिटरला धडक दिली. झालेल्या अपघातात प्रमोद प्रकाश पाटील (३५, रा. किरवली, तळोजा) याचा मृत्यू झाला. या अपघातप्रकरणी अनोळखी कारचालकाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात एक डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

किरवली येथील प्रमोद पाटील हा ३० नोव्हेंबर रोजी मोटरसायकल क्रमांक एमएच ४६ सीक्यू २३ ७३ या टीव्हीएस ज्युपिटरवरून मुंब्रा-पनवेल महामार्गावरून किरवली गावाच्या कमानीतून गावामध्ये जात होता. शिवम ट्रान्सपोर्ट ऑफिससमोर आला असता समोरून आलेल्या कारने भरधाव वेगाने येऊन त्याच्या टीव्हीएस ज्युपिटरला धडक दिली.

या अपघातात प्रमोद पाटील यांच्या डोक्याला आणि छातीला गंभीर जखमा झाल्या. त्यानंतर कारचालक पळून गेला. अपघातात प्रमोद पाटील यांचा मृत्यू झाला.

# ... तरी जाहीर सभा होणारच!

## ■ धारावी बचाव आंदोलन समितीचा इशारा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

धारावीतील झोपडीधारकांना धारावीतून हुसकावून लावण्याचा सरकारचा डाव आहे. अदानीला याठिकाणी विस्तारित बीकेसी-२ करायची आहे. हे आत्ता स्पष्ट झाले आहे. याविरोधात सात डिसेंबर रोजी जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. सभेची पत्रके वाटणाऱ्या कार्यकर्त्यांना पोलिसांकडून धक्काबुक्की-शिवीगाळ, गुन्हे दाखल करून अटक करण्याची धमकी देण्यात आली आहे. पोलिसांच्या उपस्थितीत मनपा कर्मचाऱ्यांनी सभेच्या प्रचाराचे होर्डिंग फाडून उतरवले. परंतु, कितीत मुस्कटदाबी केली तरी जाहीर सभा होणारच असा इशारा देण्यात आला आहे.

धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी अद्यापपर्यंत चार ठिकाणी झोपडीधारकांच्या पात्रता याद्या म्हणजे परिशिष्ट-२ जाहीर झाले आहेत. मेघवाडी-गणेश नगर, सरदार वल्लभभाई पटेल नगर, टिळक नगर आणि राजीव गांधी नगर या त्या वस्त्या आहेत. या सर्व ठिकाणी साधारणपणे ८० ते ८५ टक्के लोक अपात्र करण्यात आलेले आहेत आणि १५ ते २० टक्के लोक पात्र ठरवले आहेत. राजीव गांधी नगरमध्ये तर १२१ लोकांच्या पात्रता यादीमध्ये केवळ दोन लोक पात्र झालेले आहेत आणि ११९ लोक जे आहेत, ते अपात्र आणि अनिर्णित आहेत. गणेश नगर मेघवाडीतील लोकांना डीआरपीकडून सात दिवसात घरे रिकामी करण्याच्या नोटीसा आल्या आहेत. सात दिवसांत घरे रिकामी न केल्यास बळाचा वापर करून येथील झोपड्या निष्कासित करून, मोकळी केलेली जमीन अदानीच्या ताब्यात दिली जाईल, अशी धमकीही या नोटिशीत दिली आहे. धारावीतील झोपडीधारकांना धारावीतून हुसकावून लावण्याचा सरकारचा डाव या सर्व घटनांनी उघड केला आहे. अदानीला याठिकाणी विस्तारित बीकेसी-२ करायची आहे. हे आत्ता स्पष्ट झाले आहे.

धारावी बचाव आंदोलनाने याविरोधात, कामराज हायस्कूल शेजारी, ९० फूट रोड, धारावी याठिकाणी, ७ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता एका जाहीर सभेचे आयोजन केले आहे. या जाहीर सभेचा प्रचार आंदोलनाचे कार्यकर्ते करत आहेत आणि जनतेमधून त्याला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. परंतु जे कार्यकर्ते पत्रक वाटायला जात आहेत त्यांना पोलीस अडवत आहेत. त्यांच्याकडून पत्रके हिसकावून घेत आहेत, त्यांना तुरुंगात टाकण्याची धमकी देत आहेत व शिवीगाळ करत आहेत. या सभेच्या प्रचारासाठी म्हणून जे होर्डिंग आम्ही धारावी बचाव आंदोलन व भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने धारावीतल्या नाक्या नाक्यावर लावण्यात आले होते, ते बॅनरही आज पोलिसांनी आणि पालिकेने एकत्र येऊन काढून टाकले. ही जी मुस्कटदाबी चालू आहे ती पोलिसांकरवी, अदानीच्या व भारतीय जनता पक्षाच्या इशाऱ्यावर चाललेली आहे.

आम्ही त्याचा तीव्र निषेध करत आहोत आणि अदानी-सरकारला इशारा देत आहोत की, कितीही मुस्कटदाबी केली तरी सभा होणारच. अदानीच्या दादागिरीला आम्ही भीक घालणार नाही. धारावीकरांना उद्ध्वस्त करणारा, अदानीच्या एकतर्फी फायद्याचा प्रकल्प आम्ही होऊ देणार नाही, असा इशारा माजी आ. बाबुराव माने, धारावी बचाव आंदोलनाचे निमंत्रक ॲड. राजेंद्र कोरडे यांनी दिला आहे.

# रसायनीत दत्तजयंती उत्साहात

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनी परिसरातील मोहोपाडा, नवीन पोसरी, आळी आंबिवली, रसायनी पोलीस ठाणे तसेच आसपासच्या परिसरात दत्त जयंती साजरी करण्यात आली. सकाळपासून भाविकांची मोठी गर्दी दर्शनासाठी ओसंडून वाहात होती. मंदिर फुलांनी, रांगोळ्यांनी सजवण्यात आले होते आणि दर्शनासाठी सुव्यवस्थित रांगेतून भक्त शांतपणे पुढे सरकत होते.

महापूजेनंतर भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. सकाळच्या दर्शनानंतर प्रसाद वितरणाचे उत्तम नियोजन दिसून आले. मंदिर परिसरात सतत भाविकांची वर्दळ असूनही पोलीस अधिकारी व कर्मचारी वर्गाने संपूर्ण व्यवस्थापन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने सांभाळले.

सायंकाळी व रात्री भाविकांसाठी महाप्रसादाची (भोजनाची) सुंदर व्यवस्था करण्यात आली होती. नागरिकांनी या उत्तम व्यवस्थापनाबद्दल आणि भक्तिभावाने भरलेल्या आयोजनाबद्दल मोहोपाडा ग्रामस्थ, नवीन पोसरी ग्रामस्थ, आळी आंबिवली ग्रामस्थांसह रसायनी पोलीस ठाण्याचे मनापासून आभार मानले. मोहोपाड्यात दिवसभर विविध सांस्कृतिक कार्यक्रमात हरिपाठ, प्रवचन, संगीत भजन,



कीर्तन आदी कार्यक्रम पार पडले. तर रात्री नऊ वाजता दत्त मंदिरातून पालखी मिरवणूक मोहोपाडा तलाव येथून मरिआई मंदिर ते पुन्हा दत्त मंदिर, अशी पालखी मिरवणूक काढण्यात आली. ठिकठीकाणी महिलांनी दत्तगुरुंची ओवाळणी करुन आशीर्वाद घेतले.

पान १ वरून

## आज महापरिनिर्वाण दिन

दिन साजरा केला जातो. याही वर्षी महापरिनिर्वाण दिन साजरा केला जाणार आहे. महामानवाला अभिवादन करण्यासाठी रायगड जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने आनुयायी दादर येथे दाखल झाले आहेत. काही मंडळी आदल्या दिवशी दाखल झाले आहेत. तर, काही मंडळी शनिवारी सकाळी निघणार आहेत. त्यामुळे चैत्यभूमीवर अलोट गर्दी होणार आहे. भीम अनुयायींची गैरसोय होऊ नये, म्हणून भारतीय बौद्ध महासभेच्यावतीने पाण्यासह अन्य सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सर्वांना दर्शन घेता यावे, यासाठी योग्य पद्धतीने नियोजन करण्यात आले असल्याची माहिती देण्यात आली आहे.

## ६० कोटींचा धुरळा?

नाराजी व्यक्त केली जात आहे.

अलिबाग ते माणगावमधील साईपर्यंत ८४ किलोमीटरचा रस्ता हॅम योजनेंतर्गत मंजूर झाला. 'बांधा, वापरा आणि हस्तांतरण करा' या धर्तीवर रस्त्याचे काम करण्यात आले. एका कंपनीला कामही देण्यात आले. परंतु, परवडत नसल्याने सांगून त्या कंपनीने काम अर्धवट टाकून दिले. त्यामुळे गेली अनेक महिने या रस्त्याचे काम रखडले होते. विद्यमान आमदार दळवी यांनी अनेक वेळा नारळफोडीचा कार्यक्रम राबविला. मात्र, त्या रस्त्याच्या कामाला काही मुहूर्त लागला नाही. अखेर गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर रस्त्याचे काम सुरू झाले. मात्र, त्यावरूनही शिंदे गट आणि भाजपमध्ये श्रेयवाद सुरू होता. आता शिंदे गटातील आणि पूर्वीचे भाजपचे दिलीप भोईर आणि दळवी यांच्यामध्ये घणाघाती वाक्‌युद्ध सुरू झाले होते. दरम्यान, वेलवली-खानाव, खानावपर्यंत काँक्रिटीकरण करण्यात आले.

हॅममधून मंजूर होऊन अपूर्णावस्थेत असणारा अलिबाग-रोहा रस्ता आता खड्ड्यांमुळे जाम झाला आहे. खानाव ते सुडकोली हा प्रवास अपघाताला निमंत्रण देणारा ठरत आहे. खास करून नांगरवाडी ते भागवाडीमधील खिंडीची अवस्था दयनीय झाली आहे. अपघात होण्याची भीती निर्माण झाली आहे. अलिबागपासून रोहा साईपर्यंत ८४ किलोमीटरच्या रस्त्यासाठी १७७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या रस्त्याचे ५० टक्के काम पूर्ण झाल्याचा दावा बांधकाम विभागाकडून केला जात आहे. यासाठी ६० कोटींहून अधिक रुपये खर्च झाल्याची माहिती समोर येत आहे. परंतु, अलिबाग-रोहा मार्गावरील सुडकोलीपासून अलिबागपर्यंतच्या रस्त्याची अवस्था बिकट झाली आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून रस्ता खड्डेमय आहे. आता धुळीचे कण नाका-तोंडात जात आहेत. खड्डे चुकविताना अपघात होण्याची भीती निर्माण झाली आहे.

विद्यमान आमदारांनी अनेक वेळा या रस्त्याच्या कामाचे भूमीपूजन केले. त्याला सहा वर्षे होत आली आहेत. परंतु, या कालावधीत हा रस्ता पूर्ण करण्यास आमदार अपयशी ठरल्याची चर्चा सुरू आहे. अलिबाग-सुडकोली मार्गावरील प्रवाशांना प्रचंड त्रास होत आहे. अनेक वेळा एसटी बसेसदेखील या रस्त्यावर नादुरुस्त होत आहेत. विद्यमान आमदारांनी चांगल्या रस्त्याचे दाखवलेले स्वप्न पूर्णतः भंगले आहे.

## राज्यपाल नियुक्त १२ आमदारांची याचिका उच्च न्यायालयाकडे

आता मुख्य न्यायाधीश यांच्या बेंचसमोर सुनावणीसाठी ठेवली जाणार आहे.

२०१९ मध्ये महाविकास आघाडीचे सरकार असताना तत्कालीन सरकारने तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडे १२ राज्यपाल नियुक्त आमदारांची यादी पाठवली होती. मात्र, त्यावर कोश्यारी यांनी कोणताच निर्णय घेतला नाही. त्यानंतर सत्तांतर होऊन एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले. त्यांच्या काळात राज्यपाल नियुक्त सदस्यांसाठी ७ नावे पाठवण्यात आली. त्याला तत्कालीन राज्यपालांनी मंजुरी दिली. या निर्णयाविरोधात सुनील मोदी यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. मोदी स्वत: कोल्हापूरचे असल्याने त्यांनी ही याचिका कोल्हापूर सर्किट बेंचमध्ये वर्ग करण्याची विनंती केली. ती मान्य झाल्याने आमदारांच्या याचिकेवर गुरुवारी कोल्हापूर सर्किट बेंचमध्ये सुनावणी झाली.

## रायगड बनणार ऑटोमोबाईल निर्यात केंद्र

फायदा देईल.''

नवीन रोरो (रोल-ऑन/रोल-ऑफ) टर्मिनलमध्ये पूर्णपणे अत्याधुनिक पायाभूत सुविधा असतील. येथे तयार वाहनांच्या (पूर्ण झालेली वाहने) लॉजिस्टिकची सर्व कामे एकाच ठिकाणी पार पडतील, ज्यामुळे प्रमुख ऑटोमोबाईल ओईएम कंपन्यांसाठी ऑपरेशन्स अधिक सोपे होतील. एसएएमआरएक्स या टर्मिनलमध्ये गुंतवणूक करून आपली सेवा अधिक सुसंगत करणार असून, ग्राहकांना ३६०-डिग्री कार्गो ट्रॅकिंग आणि पूर्ण लॉजिस्टिक समाधान देणार आहे.

**दिघी पोर्ट का?**

पश्चिम किनाऱ्यावर धोरणात्मक ठिकाणी असलेले दिघी पोर्ट महाराष्ट्राच्या अंतर्गत औद्योगिक भागांसाठी एक महत्त्वाचे प्रवेशद्वार आहे. येथे बंद गोडाऊन, टँक फार्म आणि खुले स्टॉकयार्ड उपलब्ध आहेत, जे विविध वस्तू सुरक्षितरित्या साठवण्यासाठी वापरले जातात. थेट जहाज थांबवण्याची सुविधा आणि उत्कृष्ट रस्ते संपर्कामुळे हे बंदर तेल, रसायन, कंटेनर आणि मोठ्या प्रमाणातील मालवाहतूक सहजपणे हाताळू शकते. रोरो ऑपरेशन्समध्ये पोर्टचा विस्तार एपीएसईझेडच्या भविष्यासाठी तयार लॉजिस्टिक हब तयार करण्याच्या दृष्टीकोनात महत्त्वपूर्ण टप्पा आहे. भारताची सर्वात मोठी इंटिग्रेटेड पोर्ट्स व लॉजिस्टिक्स कंपनी एपीएसईझेड, दिघी पोर्टच्या मजबूत कामगिरीमुळे देशभर आपले नेटवर्क अधिक बळकट करत आहे. हा उपक्रम एपीएसईझेडच्या जागतिक दर्जाच्या पोर्ट सुविधांचा विकास, शाश्वत विकास आणि भारत तसेच जागतिक भागीदारांसाठी सुरळीत व्यापार- सुविधा देण्याच्या वचनबद्धतेला अधिक मजबूत करतो.

## दिल्लीतून इंडिगोची सर्व विमाने रद्द

कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे इंडिगो एअरलाइन्स कंपनी अडचणीत सापडली आहे. इंडिगोने शुक्रवारीही (५ डिसेंबर) देशभरातील शकडो विमान उड्डाणं रद्द केली आहेत. दिल्ली विमानतळावरील इंडिगोची सर्व उड्डाणं रद्द करण्यात आली आहेत. त्यामुळे विविध विमानतळांवर मोठ्या प्रमाणात प्रवाशांच्या प्रवासावर परिणाम झाला आहे. याआधीही इंडिगोची ५०० हून अधिक उड्डाणं रद्द करण्यात आली होती.

विमानतळ अधिकाऱ्यांनी सांगितलं की, आज मध्यरात्री ११.५९ वाजेपर्यंत एअरलाइनची सर्व उड्डाणं रद्द राहतील. या समस्येचं निराकरण करण्यासाठी ग्राऊंड टीम सर्व भागीदारांशी चर्चा करत आहोत. प्रवाशांना झालेल्या गैरसोयीबद्दल आम्हाला खंत आहे.दरम्यान, काँग्रेस खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून सवाल उपस्थित केला. त्यांनी म्हटलं आहे की, इंडिगोचं अपयश हे या सरकारच्या मक्तेदारी मॉडेलचा परिणाम आहे. पुन्हा एकदा सामान्य भारतीयांना विलंब, उड्डाणं रद्द करणे आणि असहाय्यतेच्या रूपात किंमत मोजावी लागली आहे.

## अवजड वाहतूक सुसाट

चार ते रात्री आठ यावेळेत जड-अवजड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. मात्र, जीवनाश्यक व अत्यावश्यक सेवा वगळता अन्य जड व अवजड वाहनांच्या वाहतुकीला बंदीचे आदेश दिले आहेत. नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात हे आदेश काढण्यात आले होते. सुरुवातीच्या कालावधीत या नियमांचे पालन करण्यात आले. त्यानंतर जिल्हाधिकारी यांच्या आदेशाला झुगारून अनेक अवजड वाहने या रस्त्यावरून सुसाट धावत आहेत. जिल्हाधिकारी यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत अवजड वाहने या रस्त्यावर बिनधास्तपणे सुरू असताना वाहतूक पोलिसांकडून कारवाई होत नसल्याचे दिसून येत आहे. अवजड वाहनांना अभय का दिले जात आहे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## मिथेनॉल केमिकलचा टँकर पलटी

या घटनेची माहिती जिल्हा वाहतूक शाखेला मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोयनाड पोलिसांनीदेखील घटनास्थळी जाऊन सुरक्षेच्या दृष्टीने पावले उचलली. आरसीएफ कंपनीच्या प्रशासनासह फायर ब्रिगेडला पाचारण करण्यात आले. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली. मात्र, टँकर चालक जखमी झाला असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## नगरपालिकांचा निकाल ठरल्यावेळीच!

त्याचे भान उच्च न्यायालयाने ठेवावे. त्यामुळे कुठल्याही परिस्थितीत ३१ जानेवारीनंतर या निवडणुका पुढे ढकलल्या जाऊ नयेत. त्याला कुठल्याही उच्च न्यायालयाचा आदेश जबाबदार असता कामा नये. विहित मुदतीत निवडणुका झाल्या पाहिजेत, त्या ३१ जानेवारीपूर्वी झाल्या पाहिजेत, हे भान उच्च न्यायालयाने ठेवावे. त्यामुळे उच्च न्यायालयाकडे ज्या याचिका प्रलंबित आहेत, त्यावरील निर्णय निवडणूक लांबणीवर पडणार आहे, हे उच्च न्यायालयाने पाहावे, असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, आजच्या सुनावणीमुळे ३१ जानेवारीच्या आतमध्येच निवडणूक झाली पाहिजे. २ डिसेंबरच्या मतदानाची मतमोजणी २१ डिसेंबरलाच झाली पाहिजे, हे न्यायालयाने स्पष्टपणे म्हटले आहे. त्यामुळे निवडणूक लांबणीवर पडण्याबाबत जी धाकधूक इच्छुक उमेदवारांच्या मनात होती, ती दूर झाली आहे. उच्च न्यायालयानेही निवडणूक लांबणीवर पडणार नाही याची काळजी घेण्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. एआयएमआयएमचे प्रदेश उपाध्यक्ष मो. युसूफ पुंजानी यांनी संयुक्तरित्या विशेष याचिका ४ डिसेंबरला सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. यावर शुक्रवारी सुनावणी झाली.

## गृह, वाहन कर्ज कमी होणार

यंदाच्या वर्षात आतापर्यंत रिझर्व्ह बँकेने रेपो रेटमध्ये एकूण तीनवेळा कपात केली होती. त्यामुळे रेपो रेट १ टक्क्याने खाली आला होता. यामध्ये आता आणखी ०.२५ बेसिस पॉईंटची भर पडली आहे. फेब्रुवारीच्या बैठकीत आरबीआयने रेपो रेट ६.५० वरून ६.२५ टक्क्यांपर्यंत कमी केले होते. चलनविषयक धोरण समितीने ही कपात जवळजवळ पाच वर्षांनी केली होती. दुसऱ्यांदा, एप्रिलच्या बैठकीत व्याजदर ०.२५ टक्क्यांनी कमी करण्यात आला. तिसऱ्यांदा, जूनमध्ये रेपो रेट ०.५० टक्क्यांनी कमी करण्यात आला होता. त्यानंतर आता रेपो रेटमध्ये आणखी ०.२५ टक्क्यांची कपात करण्यात आली आहे.

भारतीय रिझर्व्ह बँक बँकांना ज्या दराने कर्ज देते, त्याला रेपो रेट म्हणतात. रिझर्व्ह बँकेने रेपो रेट कमी केल्याने आता बँकांना आणखी कमी व्याजाने कर्ज उपलब्ध होईल. याचा फायदा बँका आपल्या ग्राहकांनाही देऊ शकतील. रिझर्व्ह बँकेच्या या निर्णयामुळे सरकारी आणि खासगी बँकांकडून गृहकर्जाचे व्याजदर ०.२५ टक्क्यांनी कमी केले जाऊ शकतात. तसे घडल्यास हा सर्वसामान्य ग्राहकांसाठी मोठा दिलासा ठरेल.

**रेपो रेट म्हणजे काय?**

रिझर्व्ह बँकेकडून व्यापारी बँकांना ज्या दरानं कर्ज दिलं जातं, त्याला रेपो रेट असं म्हटलं जातं. आरबीआय कमी व्याज दरावर व्यापारी बँकांना कर्ज देतात. याचा थेट परिणाम सर्वसामान्य माणसांवर होतो. कारण, आरबीआयनं रेपो रेट कमी केल्यास बँकादेखील कर्जाचे व्याज दर कमी करतात.


### जाहीर सूचना

आमचे अशील **श्री. केशव बालजी** (''मालक'') यांच्याशी मालमत्तेच्या खरेदीसाठी वाटाघाटी करत आहेत, ज्याचे वर्णन येथे दिलेल्या अनुसूचीमध्ये अधिक स्पष्टपणे केले आहे. आमच्या अशिलांनी आम्हाला सदर मालमत्तेच्या मालकीची चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत.

याखालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मालमत्तेच्या संदर्भात किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या संदर्भात कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध किंवा कोणताही दावा किंवा मागणी असलेला कोणताही व्यक्ती, मग ती विक्री, हस्तांतरण, नियुक्ती, देवाणघेवाण, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा, कुळवहिवाट, उप-कुळवहिवाट, रजा आणि परवाना, धारणाधिकार, गहाणखत, शुल्क, भार, विश्वस्त, सुविधा, भेट, वारसा, मृत्युपत्र, मृत्युपत्रितदेणगी, ताबा, तारणगहाण, लिज-पेंडन्स किंवा अन्यथा असल्यास तथापि, याद्वारे हे लेखी स्वरूपात निम्नस्वाक्षरीकार मेसर्स मुल्ला अँण्ड मुल्ला आणि क्रेगी ब्लन्ट अँण्ड कॅरो, अँडव्होकेट्स अँण्ड सॉलिसिटर्स, मुल्ला हाऊस, ५१, महात्मा गांधी रोड, फोर्ट, मुंबई- ४००००१ येथे आणि त्याव्यतिरिक्त, दि. १७ डिसेंबर २०२५ रोजीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह ypdandiwala@mullas.net आणि rksatpalkar@mullas.net या ईमेल पत्त्यांवर ईमेल पाठवून कळवणे आवश्यक आहे, अन्यथा अशा व्यक्तीचा किंवा व्यक्तींचा कोणताही कथित दावा किंवा दावे, आक्षेप, हितसंबंध, हक्क किंवा मागणी सर्व हेतू आणि हेतूंसाठी माफ करण्यात आली आहे असे मानले जाईल.

**वरील संदर्भित अनुसूची**
**(निर्देशित मालमत्तेचे वर्णन)**

व्हिला क्र. ४ मोजमापे ३,००४ चौरस फूट (कार्पेट क्षेत्रफळ) तळ आणि वरचा १ मजला ज्यावर गट क्र. ३८५/२/१/१ जमीन आहे त्याचा समावेश आहे मोजमापे ९.७० क्षेत्रफळ एकत्रितपणे नंबर १ असलेली एक कार पार्किंग जागा, जी बिगरशेती जमिनीचा भाग आहे मोजमापे क्षेत्रफळ ६७ रु. ६.८३/- दराने मूल्यांकन केलेले, गाव टेकाळी, तालुका अलिबाग आणि जिल्हा रायगड येथे स्थित, धारण आणि वसलेले आणि खालीलनुसार सीमाबद्धः

पूर्वेकडे किंवा दिशेने- गट क्र. ३८५/२/१/२-व्हिला ५;

दक्षिणेकडे किंवा दिशेने- गट क्र. ३८५/२/२;

पश्चिमेकडे किंवा दिशेने- गट क्र. ३८५/२/१/७ रीक्रिएशनल मोकळी जागा;

उत्तरेकडे किंवा दिशेने- गट क्र. ३८५/२/१/१० अंतर्गत रस्ता परिसर.

सदर दिनांकित ५ डिसेंबर २०२५

**मुल्ला अँण्ड मुल्ला आणि क्रेगी ब्लन्ट अँण्ड कॅरो**

सही/-
वाय. पी. दांडीवाला
भागीदार

# रस्ता रुंदीकरण प्रवाशांच्या जीवावर

## संथगतीचे काम अपघाताला निमंत्रण; गावांवर पाणी टंचाईचे संकट

**| रायगड | प्रतिनिधी |**

पर्यटनाचा जिल्हा म्हणून नावारूपाला येणाऱ्या रायगड जिल्ह्यात रस्ता रुंदीकरण, डागडुजी आणि डांबरीकरण करण्याकडे शासनाने भर दिल्याचे चित्र आहे. रस्ता कसा रखडला जातो याचे जिवंत उदाहरण रायगड जिल्ह्यातील मुंबई गोवा महामार्ग ठरल्याचे सर्वश्रुत आहे. आता जिल्ह्याचे मुख्यालय असणाऱ्या अलिबागला जोडणाऱ्या रोहा आणि मुरुड तालुक्यातुन जाणाऱ्या रस्त्यांवर कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जात आहे. रस्ता रुंदीकरण हि काळाची गरज असली तरी स्थानिकांसह प्रवाशांचे आरोग्यदेखील तितकेच महत्वाचे आहे. अलिबागकडून मुरुडकडे जाणाऱ्या रस्त्याचे रुंदीकरण करण्याचे काम एमएसआयडीसी या शासनाच्या विभागाने सुरु करून सुखाचा दिलासा दिला असलातरी कामाचा वेग आणि पद्धत पाहता रुंदीकरण लांबल्याने आता खोदाई केलेल्या ठिकाणी अपघात होण्यास सुरुवात झाली आहे.





अलिबाग शहराबाहेर पडल्यानंतर आरसीएफ कॉलनीच्या कुरूळ गेटपासून बेलकडे फाट्यापर्यंत रस्ता खड्ड्यांचा असल्याचे वाहनचालक अनुभवत आहेत. कुरूळपासून अलिबागच्या दिशेने असणाऱ्या रस्त्यावर रुंदीकरणाचे काम सुरु आहे. काही दिवसांपासून हा रस्ता रुंदीकरण करण्याची पावले उचलण्यात आली होती. पण हे काम निधी असतानादेखील संथ गतीने सुरु आहे. बेलकडेफाटा ते आरसीएफ कॉलनी गेट कुरूळ या दरम्यान काम करणाऱ्या कंपनीने चार ठिकाणी रस्ता खोदाई करून ठेवला आहे.

एमएसआयडीसीने रस्ता रुंदीकरण करताना कोणतीही खबरदारी घेतलेली दिसत नाही. अलिबाग ते बेलकडे या मधल्या पट्ट्यात एमएसआयडीसीने चार ठिकाणी खोदाई केली आहे. या चार ठिकाणी छोट्या मोऱ्या आहेत. या मोऱ्यांचे काम युद्धपातळीवर करण्यासाठीचा त्यांचा प्रयत्न आहे. रस्त्याचा भाग खाडीलगत असल्याने खोदाई केलेल्या ठिकाणी पाणी साठत आहे. वाहनचालकांच्या दृष्टीस पडून त्यांनी सावधगिरी बाळगावी अशी चिन्हे लावण्यात आलेली नाहीत. हा रस्ता खोदताना पोकलेन वापरण्यात येत असल्याने या रस्त्याच्या खालून जाणाऱ्या पिण्याच्या पाईपलाईन तुटल्याने आजूबाजूच्या परिसरातील जनतेला पाणीसंकटाला सामोरे जावे लागत आहे.

अलिबाग कडून बेलकडेकडे जाणारा रस्ता आधीच अरुंद त्यात आता एमएसआयडीसीने रुंदीकरणासाठी खोदला आहे. रस्त्यात पडलेले खड्डे आणि ते बुजवण्यासाठी टाकलेली माती यामुळे या रस्त्यावर दैनंदिन अपघाताच्या घटना घडत आहेत. या अपघातांमध्ये दुचाकी वाहनचालकांची संख्या अधिक आहे. एमएसआयडीसीने याच रस्त्यावर बेलकडे थांब्याच्या पुढे रस्त्यात असणाऱ्या छोट्या मोरीचे काँक्रिटीकरण करून पाईप टाकण्यासाठी खोदाई केली आहे. हि खोदाई रस्त्याच्या वळणावर असल्याने याठिकाणी अपघात घडत आहेत. एमएसआयडीसीने तातडीने लांबणीवर गेलेले रस्ता रुंदीकरणाचे काम मार्गी लावावे अशी मागणी होत आहे.

### संथगतीचा फटका गेलच्या प्रकल्पाला

अलिबाग रोहा रस्त्यावरील वढाव आणि वेलवली दरम्यानचा पूल कोसळला आणि गेलच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे काम रखडले आहे. जोपर्यंतरस्त्यावर गुणवत्ता पूर्ण पुलाची उभारणी केली जात नाही तोपर्यंत प्रकल्प उभारण्यासाठी आणण्यात आलेली यंत्रणा गेल कंपनीपर्यंत पोहचू शकणार नाही. यामुळे पुलाचे काम तातडीने होण्याच्या दृष्टीने गेल व्यवस्थापन देखील शासन दरबारी हेलपाटे मारताना दिसत आहे. पूल उभारणीचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाच्या आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेने शासनाला पाठवला आहे. अद्याप पूल उभारण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली नसल्याने हा पूल उभारणीचे कामदेखील लांबणीवर गेले आहे. एकूणच राज्य शासनाच्या दिरंगाईचा फटका केंद्र शासनाच्या प्रकल्पाला बसला आहे अशी चर्चा तालुक्यात आहे.

# शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणार : डफळ

**| कोर्लई | प्रतिनिधी |**



उदरनिर्वाहासाठी स्थलांतर करणाऱ्या कुटुंबातील, अनियमित, शाळाबाह्य मुलांना शंभर टक्के शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन मुरुड तहसीलदार आदेश डफळ यांनी केले.

शासनाच्या समग्र शिक्षा अभियानांतर्गत स्थलांतरित होऊन आलेल्या मुलांना शाळेत दाखल करुन घेऊन गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्याबाबत व स्थलांतरित होऊन जाणाऱ्या मुलांचे नियोजन करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या तालुकास्तरीय समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी समिती अध्यक्ष तथा तहसीलदार आदेश डफळ, पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी, सुनील पाटील, विश्वनाथ म्हात्रे, चुनेकर, शिंदे, चेतन पाटील, राजेश भोईर, संतोष पुकळे, मिलिंद पालवणकर उपस्थित होते.

शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरित मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व त्यांचे आरोग्य मान सुधारण्यासाठी एक विशेष मोहीम राबविण्यात येत असून शाळाबाह्य मुलांना कोणतीही उणीव असेल तर स्वतः वैयक्तिक मदत करेन असे तहसीलदार आदेश डफळ यांनी सांगितले.

ज्या विद्यार्थ्यांचे आधार कार्ड बाकी आहेत, त्यासाठी सहकार्य करण्यात येईल, अशा मुलांना शिक्षण प्रवाहात आणणे, शैक्षणिक सुविधा पुरविणे आणि आरोग्याची जोपासना करणे हे काम प्राधान्याने करण्यात बैठकीत ठरविण्यात आले.

# अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

**| रसायनी | प्रतिनिधी |**

बाळाराम कांबेकर यांच्या कृपाआशीर्वादाने वारकरी सांप्रदायिक प्रसारक मंडळ, रसायनी पाताळगंगा आयोजित श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या सुवर्ण जन्मोत्सव तपपूर्ती सोहळानिमित्त श्री तुकाराम गाथा पारायण व अखंड हरिनाम सप्ताह मोहोपाडा येथील जनता विद्यालय मैदानावर आयोजित करण्यात आला आहे.



हा सप्ताहात दिपोत्सवाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी रसायनी पंचक्रोशीतील वारकरी सांप्रदाय मोठ्या संख्येने उपस्थित होता.

या सप्ताहात प्रवचन, हरिपाठ तसेच सायंकाळी ७ ते ९ वाजता सुप्रसिध्द महाराजांची किर्तने झाली. काल्याचे किर्तन राम सोलापूरकर यांच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता झाली.

यावेळी राम सोलापूरकर यांचे सरपंच उमा मुंढे व संदिप मुंढे यांनी महाराजांचे पुष्पहार घालून अभिवादन करीत आशीर्वाद घेतले. या सप्ताहासाठी वारकरी सांप्रदायिक प्रसारक मंडळ रसायनी पाताळगंगा, खालापूर व पनवेल तालुका यांनी अथक परिश्रम घेतले.

# मोबाईलची चोरी

**पनवेल :** महागड्या आयफोन १७ प्रो मोबाईलची चोरी झाल्याची घटना पनवेल तालुक्यातील पळस्पे फाटा येथील एका कार्यालयात घडली आहे. मोबाईल चोराला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

मोहम्मद सलीम मोहम्मद मोहित खान (वय ३६) याचा १ लाख ४९ हजार रुपये किमतीचा ॲपल कंपनीचा आयफोन १७ प्रो मोबाईल हा एस.के.टेंबर येथील शुभम पाटील याने सदर मोबाईल हा लबाडीचा इराद्याने चोरी केली. याबाबतची तक्रार मोहम्मद सलीम मोहम्मद मोहित खान पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली आहे.

## निवडक



### अंबिवली रस्त्याची चाळण

**रसायनी :** रसायनीतील खाने अंबिवली प्रकल्पग्रस्त शेतकरी संघटनेतर्फे एमआयडीसी उपअभियंता यांना एसबीआय रसायनी ते जल शुद्धीकरण केंद्र अंबिवली या नादुरुस्त रस्त्याचे काम करण्याबाबत लेखी निवेदन देण्यात आले होते. या रस्त्याची अक्षरशः चाळण झाल्याने रस्त्यावरुन प्रवास करताना तारेवरची कसरत करुन वाहने चालवली जातात. एचआयएल(हिल), एमआयडीसी जलशुध्दीकरण केंद्राकडे तसेच वसाहतींकडे ये-जा करण्यासाठी हा एकमेव रस्ता असल्याने विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. प्रवास करताना शाळकरी विद्यार्थी व महिला वर्गाला मनस्ताप होत आहे. हा रस्त्याचे काम व्हावे, यासाठी कंपनीनेही दिली आहे. या रस्त्याचे काम न झाल्यास खाने आंबिवली प्रकल्पग्रस्त शेतकरी संघटना सर्वपक्षीयांसह आंदोलनाच्या पवित्र्यात असल्याचे समजते.

### तृतीयपंथींवर कारवाईची शिवसेनेची मागणी

**पनवेल :** कामोठे टोल नाका ते खारघर टोल नाक्याच्या दरम्यान हायवेवर उभ्या असलेल्या तृतीय पंथीयांवर कारवाई करण्याची मागणी शिवसेनेचे पनवेल विधानसभा समन्वयक प्रदीप केसरीनाथ ठाकूर यांनी कळंबोली पोलिसांकडे पत्राद्वारे केली आहे. सायन-पनवेल महामार्गावरील कामोठे टोल नाका ते खारघर टोल नाकाच्या दरम्यान हायवेवर उड्डाणपुलाच्या बाजूला रात्री आठनंतर तृतीयपंथी रस्त्यावर उभे राहतात आणि ते अश्लील वर्तन असल्याने त्याचा त्रास येणाऱ्या जाणाऱ्यांना होतो. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी अश्लील वर्तवणूक करणाऱ्या तृतीयपंथीयांचा बंदोबस्त करावा अशी मागणी प्रदीप ठाकूर यांनी पोलिसांकडे केली. तत्पूर्वी १ डिसेंबर रोजी तृतीय पंथीयांसोबत झालेल्या वादावादीतून स्कुटी वरून आलेल्या दोघांनी ३७ वर्षीय तरुणाची हत्या केली होती. पोलिसांनी वेळीच तृतीय पंथीयांवर कारवाई केली असती तर या तरुणाचे प्राण वाचले असते.

# जनजागृती रॅलीत विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप



**| पनवेल | प्रतिनिधी |**

दिव्यांग जनजागृती रॅलीमधील विद्यार्थ्यांना पनवेल शहर वाहतूक शाखे तर्फे खाऊचे वाटप करण्यात आले.

नवीन पनवेल विभागामध्ये रोटरी क्लब आयोजित दिव्यांग जनजागृती रॅलीसाठी सहभागी मुला-मुलींना प्रोत्साहन म्हणून पनवेल शहर वाहतूक शाखेतील वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांच्या सहकार्याने आदई सर्कल नवीन पनवेल या ठिकाणी दिव्यांग रॅली आल्यानंतर ५० ते ६० दिव्यांग मुलांसाठी कॅडबरी व पाण्याच्या बाटल्या वाटप करण्यात आल्या. या उपक्रमामुळे दिव्यांग मुलांमध्ये उत्साह आपुलकीची भावना निर्माण झाला असून हा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद आहे. यावेळी पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने, पो. हवा युवराज येळे, पो. हवा अमीर मुलाणी, पो. हवा सतीश चौधरी, पो. हवा संजय पाटील, पो. शि बालाजी थिटे उपस्थित होते.

# केलटे ग्रामस्थांनी बांधले वनराई बंधारे



**| म्हसळा | प्रतिनिधी |**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान या कार्यक्रमांतर्गत केलटे ग्रामपंचायती मध्ये गावातील स्वच्छता ग्रामस्थांच्या लोकसहभागातून नदीत मातीचे वनराई बंधारे बाधण्यासाठी सुनियोजित नियोजन करून बंधारे बांधले गेले.

या बंधाऱ्या बांधल्यामुळे पावसाचे वाया जाणारे हजारो लिटर पाणी भूगर्भात जिरविण्यात मदत होणार आहे. त्याचबरोबर नदी परीसरातील मातीची होणारी धूप मोठ्या प्रमाणातत थांबणार आहे बाजूला असणारे विहिरी तलाव यांचे देखील पाण्याची पातळी वाढणार आहे.

या बंधाऱ्यामुळे पशु-प्राणी यांना देखील एक नवी संजीवनी प्राप्त होणार आहे ग्रामपंचायत सरपंच उमेश पवार त्यांचे सर्व सदस्य यांनी देखील उपक्रमास महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे या उपक्रमा अंतर्गत स्वच्छतेचे धडे देखील ग्रामस्थांनी गिरवले आहेत.

# क्रेडाईच्यावतीने बीज कनेक्ट कार्यक्रम

**| पनवेल | प्रतिनिधी |**

क्रेडाई एमसीएचआय रायगड आणि क्रेडाई एमसीएचआय युथ बिल्डर्स असोसिएशन यांच्या संयुक्त ताज विवांता, तुर्भे, नवी मुंबई येथे बीज कनेक्ट हे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात क्रेडाई एमसीएचआय रायगड युनिटचे अध्यक्ष अरविंद एम. सावळेकर यांच्या हार्दिक स्वागताने झाली.



आपल्या मनोगतात त्यांनी या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश म्हणजे डेव्हलपर्स आणि बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स यांच्यात थेट संवादाची निर्माण केलेली संधी, रिअल इस्टेट क्षेत्रातील नवीन व नाविन्यपूर्ण उत्पादने व तंत्रज्ञानाची ओळख, तसेच अधिक सशक्त व्यावसायिक संबंध प्रस्थापित करणे हे असल्याचे सांगितले. कार्यक्रमाला प्रचंड उत्साहपूर्ण प्रतिसाद मिळाला असून नवी मुंबई आणि रायगड परिसरातील विक्रेते व डेव्हलपर्स यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदविला.

# कर्जतमध्ये शेतकरी दिनाचे आयोजन

**| नेरळ | प्रतिनिधी |**

शेतकरी प्रधान आपल्या देशात २३ डिसेंबर हा दिवस शेतकरी दिवस म्हणून साजरा केला जातो. कर्जत तालुका किसान क्रांती संघटनेचे वतीने शेतकरी दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.



शेतकरी आपल्या शेतामध्ये अन्नधान्य भाजीपाला पिकवून जनतेची मूलभूत गरजा अन्न वस्त्र निवारा यापैकी अन्न ही मूलभूत गरज बळीराजा पूर्ण करत असतो. शेतामध्ये काम करणारे शेतकरी यांचा सन्मान व्हावा यासाठी २३डिसेंबर शेतकरी दिनाचे निमित्त शेतकऱ्यांचा सन्मान व्हावा यासाठी महाराष्ट्र राज्य किसान क्रांती संघटना कर्जत तालुका कमिटी यांनी शेतकरी सन्मान सोहळा आयोजित करण्यासाठी त्या नियोजनाची सभा घेण्यात आली. २३ डिसेंबर रोजी शेतकऱ्यांचा सन्मान केला जाणार त्याची पूर्वतयारी सभेत कर्जत तालुकाअध्यक्ष भरत राणे यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा आयोजित करण्यात आली होती. किसान क्रांती संघटना महाराष्ट्र राज्य कर्जत तालुका महिला कमिटीच्या अध्यक्षपदी शिल्पा शिवाजी लोभी, उपाध्यक्ष आशा सुदाम कोळंबे, सचिव गायत्री गणेश ऐनकर, यांची नव्याने नियुक्ती करण्यात आली असून, मधुरा सुनील शेळके, सहसचिव सुमन भोईर, सल्लागार अश्विनी भवारे, स्मिता तुपे, दीपा रुठे, या महिला कमिटीची नव्याने नियुक्ती करण्यात आली.

या सभेसाठी महाराष्ट्र राज्य किसान क्रांती संघटनेचे संघटक विनायक देशमुख, रायगड जिल्हा अध्यक्ष उत्तम शेळके, कर्जत तालुका अध्यक्ष भरत राणे, उपाध्यक्ष शरद तवले, प्रवक्ते सुरेश खानविलकर, सल्लागार पंढरीनाथ दाभाडे, काशिनाथ धुले, साधू राम पाटील, जगन्नाथ पाटील, सचिव एकनाथ शेळके, असे अनेक किसान क्रांती संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

### टिपणीस महाविद्यालयात एचआयव्ही तपासणी शिबीर

**| नेरळ | प्रतिनिधी |**

नेरळ ममदापुर येथे असलेल्या मातोश्री टिपणीस महाविद्यालयात जागतिक एड्स दिनाच्या निमित्ताने एड्स निर्मूलन वर जनजागृती व्याख्यान आणि विद्यार्थ्यांची तपासणी शिबीर यांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना एड्स आजाराबाबत माहिती देण्यासाठी आणि जनजागृती करण्यासाठी नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. मेढी तसेच समुपदेशक आशा बालशंकर, स्नेहल दूधसागर, आरोग्य सेविका सावंत, पूजा पाटील, आरोग्यसेवक सत्यवान हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नंदकुमार इंगळे यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते.



कृषीवल | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
| MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# फडणवीसांचे एक वर्ष

गेल्या पाच डिसेंबरला देवेंद्र फडणवीस सरकारचा शपथविधी झाला. राक्षसी बहुमताची बॅटरी असली तरी सरकारची गाडी राज्य परिवहनच्या डुगडुगत चालणाऱ्या एसटीसारखी चालू आहे. साधे रायगड आणि नाशिकचे पालकमंत्रीही अजून जाहीर करता आलेले नाहीत. राज्य सरकार तिघांचे आहे. पण रवींद्र चव्हाण अलिकडेच म्हणाल्याप्रमाणे एक नंबर हाच खरा. बाकी दोघे नावाला आहेत. इथे खरे राज्य फडणवीसांचे आहे हे रोज दाखवून दिले जात असते. एक वर्षापूर्वी मुख्यमंत्रिपद न मिळाल्याने एकनाथ शिंदे रुसले होते. गावी जाऊन बसले होते. आता ते चिडलेले आहेत. त्यांच्या पक्षाची माणसे रोज फोडली जात आहेत. कालच डोंबिवलीतून आणखी काही कार्यकर्ते शिंदे गटातून भाजपमध्ये दाखल करून घेतले. एक वर्षातला फरक असा की, पूर्वी शिंदे रुसले तरी भाजपवाले पळापळ केल्याचे दाखवत होते. आता शिंद्यांनी आदळआपट केली तरी त्याला किंमत दिली जात नाही. २०१४ ते १९ या पाच वर्षात फडणवीस पहिल्यांदा मुख्यमंत्री राहिले. आरंभी त्यांनी प्रशासन माझे ऐकत नाही अशी तक्रार केली होती. नंतर प्रशासनाला मुठीत घेतले होते. भीमा कोरेगावच्या दंगलीचे निमित्त करून डाव्या कार्यकर्त्यांना तुरुंगात टाकले व सडवले अशा प्रकरणातून त्यांचे इरादे दिसले. फडणवीसांच्या दुसऱ्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात पोलिसी शासनाचा मोहरा युतीतल्या मित्रांकडे वळला आहे. सरकार आल्या आल्या संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून गदारोळ झाला. फडणवीसांनी मुद्दामच तो बराच काळ होऊ दिला. धनंजय मुंडे व अजितदादांची जास्तीत जास्त बदनामी होईल हे पाहिले. नंतर शिंदे गटातील संजय शिरसाट वगैरेंच्या प्रकरणांमध्ये कारवाई झाली. एकनाथांचे चिरंजीव श्रीकांत यांना प्राप्तिकर खात्याची नोटीस जावी अशी व्यवस्था झाली. अगदी अलिकडे सांगोल्याचे शहाजीबापू पाटील यांच्यावर धाड पडली. हिंगोलीचे आमदार संतोष बांगर यांनी शिंदे गटात येण्यासाठी ५० कोटी घेतले असा आरोप भाजप आमदाराने केला. त्यांच्याकडे पोलिस गेले. पण पुण्यात जैन बोर्डिंगचा मोठा भूखंड घोटाळा बाहेर येऊनही भाजपचे खासदार व मंत्री मुरलीधर मोहोळ यांना धक्का लागला नाही. सगळे हसत हसत विसरले गेले.

## पोलिसी राज्य

मोहोळांचे प्रकरण निघाल्याच्या रागातून बहुदा पार्थ अजित पवार यांची कोंढव्याची भानगड जगजाहीर झाली. आता पार्थ यांच्यावर कारवाईची टांगती तलवार ठेवून पुढची पाच वर्षे आरामात काढता येतील. येत्या जिल्हा परिषद व महापालिका निवडणुकांमध्ये आपल्याच मित्रांचा भाजप पुरता बंदोबस्त करून टाकेल. युतीत आपली गरज काय असा प्रश्न त्यांना पडावा अशी व्यवस्था केली जाईल. सरकार म्हणून कारभार करतानाही फडणवीसांनी अशीच हडेलहप्पी करण्याचा प्रयत्न केला. ती किमान तीन ठिकाणी अंगाशी आली. पहिलीपासून हिंदी ही तिसरी भाषा सक्तीची करण्याचा त्यांचा निर्णय म्हणजे आपला अजेंडा रेटण्यासाठी भाजपवाले कशी गुंडगिरी करतात याचा नमुना होता. कोणाशीही चर्चा न करता हा निर्णय घेतला गेला. मुंबईतील मराठी मते गमावण्याच्या भीतीने नंतर तो मागे घ्यावा लागला. पण भाजपवाले दीर्घद्वेषी असतात. याचा सूड ते नंतर कुठेतरी काढतीलच. नाशिकमध्ये कुंभमेळ्यासाठी १८०० झाडे तोडण्याचा निर्णय हे दुसरे उदाहरण. आधी त्याचे जोरात समर्थन केले गेले. झाडे तोडण्याला विरोध करणे म्हणजे हिंदूंच्या धार्मिक श्रध्दांचा अपमान असाही सूर काढला गेला. पण ते जमत नाही हे पाहिल्यावर मग माघार घेतली गेली. त्यापूर्वी परभणी तुरुंगातील दलित आरोपीच्या मृत्यू प्रकरणीही दडपादडपी करण्याचा प्रयत्न झाला. पण शेवटी संभाजीनगर खंडपीठाने या प्रकरणी पोलिसांवर गुन्हे दाखल करण्याचा आदेश दिल्याने गृहमंत्री फडणवीस हे तोंडावर आपटले. मराठा आंदोलनाची हवा काढून घेण्यासाठीही असाच पोलिस व कोर्टाचा वापर करण्यात आला. जरांगे पाटील यांना आझाद मैदानावर दररोज एका दिवसापुरती उपोषणाची परवानगी देण्यात आली. त्यातून जरांगेचे कार्यकर्ते अस्वस्थ झाले. याचा फायदा घेऊन मुंबईतील सुव्यवस्था बिघडत आहे असा कांगावा केला गेला. जरांगे यांना काहीही पदरात न पडता उपोषण मागे घ्यावे लागले. प्रश्न कोणतेही असोत, ते पोलिसी बळावर हाताळणे हेच फडणवीसी राज्याचे वैशिष्ट्य राहिले आहे.

## भाजपचा आणि समस्यांचाही विस्तार

गडचिरोलीत प्रचंड विकास करण्याच्या नावाखाली तेथील जंगल उद्ध्वस्त केले जात आहे. गावकऱ्यांची शेती बरबाद होणार आहे. त्याला लोकांचा विरोध आहे. पण त्यांचाही आवाज पोलिसी धाकाने दडपला जात आहे. कोणीही मागणी केलेली नाही असे शक्तिपीठाचे प्रकल्प रेटले जात आहेत. कोकणात मुंबई-गोवा महामार्ग सडत पडलेला असूनही नवा सागरी मार्ग करण्याच्या हालचाली सुरू आहेत. शेतकऱ्यांना कर्जमाफी करण्याचे आश्वासन युतीने निवडणुकीपूर्वी दिले होते. त्याबाबत समिती नेमू अशी नुसतीच घोषणा करून ठेवण्यात आली व त्यावर दोन महिने काढण्यात आले. नंतर बच्चू कडू यांनी आंदोलन केल्यावर पुढच्या तीस जूनपर्यंत माफी करू असा वायदा करण्यात आला. मधल्या काळात राज्यात ठिकठिकाणी जो महापूर आला त्यात शेकडो कोटींचे नुकसान झाले. पण शेतकऱ्यांना तुटपुंजी भरपाई मिळाली. पण त्याबाबत आंदोलने उभी राहणार नाहीत याची काळजी घेण्यात आली. आता तर पुढचे सहा महिने राज्याला निवडणुकीमध्ये अडकवून टाकण्यात येणार आहे. नगरपालिकांचे आटोपले. आता जिल्हा परिषदा व महापालिका निवडणुका होतील. अत्र, तत्र, सर्वत्र भाजपच असेल यासाठी फडणवीस सरकारची यंत्रणा राबवली जाईल. एक वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने फडणवीस हे कसे नंबर वन आहेत, त्यांच्या कारभारावर जनता कशी खूष आहे याची भामटी सर्वेक्षणे आज काही माध्यमांमधून प्रसिध्द झाली आहेत. या सर्वेक्षणवाल्यांनी कोणत्या जनतेची मते विचारली हे मोठे रहस्य आहे. पण शेतकरी, कामगार, शिक्षक, सरकारी नोकरीसाठीचे इच्छुक तरुण, खासगी उद्योजक यापैकी कोणालाही आनंद व्हावा असे काहीही ठोस या सरकारने या वर्षभरात केले आहे असे दिसत नाही. राज्यातील रस्त्यांची अवस्था भयंकर आहे. मुंबई असो की पेण वा खोपोलीसारखी छोटी शहरे. सर्वत्र बकाली, प्रदूषण, वाटेल तशी बेकायदा बांधकामे, वाहतुकीची कोंडी, पाण्याचे हाल हे समान आहे. यासाठी सरकार कोणतेही नियोजन करताना दिसत नाही. उलट पालघरच्या बाजूला चौथी की पाचवी मुंबई वाढवण्याचा त्याचा विचार दिसतो. सरकारी नोकऱ्यांमधील भरतीवर जवळपास अघोषित बंदी आहे. कंत्राटी कामांची संख्या वाढते आहे. दुसरीकडे खासगी कंत्राटदारांचे शेकडो कोटी थकले आहेत. फडणवीसांच्या या पहिल्या वर्षात त्यांनी अनेकवार आंदोलनाचा इशारा दिला आहे. लाडकी बहीण योजनेने सरकारच्या तिजोरीचे बंबाळे वाजले आहे. पण प्रशासनावर पकड असलेले देवेंद्र फडणवीस ते मान्य करण्यास तयार नाहीत. फडणवीसांनी एका वर्षात भाजपचा विस्तार केला असेल पण राज्यातल्या अडचणी, समस्या व दुःखे यांचा त्याहूनही अधिक वेगाने विस्तार झाला आहे.

**विचार**

# महापरिनिर्वाण दिन बाबांचा

**संजीव मोरे**

अस्पृश्य समाजाचे महान विचारवंत पराक्रमी आणि क्रांतीकारक योद्धा डॉ. भिमराव रामजी आंबेडकर यांच्या अगाध बुद्धीमत्तेबद्दल, विशाल विद्वत्तेबद्दल आणि प्रचंड कर्तृत्वाबद्दल या देशातील हरएक नागरिकाच्या मनात नितांत असा आदर आहे आणि तो असायलाही हवाच. डॉ. बाबासाहेब आंबेडकराएवढा प्रचंड बुद्धीमत्तेचा दुसरा एकही महापुरूष या महाराष्ट्रात नव्हे तर देशात जन्माला यावयाचा आहे हे त्यांच्या अफाट विद्वतेने पावलोपावली सिद्ध केलेले आहे, नव्हे तर जगाने मान्य केले आहे. महार जातीत जन्माला आलेला हा माणूस वृत्तीने व्यासंगाने आणि अधिकाराने ब्राम्हणांपेक्षाही अधिक श्रेष्ठ आणि पवित्र आहे. ज्या कोणी सनातनी ब्राम्हणांना आपल्या जन्मजात ब्राम्हण्याची घमेंड असेल त्यांनी ह्या कर्माने वृत्तीने या ब्राम्हणांच्या घरात जाऊन त्यांचे सोज्वळ आणि ज्ञानमय जीवन पहावे म्हणजे त्यांना याची प्रचिती येईल. परंतू एवढी महान विभूती असूदेखील त्यांच्या वाट्याला येणारे जे दुःख आहे ते यायचे थांबलेले नाही. जो अपमान त्यांना सहन करावा लागला त्याच्याच त्यांच्या या विद्वत्तेमुळे कणभरही सुधारणा झाली नाही. बाबांनी लिहिलेल्या 'अस्पृश्यांची दास्यमुक्ती' या अत्यंत मर्मभेदक ग्रंथामध्ये त्याचा एक प्रभावी विचार या ठिकाणी पिडीत लोक असतात. उदा. जसे की, रोमन राष्ट्रात करतो. प्रत्येक नमूद गुलाम, ब्रिटीश राष्ट्रात दास, अमेरिकेत निग्रो, जर्मनीमध्ये ज्यु त्याचप्रमाणे भारतात अस्पृश्य. पण या देशांमधील शोपी वर्गापेक्षाही भारतातील अस्पृश्यांची स्थिती अत्यंत दयनीय अशो आहे. कारण या देशांमधील हे सारे दलितवर्ग जवळजवळ संपुष्टात आले आहेत. परंतू भारतातील अस्पृश्यता मात्र आहे तेथेच आहे. आजही देशाच्या अनेक भागांमध्ये दलितांवर अन्याय होत आहेत ही वस्तुस्थिती कोणी नाकारण्याची हिंमत करणार नाही. दुसरा महत्वाचा फरक म्हणजे इतर देशात वर्णभेदावरून द्वेष करीत असले तरी त्यांचे प्रगतीचे जे मार्ग आहेत ते अडवून धरले जात नव्हते. परंतू भारतीय व्यवस्थेत मात्र आज २१ व्या शतकातही अस्पृश्यांचा केवळ द्वेषच केला जात नाही तर त्यांचे प्रगतीचे सारे मार्ग अडवून धरले जातात. म्हणून या देशात अस्पृश्यांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समानतेसाठी संघर्ष करावा लागतो. आज आम्हांला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षापेक्षा अधिक कालावधी लोटला तरीही मग हा दलित शोषीत वर्ग स्वतंत्र झालेला आहे का की त्यांच्याबाबत हा स्वातंत्र्याचा केवळ आभास आहे हे दुर्दैवाने म्हणावे लागते.

या सर्व कारस्थानातून डॉ. बाबासाहेब हे दलितांचे कैवारी ठरले. दलितांच्या आत्मसन्मानासाठी सम्यक परिवर्तनाचे युद्ध लढणाऱ्या दलितांनी आपले प्रेरणास्थान स्फूर्तीस्थान आपल्यासाठी सर्वकाही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मानले. बाबांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांच्या विचारांना खूप महत्व प्राप्त झाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित समाजात जन्माला आले होते. उच्चवर्णीय समाजाने केलेल्या अन्यायाने जनावरेही लाजतील अशा हिन वागणूकीचे चटके त्यांनी आपल्या जाणत्या वयापासूनच सहन केलेले होते. जी व्यक्ती अशा तीव्र वेदना देणाऱ्या



अनुभवातून गेलेली असते तिलाच ही समाजव्यवस्था बदलावी असे वाटते. सामाजिक समतेसाठी आणि सामाजिक न्यायासाठी सामाजिक विषम तेविरूद्ध युद्ध लढणारे योद्धा म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना या व्यवस्थेने समजून घेतले पाहिजे. वर्षानुवर्षे आपले अस्तित्व आपली ओळख हरवलेल्या दलित समाजाला आत्मशोधनाची आणि आत्मभानाची दृष्टी देणारे महामानव डॉ. बाबासाहेब द्रष्टे महापुरूष होते. सत्याचा साक्षात्कार आधुनिक काळात कोणाला झाला असेल तर ते महापुरूष म्हणजे बाबासाहेब होत. 'जाती मोडा, अस्पृश्यता गाडा' आणि माणूस व्हा हे निर्मळ सत्य डोंगराच्या शिखरावर उभे राहून सांगण्याचे धैर्य फक्त बाबासाहेबांनाच झाले. अस्पृश्यता काय आहे हे अस्पृश्याच्या जन्माला गेल्यावाचून अन्यायकर्त्याला समजणार नाही हे विदारक सत्य त्यांनीच या मनुवादी वृत्तीला ठणकावून सांगितले. बाबासाहेबांचा हा संदर्भ लक्षात घेऊन महाकवी वामनदादा कर्डक आपल्या गीताच्या माध्यमातून म्हणतात.

**जखडबंद पायातले साखळदंड**
**तटातट तुटले तू ठोकताच दंड**
**झाले गुलाम मोकळे, भिमा तुझ्यामुळे**

व्यवस्थेने गुलाम केलेल्या दलितांच्या मुक्ततेचा लढा त्यांनी यशस्वीपणे लढला. त्यामुळे शोषीतांना आत्मभान आले. प्रस्थापित व्यवस्थेचा नारा आणि समतेवर आधारलेल्या नव्या समाजाचे स्वप्न पाहण्याचे दिवस बाबासाहेबांमुळेच प्राप्त झाले. संपूर्ण समाजव्यवस्था मुठभर प्रस्थापितांच्या हितासाठी वापरली जाते आणि बहुजनांचे शोषण केले जाते. या अनुभवातून अभ्यासपूर्वक काढलेल्या निष्कर्षातून डॉ. आंबेडकरांनी हे समतेसाठी युद्ध पुकारले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ बहुजन समाजाच्या हितासाठीच कार्य केले असे काही अवाचक आपल्या तथ्यहिन विचारांचे प्रदर्शन करतात. परंतू ज्याला बाबासाहेब समजले ज्यांनी बाबासाहेबांना अभ्यासले आहे तो त्यांच्या कार्याबद्दल निरर्थक ज्ञानाचे प्रदर्शन करणार नाही. निश्चितपणे बाबासाहेबांनी दलितांना आपल्या कार्याच्या केंद्रस्थानी मानले होते. परंतू याचा अर्थ असा नव्हे की, त्यांनी देशहिताकडे किंवा इतर समाजाच्या उन्नतीकडे दुर्लक्ष केले असा त्याचा निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही. कारण या देशातील अब्राम्हणी आणि दलितेतर असलेल्या मागास जातीची स्थिती विचारात घेऊन बाबासाहेबांनी आपल्या विचारातून कार्यातून त्यांचेही नेतृत्व केले. शेतकऱ्यांचे, शेतमजूरांचे, स्त्रियांचे १२ यालुतेदारांचे अलुतेदारांचे भटक्यांचे आदिवासींचे कामगारांचे नेतृत्व त्यांनी केले व होत असलेल्या अन्यायाचे विरूद्ध उभे राहून त्यांना प्रामाणिकपणे न्याय मिळवून देण्याची भूमिका त्यांची नेहमी राहिलेली आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठीचा पहिला संप डॉ. बाबासाहेबांनीच केलेला आहे. कामगार मजूर स्त्रियांच्या उद्धारासाठी संप, कायदे करण्यासाठीचे प्रयत्न डॉ. बाबासाहेबांनीच केल्याचे दिसून येईल. हिंदूकोड बिल पास व्हावे यासाठी त्यांनी अतोनात प्रयत्न केल्याचे आपल्याला दिसून येईल. इतर मागासवर्गीयांना घटनात्मक सवलती मिळाव्यात म्हणून कलम ३४० समाविष्ट व्हावे यासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले. परंतू सरकार ही बाब दुर्लक्षित करत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे त्यांनी आपल्या कायदेमंत्री पदाचा राजीनामा २४ सप्टेंबर १९५२ रोजी दिला. या बाबी त्यांच्या कार्याची स्पष्टता करत असताना डॉ. आंबेडकर हे दलितांपुरतेच मर्यादित राहावेत यासाठी ही समाजव्यवस्था जाणुनबुजून प्रयत्न करत आहे. परंतू आज देशातील तरूणाई जागृत झालेली आहे. बाबासाहेबांच्या विचारामध्ये त्यांना देशहित दिसत असून आंबेडकरवादाचा स्विकार केल्याशिवाय देशाला पर्याय नाही म्हणून डॉ. आंबेडकरांचे विचार या देशाच्या उन्नतीसाठी, प्रगतीसाठी अपरिहार्य असून डॉ. आंबेडकर आपले सर्वांचेच नेते आहेत हे देशाने स्विकारणे देशहितासाठी क्रमप्राप्त आहे. या देशातील मनुवादी वृत्तीने डॉ. आंबेडकरांबद्दल असणारी कोती मानसिकता वाजूला सारून उदारमतवादी व्हावे हा बदल जर घडवून आणला तर आपला प्रवास माणूस होण्याच्या दिशेने सुरू होईल आणि आपला माणूस म्हणून होत असलेल्या अंध:पतित स्थितीतून बाहेर पडण्याचा मार्ग प्रत्येकाला सापडेल.

मानवी हक्काचे नेतृत्व करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्यासाठी नेते आहेत. त्यांचे प्रेरणादायी विचार आणि त्यांनी देशहितासाठी केलेले अपार कष्ट आजही आपले नेतृत्व करत आहे. आपल्या जातीय मानसिकतेची परिधान केलेले वस्त्र बाजूला सारून त्यांना जाळून टाका आणि डॉ. बाबासाहेबांना स्विकारण्याची मानसिकता प्रामाणिकपणे अंगीकारून त्यांचे नेतृत्व मान्य करा. त्यांच्या कार्याला, विचारांना समजून घ्या. हे झाले की, ते या देशाचे देशातील सर्वांचे महान नेते आहेत हे आपण निश्चितपणे स्विकाराल. 'नर करणी करे तो नर का नारायण बन जाय' अशी एक उक्ती आहे. ही उक्ती बाबासाहेबांना तंतोतंत लागू पडते. भोग भूमित राहूनही बाबासाहेबांनी विश्वमित्राला लाजवेल अशी तपश्चर्या केली. त्यामुळे आपोआप मस्तक त्यांच्यापुढे झुकते. आज बाबासाहेबांना जावून ६९ वर्षांचा कालावधी लोटला. दलितांना, बहुजनांना त्यांच्या आयष्यात या महामानवाने सन्मानाने उभे केले. त्यांच्यात आत्मसन्मानाची ज्योत पेटवून तो कधीही विझवू नका यासाठी जागृत केले. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा त्यांचा विचार बहुजनांनी तंतोतंत पाळला आणि तो सर्वार्थाने परिणामकारक ठरला. त्यामुळे आज आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या फार मोठा बदल घडून आलेला आहे. भगवान गौतम बुद्ध, संत कबीर, म. जोतीराव फुले यांच्यानंतरचे एक महान क्रांतीकारी युगपुरूष म्हणून आपल्याला डॉ. आंबेडकरांचे नाव घ्यावे लागेल. आज या महापुरूषाचा महापरिनिर्वाण दिन. त्या निमित्ताने त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली.

**जयभिम**

# तपोवन तापणार

**वैभव पाटील**

संत तुकाराम महाराज यांनी वृक्षवल्ली आम्हा सोयरे, हा पर्यावरणाचा संदेश साडेतीनशे वर्षापूर्वी आपल्या दिला. छत्रपती शिवाजी महाराजांनी देखील अज्ञापत्रात वृक्षतोड करू नये असे आदेश दिले होते. एक काळ होता महाराष्ट्रात झाडे लावा झाडे जगवा ही मोहीम मोठ्या प्रमाणात राबविली जात होती.

सामान्य माणसाने एक झाड तोडले तर त्याच्यावर कठोर कारवाई होते. असे असताना एका सिंहस्थासाठी शेकडो झाडे तोडणे कोणत्या नियमात बसवण्यात येणार आहे? आपल्या देशातील विरोधाभास असा की येथील बहुसंख्यांच्या धर्मात वृक्षवल्ली, प्राणीमात्रांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. मात्र येथील समाज आणि या समाजाने निवडून दिलेली सरकारे ही नेहमीच या दोन्ही घटकांची उपेक्षा करत आली आहेत. विकासाच्या नावाखाली झाडांची कत्तल करण्यात आणि प्राणीमात्रांचे अधिवास हिरावून घेण्यात आजच्या सत्ताधाऱ्यांचा हात याआधीची कोणतीही सरकारे धरू शकणार नाहीत. मुंबईतील आरे मेट्रोसारखे प्रकल्प असो,किंवा इतर प्रकल्प, त्यांच्या वाटेत येणारी शेकडो वर्षांची वनसंपदा बिनदिक्कत सपाट करून तथाकथित विकासाचा मार्ग मोकळा करून दिला जातो.

झाडे तोडण्याऐवजी काही पर्याय निघू शकतो का, याचा विचार करण्याची फारशी तसदी घेतली जात नाही. वृक्षतोडीचे इथले पाप जणू रामकुंडातील स्नानाने धुऊन निघणार आहे. सिंहस्थ कुंभ महत्त्वाचाच; कारण संस्कृतीच्या वहनाचे हे एक माध्यम. मात्र या मेळ्यासाठी वृक्षतोड हा धार्मिक मुद्दा नाही. तो निव्वळ प्रशासकीय आळशीपणाचा आणि नगर नियोजनातील कल्पकतेच्या, दूरदृष्टीच्या अभावाचा आणखी एक नमुना आहे. नाशिक ही सिंहस्थ कुंभमेळ्याची नगरी असताना नगर नियोजनात साधूच्या निवासाची सोय करावी, अशी गरज सरकारला का भासत नाही? आला कुंभ की तोडा झाडे, असाच पायंडा यापुढे जाणार आहे.

तपोवनातील शेकडो झाडांना कुऱ्हाड लावण्याच्या निर्णयामुळे नाशिककर रस्त्यावर उतरल्यानंतर प्रशासनाची झोप उडाली आहे. गोदाकाठचा हिरवाईचा श्वास कापण्याचा हा सरकारी डाव नागरिकांनी उघडपणे रोखण्याचा निर्धार केला आहे. ज्या देशात श्रद्धा अंधश्रद्धा एकत्र नांदतात तिथे असे मेळावे भरणे आणि भरवणे हा परंपरेचा भाग असतो. शाळेतील मुले पर्यावरण शिकत राहतात, व्याख्या पाठ करत राहतात परीक्षेत उत्तर लिहून चांगल्या गुणांनी पास होऊन उच्च पदे मिळवतात पण नोकरशाहीत आल्यानंतर नेमकं-उलट वागतात, त्यांना वागावं लागत आहे. तपोवनातील नैसर्गिक वनक्षेत्र हा नाशिकचा प्राणवायू तलाव आहे. पक्ष्यांचे अधिवास, नैसर्गिक सावली, जैवविविधतेची शृंखला हे सर्व साधुग्रामासाठी जागा मोकळी करण्याच्या नावाखाली विनाशाच्या उंबरठ्यावर नेले जात आहे. त्याविरोधात नाशिककर एकवटले असून कुंभमेळा पवित्र आहे, पण निसर्गाची कत्तल अधिक पाप आहे, अशी ठाम भूमिका घेत पर्यावरणप्रेमींनी प्रशासनाच्या भूमिकेवर आसूड ओढला आहे.

नाशिकमध्ये या वृक्षतोडीच्या विरोधाचा स्वर इतका तीव्र झाला की नागरिकांनी झाडांना मिठी मारत चिपको आंदोलन पुन्हा जिवंत केले. महिला, विद्यार्थी, तरुणाई, सामाजिक संस्था सगळे एकत्र येऊन झाडांसमोर मानवी भिंत उभारली. घोषणांनी वातावरण थरथरले. नदीकाठचे पर्यावरणीय संतुलन, तापमानवाढ, धूळकणांचा कहर, हवामानातील बदल याबाबत नागरिकांनी दिलेला वैज्ञानिक आक्रोश प्रशासनाला धडकी भरवणारा ठरत आहे. तपोवनातील झाडे शांत आहेत, पण त्यांच्या रक्षणासाठी नाशिककरांचा आवाज संपूर्ण शहर दणाणून सोडत आहे. शेकडो वर्षांची झाडे तोडून दहा रोपे लावणे म्हणजे डोळ्यांत धूळफेक आहे. रोपे मोठी होण्यासाठी दशकं लागतात. तपोवनातील तोडण्यात येणाऱ्या वृक्षांचे पुनर्रोपण करण्यात येणार असल्याचे बोलले जाते. परंतु देशात वृक्ष पुनर्रोपणाचा यशस्विता दर अतिशय कमी आहे. मुळात एखाद्या झाडाला जागेवरून हलवल्यावर त्याचे अस्तित्व धोक्यात येते. वाहतुकीत मुळांची कितीही काळजी घेतली तरी नवीन वातावरणात ते तग धरेल की नाही, हा प्रश्नच आहे. वृक्ष जतन व संवर्धन ही सर्वांचीच जबाबदारी आहे.

कुंभमेळ्यासाठी इतक्या मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केली जात असेल तर दुदैवीच आहे. सरकारने डोळे उघडायला हवेत. त्यांनी किती झाडे लावलीत याचा तरी किमान हिशोब द्यावा. लोकांनी आवाज उठवला की तो दाबला जातो, लोकशाही आहे की हुकुमशाही हेच कळत नाही. झाडांवरून राजकारण करण्यापेक्षा त्याची कत्तल होणार नाही याचा विचार करा. शिवपुराण, पद्मपुराण आणि ब्रम्हणपुराणामध्ये सांगितलेले आहे की, ज्या तीर्थ क्षेत्रावर ज्या देवतेचे स्थान आहे, तेथील झाडे त्या देवतेचे गण सांगितलेले आहेत. त्र्यंबकेश्वर येथील सर्व झाडे हे शिवगण, तर नाशिकमधील सर्व झाडे हे विष्णूगण सांगितले आहे. त्यामुळे संतांच्या वृक्षवल्ली आम्हा सोयरे हा अभंग राहणार नाही.

**लोकसंसद**

## अधोगती दर्शवणारी निवडणूक

राज्यातल्या नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या. तब्बल नऊ वर्षानंतर झालेल्या या निवडणुकीत मतदारांनी २६४ अध्यक्षांसाठी आणि ६ हजार ४२ सदस्यांसाठी भरभरून मतदान केले. या निवडणुकीत मतदारांचा उत्साह दिसून आला. ही निवडणूक अभूतपूर्व ठरली कारण यापूर्वी मतदारांनी जे कधीही पाहिले नव्हते ते या निवडणुकीत पहायला मिळाले. निवडणूक आयोगाने निवडणुकीत जो घोळ घातला तो यापूर्वी कधीही पहायला मिळाला नाही. निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले. निवडणूक आयोगाच्या भोंगळ कारभारामुळे काही नगरपालिकांच्या निवडणुका ऐनवेळी पुढे ढकलाव्या लागल्या त्यामुळे ऐन मतदानाच्या दिवशी न्यायालयाने मतमोजणी पुढे ढकलण्याचा आदेश दिला. या निवडणुकीत राजकीय पक्षांनी तर हद्दच केली. उमेदवारांची पळवापळवी, अडवाआडवी त्यानंतर धनशक्तीचा मुक्त वापर, बोगस मतदारांची धरपकड, कार्यकर्त्यांची तुंबळ हाणामारी, नेत्यांची एकमेकांवर पातळी सोडून केलेली टीका, ईव्हीएम मध्ये झालेला बिघाड, मतदार यादीतील घोळ या सर्व गोष्टी या निवडणुकीत पाहायला मिळाल्या. राज्यात सत्तेत असलेले मित्रपक्ष एकमेकांविरुद्ध उभे ठाकून विरोधी पक्षांशी हातमिळवणी करून मित्र पक्षांवरच टीका करत होते तर विरोधी पक्षातील काही नेते सत्तेतील पक्षाशी हातमिळवणी करून आपल्याच सहकारी पक्षांना लक्ष करत होते. कोण कोणाच्या विरोधात आणि कोण कोणाच्या बाजूने हेच समजत नव्हते. महाराष्ट्रात हे पहिल्यांदाच पहायला मिळत होते. निवडणुकीतील हे चित्र महाराष्ट्राने याआधी कधीही पाहिले नव्हते. निवडणुकीतील हे चित्र महाराष्ट्राच्या लौकिकास साजेसे नव्हते. ही निवडणूक महाराष्ट्रातील आहे की युपी बिहार मधील असा प्रश्न पडला होता. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात जर अशा पद्धतीने निवडणुका होत असतील तर ते महाराष्ट्रासाठी खचितच भूषणावह नाही. हे चित्र आशादायक नसून येणाऱ्या काळातील अधोगती दाखवणारं आहे. हे चित्र बदलायला हवं यासाठी आता मतदारांनीच पुढाकार घ्यायला हवा. मतदार जागृत झाले तरच लोकशाहीची ही थट्टा थांबेल. राजकीय पक्षांनी तर यावर गहन विचार करावा. केवळ निवडणूक येणे हेच राजकीय पक्षांचे काम नाही तर लोकशाहीची बूज राखणे, लोकशाहीचे पावित्र्य टिकवणे आणि पूर्वीप्रमाणे महाराष्ट्राचा लौकिक टिकवणे हे देखील राजकीय पक्षांचे काम आहे. निवडणूक आयोगानेही आपली स्वायत्तता टिकवून ठेवावी. टी एन शेषन यांच्याप्रमाणे कडक भूमिका घेऊन निवडणूक निर्भयपणे पार पडेल याची दक्षता निवडणूक आयोगाने घ्यावी.

**श्याम ठाणेदार**

**दिनविशेष**

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिन

'महापरिनिर्वाण दिन' हा दरवर्षी ६ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. हा दिवस डॉ. बी. आर. आंबेडकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त पाळला जातो. डॉ. आंबेडकर हे एक दूरदृष्टीचे नेते आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार होते. डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी दलितांचे जीवन सुधारण्यासाठी अथक परिश्रम घेतले. त्यांनी भेदभावाविरुद्ध लढा दिला. या दिवशी लोक डॉ. बी. आर. आंबेडकर यांच्या कार्याची आणि त्यांनी भारतीय समाजात घडवून आणलेल्या बदलांची आठवण करतात. महापरिनिर्वाण दिन हा न्याय, समानता आणि निष्पक्षता या त्यांच्या मूल्यांवर विचार करण्याची संधी देतो. त्यांची शिकवण आजही भारताला प्रभावित करते. त्यांचे भाषण आणि त्यांच्या जीवनातील महत्त्वाचे मुद्दे अधिक समान आणि न्याय्य समाज निर्माण करण्याच्या त्यांच्या समर्पणाची आठवण करून देतात. महापरिनिर्वाण दिन म्हणजे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि प्रमुख समाजसुधारक डॉ. बी. आर. आंबेडकर यांचे निधन झाले तो दिवस. ते ६ डिसेंबर १९५६ रोजी निधन पावले. मम हापरिनिर्वाणफ या बौद्ध शब्दाचा अर्थ मम हानिर्वाणफ असा आहे. हे एका ज्ञानप्राप्त आत्म्याने मोक्ष प्राप्त केल्याचे प्रतीक आहे. या दिवशी, संपूर्ण भारतात, विशेषतः डॉ. आंबेडकरांचे अनुयायी त्यांच्या स्मृती आणि समाजातील योगदानाचा सन्मान करतात. विशेषतः दलितांना वर आणण्यासाठी आणि सामाजिक न्याय व समानतेसाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांची आठवण केली जाते. डॉ. बी. आर. आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्य प्रदेशातील महू येथे झाला. ते भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार होते. आंबेडकर हे दलित आणि इतर वंचित समुदायांच्या हक्कांसाठी एक खंबीर पुरस्कर्ते होते. त्यांनी जात व्यवस्था आणि अस्पृश्यतेविरुद्ध लढा दिला, सामाजिक समानतेसाठी प्रयत्न केले. आंबेडकर हे परदेशातील विद्यापीठातून कायद्याची पदवी मिळवणारे पहिले दलित समुदायातील व्यक्ती होते. ते शिक्षणाचे पुरस्कर्ते होते आणि त्यांनी लोकांना, विशेषतः दलितांना शिक्षित होण्यासाठी प्रोत्साहित केले. डॉ. आंबेडकर यांनी १९५६ मध्ये बौद्ध धर्म स्वीकारला, ज्यामुळे दलितांचे मोठ्या प्रमाणावर बौद्ध धर्मात रूपांतर झाले. स्वातंत्र्यानंतर त्यांनी भारताचे पहिले कायदा मंत्री म्हणून काम केले. समानतेसाठी त्यांची बांधिलकी आणि शोषितांना वर आणण्याची त्यांची दृढता आपल्याला आपल्या जीवनाच्या प्रत्येक पैलूमध्ये न्यायासाठी लढण्याची सतत गरज आठवण करून देते. चला, आपण समानतेला प्रोत्साहन देऊन, शिक्षण आणि सामाजिक सक्षमीकरणाचे उदाहरण पाळूया आणि असा समाज निर्माण करण्यासाठी कार्य करूया जिथे जात किंवा पार्श्वभूमी विचारात न घेता प्रत्येकाशी आदर आणि प्रतिष्ठेने वागले जाईल. या देशाचे विद्यार्थी आणि भावी नेते म्हणून, आपण डॉ. आंबेडकर ज्या मूल्यांसाठी उभे राहिले. समानता, न्याय आणि सामाजिक सुधारणा-त्यांचे केवळ जतनच नाही, तर त्यांना पुढे नेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. दिल्लीत अलिपूर रोड येथील निवासस्थानी निद्रावस्थेतच बाबासाहेबांचे निधन झाले. दिल्लीहून त्यांचे पार्थिव विमानातून रात्री सव्वा तीन वाजता मुंबईत आणण्यात आले. रात्री सांताक्रूझ विमानतळावर सुमारे पंचवीस हजारांचा जमाव जमला होता. त्यानंतर अँम्ब्युलन्समधे त्यांचे पार्थिव ठेवण्यात आले. सांताक्रूझ ते दादर हे पाच मैलाचे अंतर पार करण्यासाठी तीन तास लागले होते. पाच वाजून पाच मिनिटांनी अँम्ब्युलन्स राजगृहापाशी आली. तेथे रात्रभर साडेतीन लाख लोक वाट पाहात होते. धीरगंभीर वातावरणात 'बुद्धं शरणं गच्छामी'चा घोष होत होता. सव्वापाच वाजता बाबासाहेबांचे पार्थिव अँम्ब्युलन्समधून उतरवण्यात आले. अर्ध्या तासानंतर लोकांना दर्शनाची मुभा देण्यात आली. सात डिसेंबर रोजी दुपारी दोन वाजता राजगृहापासून अंत्ययात्रा निघाली. सुमारे बारा लाख लोक त्यात सामील झाले होते. सायंकाळी सात वाजता दादर चौपाटीवर बाबासाहेबांवर अंत्यसंस्कार झाले. त्यानंतर भदन्त आनंद कौसल्यायन यांच्या हस्ते बौद्ध धम्म दीक्षा विधी झाला.

# शिरगाव तिठा बनतोय धोकादायक

## • सुरक्षात्मक उपाययोजनांचा अभाव; नागरिकांचा जीव मुठीत घेऊन प्रवास



| मंडणगड | प्रतिनिधी |

आंबडवे लोणंद या ९६५ डीडी राष्ट्रीय महामार्गावर शिरगाव येथील तिठा स्थानिकांसाठी प्राणघातक बिंदू ठरत आहे. मंडणगड-शेनाळे तसेच शिरगाव पाट गावांमधून येणारी वाहने या तिठ्यावर एकत्र आल्याने सतत भीषण अपघात होत आहेत. वेगवान वाहने, वाढलेले गवत, दिशादर्शक फलकांचा अभाव आणि कोणतेही सुरक्षात्मक उपाय न केल्याने येथे नागरिकांचा जीव मुठीत घेऊन प्रवास सुरू आहे.

### ब्लॅक स्पॉट म्हणून ओळखण्याची वेळ

शिरगाव, पाट व आसपासच्या गावातील नागरिकांनी संबंधित विभागांना अनेकवेळा मागणी करूनही उपाययोजना न केल्याचा आरोप होत आहे. शिरगाव तिठा हा आता ब्लॅक स्पॉट म्हणून ओळखण्याची वेळ आली आहे. योग्य वेळी कृती न केल्यास येथील अपघातांची मालिका आणखी भयावह होऊ शकते. सुरक्षिततेच्या दृष्टीने तातडीने उपाययोजना करणं महत्त्वाचं ठरेल. अन्यथा हा तिठा आणखी किती जीव घेणार, याचा अंदाजही लावता येणार नाही.

परिसरातील नागरिकांच्या म्हणण्यानुसार, तिठ्यावर संकेत फलक नाहीत, गतिरोधक किंवा झेब्रा मार्किंग नाही, रस्त्याच्या कडेला गवत दाट वाढले आहे. त्यामुळे अचानक समोर येणारी वाहने दिसत नाही. मंडणगड व शेनाळेकडून उतारावरून वाहने सुमारे ८० ते १०० स्पीडने झपाट्याने येतात. पाट किंवा शिरगावकडून रस्ता गाठणाऱ्यांना ती वाहने दिसायलाच उशीर होतो. त्यामुळे अपघातांचे प्रमाण तर सतत वाढते आहे. रस्त्यावर दररोज शेकडो वाहने धावतात; काही वाहने जडवाहतूक (ट्रक, टिपर) असल्याने धोकाही अधिक असतो. तरीही या तिठ्यासंबंधी कोणतेही वाहतूक सर्वेक्षण, ब्लॅक स्पॉट घोषित करणे, नव्या डिझाइनचा प्रस्ताव किंवा अपघात प्रतिबंधक उपाय अद्याप झाल्याचे दिसत नाही. एकीकडे शून्य अपघात मोहीमची घोषणा होत असताना प्रत्यक्षात अशा बिंदूवर उपाययोजना न होणे हे गंभीर आहे.

मागील काही महिन्यांत याठिकाणी २१ जून, १८ नोव्हेंबर, २६ नोव्हेंबर रोजी ३ मोठे प्राणघातक अपघात झाले आहेत. यामध्ये तिघांचा मृत्यू, तर पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. तर किरकोळ अपघातांची संख्या दर आठवड्याला वाढत आहे.

> “संघर्ष समितीच्या माध्यमातून वेळोवेळी राष्ट्रीय महामार्गावर येणाऱ्या अडचणी आणि अडथळाबाबत निवेदने देऊन सूचना केल्या आहेत. मात्र त्या पूर्ण करू असे सांगून वेळ मारून नेली आहे. त्यांच्या वर्तवणुकीवरून राष्ट्रीय प्राधिकरण निगरगट्ट असल्याचे दिसून आले आहे. गावांच्या नावाचे फलक, दिशादर्शक फलक आणि अपघातग्रस्त ठिकाणी कोणत्याही उपाययोजन केलेल्या नाहीत. मागण्या पूर्णत्वास न गेल्यास आंदोलन करण्यात येईल.
> – अरविंद येलवे, अध्यक्ष, संघर्ष समिती मंडणगड”

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**६ डिसेंबर**

१) श्रीम.नीलिमा वसंत वर्तक अलिबाग दि.०६-१२-१९४४

२)श्रीम.अंजली विजय सोमण बाजारपेठ, अलिबाग दि. ६-१२-१९५७

## ‘एड्स’ दिनानिमित्त जनजागृती फेरी

| मंडणगड | प्रतिनिधी |

लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आजीवन शिक्षण व विस्तार विभागच्या वतीने संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स दिनानिमित्त मंडणगड शहरात जनजागृती फेरीचे आयोजन करण्यात आले होते. या फेरीदरम्यान विद्यार्थ्यांनी ‘एड्स जाणा, एड्स टाळा’, एड्स की जानकारी खुशहाल जिंदगी की सवारी, घरोघरी एकच नारा, एड्सला नाही थारा, करु एड्स निर्मूलन, उपाय एकच प्रतिबंधन अशा प्रकारच्या घोषणा देऊन या भयंकर आजारापासून मुक्त रहाण्याबाबत विद्यार्थी व ग्रामस्थांमध्ये जनजागृती केली.

## फोंडळवाडी येथे दत्त जयंती साजरी

| तळा | प्रतिनिधी |

तळा शहरातील फोंडळवाडी येथे कांबळेकर परिवाराकडून दत्तजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. तूकाराम गणपत कांबळेकर, भागोजी कांबळेकर व दगडू कांबळेकर या तीन भावंडांनी वारकरी संप्रदाय यांच्या माध्यमातून ७५ वर्षांपूर्वी तालुक्यातील बोरीचा माळ येथे श्री दत्त जयंती जन्मोत्सव सुरू केला. आज ७५ वर्षानंतरही दत्तजयंती उत्सव साजरा करण्याची परंपरा त्यांच्या मुलांकडून जपली जात आहे. यानिमित्ताने आदिनाथ संप्रदाय मंडळ आणि तळा परिसरातील भाविक तीर्थ प्रसाद व महाप्रसादाचा लाभ घेतात.



## सुतारवाडी येथे दत्त जयंती उत्साहात

| सुतारवाडी | प्रतिनिधी |

श्रीमत पद्मनाभाचार्य अमृत नाथ स्वामी शाखा दत्त मंदिर पुगाव यांच्या सौजन्याने ग्रामस्थ मंडळ सुतारवाडी, श्री दत्त क्रीडा समाजसेवा मंडळ सुतारवाडी यांच्यावतीने याही वर्षी श्री दत्त जन्मोत्सव सोहळा उत्साहात पार पडला. उत्सवाचे हे ४० वे वर्षे होते.

गुरुवारी (दि.४) ते शुक्रवार (दि.५) पर्यंत श्री दत्त जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी अभंग स्नान, ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पारायण, ज्ञानेश्वरी सांगता, भोजन, प्राथमिक शाळा सुतारवाडी व सुतारवाडी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे विविध गुणदर्शन कार्यक्रम, दत्त जन्माचे कीर्तन, प्रमुख पाहुण्यांचा सत्कार, किर्तन, जागरण, पालखी सोहळा, काल्याचे किर्तन, असे कार्यक्रम दोन दिवस आयोजित केले होते.

## जागतिक दिव्यांग दिन साजरा

| कर्जत | प्रतिनिधी |

श्री समर्थ कृपा सेवाभावी सामाजिक संस्था (छ. शिवाजी महाराज नगर, दहिवली) संचालित द्वारकाई विशेष मुलांची शाळा यांच्या वतीने जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त विद्यार्थ्यांसाठी व पालकांसाठी विविध मैदानी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी दहिवली विचार मंचला विशेष आमंत्रण देण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सुनिल जाधव, मार्गदर्शक विकास चित्ते, मनीषा ढुमणे, मल्हारी माने, जयप्रकाश जाधव उपस्थित होते. या शाळेतील मुलांच्या शिक्षणाबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संचालक सागर पवार आणि त्यांची उत्कृष्ट टीम अत्यंत मनापासून कार्यरत आहे. मुलांना स्वावलंबी बनवणे, दैनंदिन कृती स्वतः करण्याचे कौशल्य विकसित करणे, ही त्यांची ध्येयधोरणे आहेत. बौद्धिक विकासासोबतच शारीरिक शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन या मुलांना विविध उपक्रमांद्वारे प्रोत्साहन दिले जाते. त्यामुळे ही मुले सर्वसामान्य मुलांप्रमाणे आत्मविश्वासाने वागू शकतील, समाजात आपले स्थान निर्माण करू शकतील, यासाठी ही टीम अखंड प्रयत्नशील आहे.



## आंबा घाटात बस दरीत कोसळली

**रत्नागिरी** : संगमेश्वर तालुक्यातील प्रसिद्ध आंबा घाटात खासगी बस दरीत कोसळून अपघात घडला. हा अपघात शुक्रवारी (दि.५) पहाटेच्या सुमारास घडला असून यात अनेकजण जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच देवरूख पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत जखमींना रूग्णालयात दाखल केले. अपघातातील बस ही नेपाळवरून रत्नागिरीच्या दिशेने जात होती. आंबा घाटातील चक्रीवळणाजवळ आले असता बसवरील नियंत्रण सुटून बस ५० ते ७० फूट दरीत कोसळली. अपघातावेळी गाडीमध्ये सुमारे ९० ते १२० प्रवासी होते. अपघाताची माहिती मिळताच देवरूख पोलीस व साखरपा पोलीसांनी घटनास्थळी दाखल होत स्थानिकांच्या मदतीने सर्व प्रवाशांना सुखरूप बाहेर काढले व जखमींना साखरपा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. तर गंभीर जखमींना रत्नागिरी येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल केले.

## मोफत कायदेशीर मार्गदर्शन शिबीर

| माणगाव | प्रतिनिधी |

निजामपूर ग्रामपंचायत कार्यालय येथील सभागृहात सोमवारी (दि.८) सकाळी ११ वा. डीएमआयसी भूसंपादन व जमिनीविषयक मोफत कायदेशीर मार्गदर्शनपर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात सर्वहारा जनआंदोलनाच्या संस्थापक उल्काताई महाजन व अ‍ॅड. गौरी घळसासी हे मान्यवर उपस्थित राहून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. तरी या शिबिरास शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक जनार्दन मानकर यांनी केले आहे.

आपल्या विभागातील भिरा पाटणूस म्हसेवाडी, लव्हेलीवाडी, साजे, साजे आदिवासी वाडी, रवाळजे, नारायणगाव, बहिरीचीवाडी, विळा, बेडगाव येथील जमीन टाटा भिरा अवजल विद्युत प्रकल्पासाठी संपादित झाली. विळा, वरची वाडी, सणसवाडी, तासगाव, तासगाव आदिवासीवाडी, भागाड, येलावडे गावची सुमारे १५०० हेक्टर जमीन कवडीमोल दरात विळे भागाड एमआयडीसीसाठी संपादित झाली. तिथे आलेले कारखाने, कारखान्यात आपल्या माणसाना मिळालेले कंत्राट आणि आपल्या मुलाबाळांना लागलेल्या नोकऱ्या आपण पाहतच आहात. कुंभे, कुंभेवाडी, केळगण, मांजूर्णे (काही भाग) काळ कुंभे जलविद्युत प्रकल्पासाठी संपादित झाला. जो गेल्या २५ वर्षांपासून येतोच आहे. त्यावर कहर म्हणून एमआयडीसीची मोठी बहीण डीएमआयसी आली. त्यात हजारो हेक्टर जमीन दिल्ली, मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉरसाठी भूसंपादित झाली. आपल्या स्वतःचे घर बांधण्यासाठी शेकडो परवानग्या घ्याव्या लागतात. आगामी काळात निजामपूर विभागांतील प्रत्येक तरूणांच्या वाट्याला सुखा पेक्षा दुःखाचेच दिवस जास्त असणार आहेत. म्हणून निजामपूर ग्रामपंचायत सभागृहात आयोजित डीएमआयसी भूसंपादन तसेच जमिनीविषयक मोफत कायदेशीर मार्गदर्शन शिबिरास हजर रहावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## कासारआळी येथे दत्त जयंती साजरी

| तळा | प्रतिनिधी |

तळे बाजारपेठ कासारआळी येथे श्री गुरुदेव दत्त मंदिरात गेली ३३ वर्षे दत्त जयंती उत्सव व इतर अनेक धार्मिक व सामाजिक उपक्रम आनंदी वातावरणात साजरे करण्यात येत आहेत. बुधवारी (दि.३) श्री दत्त मंदिराचा वर्धापन दिन आनंदात साजरा करीत असताना सकाळी ५.३० वाजता काकड आरती, त्यानंतर ९.३० वा श्री सत्यदत्त पूजा, दुपारी आरती, त्यानंतर महाप्रसाद देण्यात आला. जवळपास ४०० भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. सायंकाळी ५ वा. तीर्थ प्रसाद त्यानंतर भोईरवाडी तळा येथील महिला मंडळाचा बहारदार भजनाचा कार्यक्रम पार पडला. हभप प्रगती रिसबुड व हभप लक्ष्मण शिंदे त्यांना मृदुंग साथ किरण सातांबेकर यांची लाभली.



गुरुवार दि.४ डिसेंबर रोजी सायंकाळी ४.३० वा. श्री गुरुदत्त जन्मोत्सव किर्तन हभप अवनी गद्रे सुधागड पाली यांचे सुश्राव्य कीर्तन त्यांना हार्मोनियमची साथ भरत चव्हाण तर तबला साथ किरण सातांबेकर यांची लाभली. अतिशय सुंदर कीर्तनाचा लाभ अनेक भाविकांनी घेतला. त्यानंतर तीर्थप्रसाद रात्रो १०वा. स्थानिक मंडळाचा भजनाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी मंदिराच्या उत्सवासाठी देणगी देणाऱ्यांचा सत्कार संस्थेतर्फे करण्यात आला.

## वाघ्रणला प्रथमच दत्तजयंती साजरी

**वाघ्रण** : अलिबाग तालुक्यातील वाघ्रण येथे गुरुवारी (दि.४) श्री दत्त जयंतीचे प्रथमच आयोजन करण्यात आले होते. वाघ्रणचे जेष्ठ विधीज्ञ अ‍ॅड. गणेश पाटील यांनी जिर्णोद्धार केलेल्या श्री विठ्ठल रखुमाई मंदिरात स्थापन करण्यात आलेल्या दत्तगुरुंच्या मुर्तीमुळे या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी स्थानिक भजनाचा लाभ अनेकांनी घेतला. स्वामी दत्तगुरुंच्या नामाचा जप आणि जल्लोष करीत जमलेल्या सर्वांनी पुष्प वर्षाव केला. त्यानंतर आरती व तिर्थप्रसाद कार्यक्रम व पुन्हा रात्री भजनाने सांगता झाली.



## सलोनी कदमचा ग्रामस्थांकडून सत्कार

| कोलाड | प्रतिनिधी|

डोंगराळ भागातील निसर्गरम्य वातावरणाच्या कुशीत वसलेल्या छोट्याशा काकल (कोंड) गावचे नारायण कदम यांची मुलगी सलोनी ही डॉक्टर झाली. याबद्दल साई परिसरातील ग्रामस्थांनी तिचे अभिनंदन करून सत्कार केला. यावेळी साई परिसरातील ग्रामस्थ सुदाम अधिकारी, श्रीधर अधिकारी, प्रवीण अधिकारी, सुधीर म्हामुनकर, मेजर रवींद्र मोरे व काकल गावचे पोलीस पाटील व इतर बांधव उपस्थित होते.

**खराब रस्त्याचीही तात्काळ दुरुस्ती करावी** | **स्थानिक रिक्षाचालकांची मागणी**

# दहिवली-मालेगाव पुलाच्या कामाला गती

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातून वाहणाऱ्या उल्हास नदीवर दहिवली मालेगाव येथे असलेली कमी उंचीच्या पुलाच्या जागी नवीन पूल बांधण्यात येत आहे. २५ कोटी रुपये खर्चून बांधण्यात येत असलेल्या या नवीन पुलाच्या कामाला गती मिळाली आहे. मात्र या पुलाचे काम मार्चपूर्वी पूर्ण करावे आणि धामोते ते कोदिवले या भागातील खराब रस्त्याची तत्काळ दुरुस्ती करावी, अशी मागणी स्थानिक रिक्षाचालक यांनी केली आहे.



माथेरान-नेरळ-कळंब राज्यमार्ग रस्त्यावर असलेल्या उल्हास नदीवर पूल आहे. दहिवली मालेगाव येथे असलेला जुना पूल ४० वर्षे पूर्वी बांधण्यात आलेला आहे. त्यावेळी बांधलेला पूल हा कमी उंचीचा असल्याने दरवर्षी पावसाळ्यात या पुलावरून महापुराचे पाणी वाहून जाते आणि त्यामुळे वाहतूक बंद होते. त्यामुळे उल्हास नदीवर नवीन पूल बांधण्यात यावा, अशी मागणी अनेक वर्षे सुरु आहे. त्यानुसार राज्य सरकारकडून नवीन पूल उभारण्याच्या कामाला मंजूरी मिळाली आहे.

२०२४ पासून या पुलाच्या बांधकामाला सुरुवात झाली असून ठेकेदार कंपनीसाठी हा पूल बांधला जात आहे की वाहने आणि जनतेसाठी? हा प्रश्न अनुत्तरित राहिला आहे. पुलाचे काम अत्यंत संथगतीने सुरु असतानादेखील बांधकाम विभाग संबंधित कामाचा ठेका घेणारे ठेकेदार कंपनीला नोटीस देण्याची तसदी घेत नाही. त्याचवेळी पुलाचे कामासाठी १८ महिन्यांचा कालावधी संपून गेला आहे. तरी देखील या पुलाचे अर्धे काम देखील पूर्ण झालेले नाही. सार्वजनिक बांधकाम खात्याचे दहिवली मालेगाव पुलाचे काम करणाऱ्या ठेकेदार कंपनीवर नियंत्रण नसल्याने मागील दोन वर्षापासून सुरू आहे. नवीन पुलाची उंची जुन्या पुलाच्या उंचीपेक्षा किमान दहा फूट उंच बनविण्यात येत आहे. त्याचवेळी जुन्या पुलावरून पावसाळ्यात उल्हास नदीला महापूर आल्यानंतर किमान पाच फूट उंचीवरून पाणी वाहून जात असते. त्यावेळी भविष्यात अशी स्थिती पुन्हा निर्माण होऊ नये यासाठी पुलाची उंची अधिक ठेवण्यात येत आहे. अनेक महिने रखडलेल्या या पुलाचे काम पुन्हा सुरू झाल्याने स्थानिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

> “दहिवली मालेगाव पुलाचे काम जनतेसाठी सुरु आहे कि ठेकेदासाठी? असा प्रश्न पडला आहे. या पुलाचे बांधकाम सुरु होऊन दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. मात्र पुलाचे बांधकाम पूर्ण होण्याची कोणतीही लक्षणे दिसून येत नाहीत. पुलाचे खांब देखील उभे करून घेण्यात बांधकाम खाते निष्प्रभ ठरले आहे.
> – श्रावण जाधव, रिक्षाचालक”

## निवडक



### चोरीला गेलेले मोबाईल हस्तगत

**बोर्लीपंचतन** : डीवायएसपी सविता गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली दिघी सागरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिंदे तसेच त्यांच्या पोलीस पथकाने उत्कृष्ट कामगिरी करत चोरीस गेलेले मोबाईल फोन शोधून काढण्यास यश मिळाले आहे. पोलीस पथकाने तांत्रिक तपासासोबत विविध ठिकाणी केलेल्या चौकशीच्या आधारे अल्पावधीतच चोरीस गेलेले मोबाईल हस्तगत केले. संबंधित मोबाईलधारकांना त्यांच्या मोबाईलची परतफेड करून मोठा दिलासा मिळवून दिला. यावेळी भरोडखोलचे माजी सरपंच हरी ओम चोगले व मोबाईलधारक उपस्थित होते. या तत्पर आणि प्रभावी कामगिरीमुळे दिघी सागरी पोलीस ठाण्याच्या कार्यपद्धतीचे सर्वत्र कौतुक होत आहे. नागरिकांच्या सुरक्षेबाबत पोलीस यंत्रणा सज्ज व कटीबद्ध असल्याचे या कृतीतून पुन्हा एकदा दिसून आले.



### आरोही, अंजली यांचे वक्तृत्व स्पर्धेत यश

**महाड** : शिक्षण विभाग पंचायत समिती महाड, रायगड कॉलेज ऑफ फार्मसी मोहोप्रे आणि महाड तालुका विज्ञान गणित अध्यापक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महाड तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन पद्मविभूषण सत्येंद्रनाथ बोस विज्ञान नगरी रायगड कॉलेज ऑफ फार्मसी, मोहोप्रे येथे दि.२५ आणि २६ नोव्हेंबर रोजी उत्साहात पार पडले. सुभाष चंद्रकांत निकम शैक्षणिक संस्थेची ट्विंकल स्टार इंग्रजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने यात सहभाग घेतला होता. यात माध्यमिक गटातून इ. ६ वी ते ८ वीमध्ये आरोही संतोष कदम या विद्यार्थीनीने प्रतिकृती सहभाग घेतला होता. त्यात झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत तिने तालुकास्तरीय प्रथम क्रमांक पटकावला. तर इ.९ ते १२वी या उच्च माध्यमिक गटामध्ये अंजली अभय सिंगने ही प्रतिकृती स्पर्धेत सहभाग घेतला होता. त्यात झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत तालुकास्तरीय द्वितीय क्रमांक पटकावला. याबद्दल संस्थेकडून त्यांचे कौतुक करण्यात आले.

### सामाजिक कार्यकर्त्यांचा सन्मान



**कर्जत** : प्रतिवर्षाप्रमाणे श्री स्वामी समर्थ मठ पळसदरी येथे श्री दत्त जयंती उत्सव उत्साहात साजरा झाला. श्री दत्त जयंतीनिमित्त पहाटेपासून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पहाटे काकड आरती, सकाळी महाअभिषेक, श्रीदत्तयाग, दुपारी महाआरती, महाप्रसाद तसेच दुपारी हृषीकेश अभ्यंकर यांनी अभंगरंग हा गायनाचा कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमादरम्यान नेत्रदानासाठी जनजागृती करणारे आणि नागरिकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी कार्य करणारे सामाजिक कार्यकर्ते विजय हरिश्चंद्रे आणि अभिनयाबरोबरच गेली वीस वर्षे पनवेलच्या शांतीवन आश्रमात वयोवृद्धांना व कुष्ठरोगी रूग्णांना दिवाळी भेट देऊन दिवाळी साजरी करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या, सुप्रसिद्ध अभिनेत्री जुई गडकरी यांचा श्री स्वामी समर्थ परिवारातर्फे शाल, श्रीफळ आणि सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

### ‘श्री गुरू दत्तात्रयांचा महिमा अगाध’



**खांब** : पिंपळवाडी-देवकान्हे येथे श्री दत्त जयंती उत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी श्री गुरू दत्तात्रयांचा महिमा अगाध असल्याचे भक्तीमय उद्गार ह.भ.प. दिनेश महाराज कडव यांनी आपल्या किर्तनरूपी सेवेप्रसंगी काढले. गेल्या अनेक वर्षांची यशस्वी परंपरा राखत याही वर्षी पिंपळवाडी-देवकान्हे येथे श्री दत्त जयंती उत्सव सोहळा मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात आला. यावेळी पहाटे अभिषेक व पूजाविधी, श्रीसत्यनारायणाची महापूजा, महाआरती, सायं.६ वा. हरिपाठ सेवा, महाप्रसाद त्यानंतर ह.भ.प.दिनेश महाराज कडव, वांदोळी यांची हरि किर्तन व जागर भजन आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम पार पडले. या सर्व कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी ग्रामस्थ व महिला मंडळ तसेच तरूण मंडळ यांनी मोलाचे सहकार्य केले. दरम्यान या उत्सव सोहळ्यानिमित्त विभागासह संपूर्ण तालुक्यातून मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थिती नोंदवून विविध कार्यक्रमांचा आस्वाद घेतला.




### दिव्यांग मुलांना कॅडबरी वाटप

**पनवेल** : जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून नवीन पनवेल विभागामध्ये रोटरी क्लब आयोजित दिव्यांग जनजागृती रॅली आयोजित करण्यात आली होती. त्यानिमित्ताने आयोजित या रॅलीत सहभागी मुला-मुलींना प्रोत्साहन म्हणून पनवेल शहर वाहतूक शाखेतील वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांच्या सहकार्याने पोलीस उपनिरीक्षक शेरखाने, पोहवा येळे, पोलीस हवालदार चौधरी, पोहवा मुलाणी, पोलीस हवालदार पाटील, पोलीस शिपाई थिटे यांच्याकडून आदई सर्कल नवीन पनवेल या ठिकाणी आल्यानंतर दिव्यांग मुलांसाठी कॅडबरी व पाण्याच्या बाटल्या वाटप करण्यात आल्या. या उपक्रमामुळे दिव्यांग मुलांमध्ये उत्साह आपुलकीची भावना निर्माण झाली असून हा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद आहे. वाहतूक पोलिसांच्या या कार्याचे नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे.

# कामोठे येथे तरुणाला दगडाने मारहाण

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

दगडाने मारून २४ वर्षीय तरुणाला जखमी केल्याप्रकरणी तिघांविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात एक डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

धनंजय सिंग हा कामोठे येथील सोसायटीत राहात असून, २९ नोव्हेंबर रोजी रात्री अडीचच्या सुमारास त्याचा मित्र सुमेध आणि देवदास हे मोठ्याने बोलत असताना, देवदासचे मित्र सचिन बोऱ्हाडे, विघ्नेश पावणेकर आणि राज यांना सुमेध हा देवदासबरोबर भांडत असल्याचे वाटले. म्हणून त्यांनी सुमेधला शिवीगाळ करून दमदाटी केली. सचिन, विघ्नेश आणि राज यांना सुमेधला शिवीगाळ आणि दमदाटी करू नका, असे बोलत असताना त्यांनी धनंजय याच्यासोबत वाद घातला आणि मारहाण केली. त्यानंतर सचिनने बाजूला पडलेल्या दगडाने धनंजयला मारहाण केली आणि जखमी केले.

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे बामणगांव ता. अलिबाग, जि. रायगड येथील निम्मलिखीत वर्णनाची जमिन ही श्री.बाळाराम काळू भगत रा. बामणगांव, ता. अलिबाग जि. रायगड यांचे खुद्द मालकीची आहे. सदर जमिन मिळकत ही माझे अशिल यांनी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा विक्री व्यवहाराचा साठेकरार विद्यमान मालक व माझे अशिलांमध्ये स्वाक्षरीत झालेला आहे. सदर मिळकतीत अन्य कोणाच्याही, कसल्याही तऱ्हेचे कायदेशीर हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास अगर सदर मिळकती बाबत साठेकरार, बयाणापावती, तारण, गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, अगर कोणत्याही मार्गाने गुंतविलेली असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचे पत्त्यावर अथवा रजिस्टर्ड पोस्टाने किंवा प्रत्यक्ष भेटून कळवाव्यात. जर वरील मुदतीत कुणाचीही लेखी हरकत प्राप्त न झाल्यास सदर जमिन मिळकत ही निर्वेध आहे असे गृहित धरून मागाहून आलेल्या हरकती जाणीवपूर्वक सोडून दिलेल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल सदरहू जमिन मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. यांची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकारणी (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| बामणगांव ता.अलिबाग जि.रायगड | ६४ | ०.१८.२० पो.ख. ०.०२.५० एकूण क्षेत्र ०.२०.७० | ४.८१ |

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०४/१२/२०२५

**अँड. जयेंद्र गुंजाळ**
जिल्हा न्यायालय अलिबाग
मो.नं.-७२७६१२९७९९

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनाच्या मिळकत जमिनी यांच्या सदर मिळकतीचे मालक यांचेकडून कायम खरेदी खताने घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदरहू जमिनी ह्या सदर जमिनीचे मालक यांचे प्रत्यक्ष ताबे कब्जांत व वहिवाटीस असुन रेव्हेन्यु रेकॉर्डला ७/१२ सदरी खुद्द त्यांचे नावे दाखल त्या मिळकतीचे रेव्हेन्यु रेकॉर्डप्रमाणे वर्णन खालील लिहीलेप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन -**
**मौजे वडवली तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड**

| जमीन मालकांची नावे | सर्वे/हिस्सा | क्षेत्र हे.आर.पी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| श्री.यशवंत दत्तु पावशे इतर १ | ६६/४/अ | ०.६०.७० | १०.२६ |
| श्री.नथु रावजी कराळे | ६६/४/ब | ०.०९.३० | १.६२ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार मदार, गहान, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी या संबंधीतांनी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे साठेकरार व खरेदीखत व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दबादल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दि.६ डिसेंबर २०२५

**ॲड. योगेश तानाजी आगज**
**(बी.ए.एलएल.बी.)**
पत्ता : फ्लॅट नं. ४०४, चौथा मजला, जी विंग,
नेमिनाथ रेसिडेन्सी मुद्रे, कर्जत, जि.रायगड ४१०२०१.
मो. नं. ७२७६८१७८९०

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनाच्या मिळकत जमिनी यांच्या सदर मिळकतीचे मालक यांचेकडून कायम खरेदी खताने घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदरहू जमिनी ह्या सदर जमिनीचे मालक यांचे प्रत्यक्ष ताबे कब्जांत व वहिवाटीस असुन रेव्हेन्यु रेकॉर्डला ७/१२ सदरी खुद्द त्यांचे नावे दाखल त्या मिळकतीचे रेव्हेन्यु रेकॉर्डप्रमाणे वर्णन खालील लिहीले प्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन -**
**मौजे वडवली तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड**

| जमीन मालकांची नावे | सर्वे/हिस्सा | क्षेत्र हे.आर.पी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| श्री.रघुनाथ रामु मराडे इतर ८ | ६४/२ | ०.२२.०० | ४.३१ |
| श्री.सुरेश पांडुरंग मराडे | ६५/२/ब | ०.०९.१० | १.५६ |
| सौ.सुमन रघुनाथ भगत इतर ६ | ६५/३ | ०.०६.१० | १.०६ |
| श्री.बालाराम दुनकुऱ्या मराडे | ६६/१ | ०.२८.६० | ५.५६ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार मदार, गहान, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे साठेकरार व खरेदीखत व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दबादल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दि. ६ डिसेंबर २०२५

**ॲड. योगेश तानाजी आगज**
(बी.ए.एलएल.बी.)
पत्ता : फ्लॅट नं. ४०४, चौथा मजला, जी विंग,
नेमिनाथ रेसिडेन्सी मुद्रे, कर्जत, जि. रायगड ४१०२०१.
मो. नं. ७२७६८१७८९०

## जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालील प्रमाणे:-

मौजे लोणघर, ता.अलिबाग, जि. रायगड व ग्रुप ग्रामपंचायत कामार्ले हद्दितील खालील वर्णनाची जमिन मिळकत.

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र एकक आर.चौ.मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| लोणघर | २१/२ | ५.९९.६० पैकी ५.७७.१० | ८.४९ |

येणेप्रमाणे वर्णनाच्या मिळकतीपैकी ५.७७.१० एकक आर.चौ.मी. इतके क्षेत्राची मिळकत, त्यातील झाड झाडोरा, वहिवाटीचे हक्क, कुंपण, वगैरे सह अशी मिळकत सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक गावकरी लोक लोणघर तर्फे पंच ०१) श्री.बंडु जोमा पाटील ०२) श्री.प्रभाकर काशिनाथ वर्तक ०३) श्री. प्रविण शांताराम ठाकुर, सर्व मु.लोणघर, पो. नारंगी, ता.अलिबाग, जि. रायगड यांचे मालकी हक्काची व कब्जे वहीवाटीची व निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे मालक यांनी माझे आशिल यांस दिला आहे. माझे आशिल यांनी गावकरी लोक लोणघर तर्फे पंच यांचे सदरहू मिळकतीवरील मालकी हक्काची तपासणी करण्याच्या सुचना दिल्या आहेत. याउपरही सदर मिळकतीत कोणाचाही गहाण, बक्षीस, साठेकरार, दान, फरोक्त, कब्जा, वहीवाटीचे हक्क, कुळ वहिवाट वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, नोटरी सत्यप्रती व कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजण्यात येईल. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख ०५.१२.२०२५

**(ॲड. एस.वाय.बारटके)**
मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड

दिनांक : ०४ डिसेंबर २०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु.-पै. |
|---|---|---|---|---|
| अमोल जगन्नाथ घरत | ८० | १० | १-२५-०० | ०-७८ |
| | ८१ | २/अ | ०-१३-०० | ०-०९ |
| | ९० | ४/अ | ०-७४-३० | ११-६५ |
| | ९० | ४/ब | ०-२०-०० | २-५० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक :- ०४/१२/२०२५
मो. नं. ९१५८२७७७२८

दिनांक : ०४ डिसेंबर २०२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे - नालधे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र चौ.मी | आकार रुपये | पैसे |
|---|---|---|---|---|---|
| रूबी स्टॅनली फुलगाडो स्टॅनली लॉरेन्स फुलगाडो | ७७ | १६ | ३७२.०० | ३७ | २० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक :-०४/१२/२०२५
मो. नं. ९१५८२७७७२८

वकील-असावरी घरत
नि. ७/ड

**अलिबाग येथिल मे. जिल्हा न्यायाधिश सो., रायगड यांचे कोर्टात**

ने. ता. १०/१२/२०२५
दिवाणी चौकशी अर्ज क्र.६८/२०२५

१) श्रीमती. समिक्षा समीर नागवेकर,
वय : ४४ वर्षे, व्यवसाय -शेती
२) सई समीर नागवेकर
वय : १५ वर्षे, व्यवसाय-शिक्षण
३) सर्वेशा समीर नागवेकर
वय : १३ वर्षे, व्यवसाय शिक्षण
नं. १ ते ३ रा. मु. वनवली, पो.नागाव, — अर्जदार
ता. अलिबाग, जि. रायगड
अर्जदार क्र. १ स्वत: करीता व
अर्जदार क्र. २ व ३ यांची
अज्ञान पालनकर्ता म्हणून
मो.

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर समन्स/नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र २ व ३ याचे वडील कै.समीर मोरेश्वर नागवेकर हे दिनांक १७/२/२०२४ मयत झाले. कै.समीर मोरेश्वर नागवेकर यांचे एकत्र कुटूंबाची मौजे खानाव गट नं. २४/५, ४२/१ व ४३/३/ब या मिळकतीपैकी अर्जदार क्र. २ व ३ यांचा अविभक्त हिस्सा हया क्षेत्राच्या मिळकती संदर्भात अर्जदार क्र. १ हि दि गार्डीयन्स ॲण्ड वॉर्डस ॲक्ट १८९० चे कलम ७, ८, २९ व हिंदू मायनॅरिटी ॲण्ड गार्डीयनशीप ॲक्ट १९५६ चे कलम ८ प्रमाणे अर्जदार क्र.२ व ३ याची अज्ञान पालन कर्ता म्हणून नेमणूक करुन मिळणेकरीता व सदंर्भित मिळकत अर्जदार क्र. २ व ३ यांचे वतीने विक्री करणेची परवानगी मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सबब अर्जदार क्र. २ व ३ याची अर्जदार क्र. १ हि अज्ञान पालन कर्ता व त्यांचे वतीने सदंर्भित मिळकत विक्री करण्यास परवानगी देणेस कोणाचीही हरकत असल्यास आपण स्वतः अगर आपले नेमलेले प्रतिनिधी वा वकील यांचे मार्फत या मा. जिल्हा न्यायाधिश, रायगड अलिबाग यांचे न्यायालयात दि. १०/१२/२०२५ रोजी हजर रहावे. हजर न राहिल्यास एकतर्फी काम चालेल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २७/११/२०२५ रोजी माझे सहिनीशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

सही/-
**कनिष्ठ लिपीक**
**जिल्हा न्यायाधिश रायगड**
**अलिबाग-रायगड**

सही/-
**अधिक्षक**
**जिल्हा न्यायाधिश रायगड**
**अलिबाग-रायगड.**

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **नागाव येथे घरी राहून** कामासाठी कपलची आवश्यकता आहे. कामाचे स्वरूप : जेवण बनवणे, घरकाम, गार्डन व स्विमिंग पूलची देखभाल.सुविधा :केअरटेकर रूम, किचन काउंटर, टीव्ही. पगार : रु २५,००० /- प्रति महिना. अधिक माहितीसाठी संपर्क : ७८७५८६६५५५, ८४०८८२९५५५
- **विकणे आहे** - अलिबाग-कुरुळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क :९६२३८४९३४९
- **कुरुळ ता. अलिबाग येथे** दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- **ऑफिसमध्ये कामाला मुलगी** पाहिजे पात्रता- Bsc/Bcom, व Computer ची माहिती वेळ - सकाळी ९-सायं-६:३० ठिकाण-बामणसुरे, चोंढी, पगार-१०,०००महिना, रविवार-सुट्टी. Contact- 9823585321
- **फर्निचर पॅकींगसाठी मुले** पाहिजे शिक्षणाची अट नाही ठिकाण-बामणसुरे, चोंढी, पगार-१२,००० महिना, रविवार-सुट्टी. संपर्क - ९८२३५८५३२१
- **कंपनी अधिकाऱ्यांच्या** ग्रुपकरीता भाडेतत्तवावर १२०० स्के.फुट दोन बेडरूम किचन व हाप बेडरूम ३०० फुट गॅलरीसह अधिकाऱ्यांच्या गाड्यांच्या पार्किंगसह कॉटेज सर्व सोयीयुक्त भाडेतत्त्वावर देणे आहे. दलालचे स्वागत मो.८०१०६३४६५७
- **प्रथम, पुर्नविवाह** सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा, पनवेल गणेश महाकाळ ८८८८९३५७७५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे मिळकतीचे वर्णन:- तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका कर्जत रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कर्जत येथील खालील वर्णनाच्या शेतमिळकत :-

**मौजे :- पिंपळपाडा ता:- कर्जत, जि:-रायगड**

| अ. क | सर्व्हे नं | शेतकऱ्यांचे नांव | एकुण क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | ४४/१/अ/१ | अविक अंजन चटर्जी सुछंदा अंजन चटर्जी | ०.४०.०० | ०.१५ |
| २ | ४४/१/अ/२ | अविक अंजन चटर्जी सुछंदा अंजन चटर्जी | २.९८.०० | २.५५ |
| ३ | ४७/८ | अविक अंजन चटर्जी सुछंदा अंजन चटर्जी | ०.६९.०० | ०.५० |

वर नमुद केलेली मिळकत ही वरील कबजेदाराच्या मालकी हक्कांत व कबजे वहिवाटीत आहे व त्यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना कायमची फरोक्त खरेदी देण्याबाबत वाटाघाट चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध असल्याबदल विद्यमान मालकांने सांगितले आहे. सदर मिळकतीवर कोणचाही, कोणताही, कसलाही कुळ, वहिवाट, ताबाकब्जा, बयाणा पावती, वचनविठी, साठेकरार, खरेदीखत, कुळमुखत्यार पत्र, विकसीत करण्याबाबतचा करार, गहाण, बोजा, पोटगी, चार्ज, मॉर्टगेज, संपादन भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, कर्ज, लिज तबदील, ट्रस्ट, वारसा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार आमचे अशिलांचे वकील यांच्याकडे आपल्या पत्त्यावर पोष्टाने अथवा प्रत्यक्ष संपर्क साधून कायदेशीर पुराव्यांसह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात.

याप्रमाणे ठरलेल्या मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून, तसेच त्या संबंधी कोणाचेही, कोणतेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरण्यात येईल. तसेच मागाहून येणारी कोणतीही हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात घेतलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणर नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण:-कर्जत
दिनांक:- ०६/१२/२०२५

**ॲड. अजित शर्मा**
मो. ९८२१५१९३९३
ऑफिस पत्ता: २२, जस्मिन, मधुसुदन कालेकर मार्ग,
कलानगर, वांद्रे पूर्व, मुंबई. ४०००५१

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनाच्या मिळकत जमिनी यांच्या सदर मिळकतीचे मालक यांचेकडून कायम खरेदी खताने घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदरहू जमिनी ह्या सदर जमिनीचे मालक यांचे प्रत्यक्ष ताबे कब्जांत व वहिवाटीस असुन रेव्हेन्यु रेकॉर्डला ७/१२ सदरी खुद्द त्यांचे नावे दाखल त्या मिळकतीचे रेव्हेन्यु रेकॉर्डप्रमाणे वर्णन खालील लिहीले प्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन -**
**मौजे-वडवली तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड**

| जमीन मालकांची नावे | सर्वे/हिस्सा | क्षेत्र हे.आर.पी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| श्री.नारायण बापु तळपे | ४९/३ | ०.२६.०० | ४.०० |
| श्री.गुरुनाथ सदानंद मसणे | ४९/४ | ०.२५.०० | २.६९ |
| श्री.सुरेश जैतु कराळे | ४९/६ | ०.१६.४० | २.५३ |
| श्री.मनोज गुणाजी कसाळकर | ६९/१३ | ०.२३.०० | ०.२२ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार मदार, गहान, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरुपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे साठेकरार व खरेदीखत व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दबादत आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दि. ६ डिसेंबर २०२५

**ॲड. योगेश तानाजी आगज**
(बी.ए.एलएल.बी.)
पत्ता : फ्लॅट नं. ४०४, चौथा मजला, जी विंग,
नेमिनाथ रेसिडेन्सी मुद्रे, कर्जत, जि. रायगड ४१०२०१.
मो. नं. ७२७६८१७८९०

## पनवेल महानगरपालिका
### शहर अभियंता विभाग
### निविदा सुचना

निविदा सुचना क्र.पमपा/बांधकाम/६६२५/प्र.क्र.०१/४६७१/२०२५ — दिनांक: ०५/१२/२०२५

**शुद्धीपत्रक-१**

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रू (Without GST) |
|---|---|---|---|
| १ | PMC/CE/ २५५/ २०२५-२६ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-अ, खारघर येथील कोपरा तलाव (गणेश तलाव) लगत पादचारी पूल, संरक्षण भिंत व पावसाळी गटार बांधणे. या कामाची शुद्धीपत्रक प्रसिद्ध करणेबाबत. | १,३०,८८,४४५/- |

या कामाच्या ई-निविदेच्या शुद्धीपत्रकाबाबतची माहिती शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.०५/१२/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
**अतिरिक्त आयुक्त -I**
**पनवेल महानगरपालिका**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे-शिंगढोळ, ता. कर्जत, जि. रायगड, येथे असलेली खालील परिशिष्ठमध्ये वर्णनीलेली जमीन मिळकत आमचे अशील १. चंद्रकांत कमलाकर पिंगळे, २. शंकर भुऱ्या पिंगळे, ३. लक्ष्मण कमलाकर पिंगळे, यांनी या जमीन मिळकतीचे विद्यमान मालक प्रियांका मनोज ओसवाल, यांचेकडून कायम खरेदी करायचे ठरवले आहे.

**-:मिळकतीचे वर्णन :-**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|
| १/१८ | १.४८.०० या एकूण क्षेत्रापैकी ०.६५.०० इतके क्षेत्र विक्री करणेचे ठरले आहे. | ०.८९ |

सदरहू जमीन मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व कब्जा वहिवाटीची आहे असे ते सांगतात व तसे जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरून दिसून येत आहे. सदर जमीन मिळकत त्यांच्याकडून आमचे अशीलांनी सर्व हक्कासह कायमस्वरूपी खरेदीखत द्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदर जमीन मिळकतीत कुणाचा काही गहाण, दान, साठेकरार, बक्षीस, फरोक्तखत, लीज, वगैरे कुठलाही हक्क, बोजा किंवा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास तशी लेखी हरकत, पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर पोहोचविणे. वरील मुदतीत कुणाची काहीही हरकत न आल्यास सदरहू जमीन मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू जमिनीच्या विक्रीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर कोणतीही हरकत ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत दि. ०६/१२/२०२५

**हरकत खालील पत्त्यावर नोंदवावी**
**अँड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री.साई सावली, सो.लि. दुसरा मजला, ब्लॉक नं.१०, कर्जत
दिवाणी कोर्टासमोर, ता.कर्जत, जि.रायगड, पिन - ४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

## जाहीरनामा
### श्रीवर्धन येथील मा. उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन उपविभाग श्रीवर्धन यांचे न्यायालयात

आर.टी.एस. अपिल क्र.१३३/२०२५

जफरुल्ला लुतफुद्दीन काजी उर्फ आराई,
वय - ६४ वर्षे, व्यवसाय शेती, — अपिलार्थी
राहणार - आयर मोहल्ला श्रीवर्धन,
ता. श्रीवर्धन, जि. रायगड.

विरुद्ध

जहुर अहमद मेंहदी,
वय-८८ वर्षे, व्यवसाय-निवृत्त,
राहणार- घोली मोहल्ला श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड — उत्तरवादी

ज्या अर्थी अपिलार्थी यांनी मा. उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन यांचे न्यायालयात अप्पर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण यांचे न्यायालयात जा. क्र. कुळवहिवाट / कात- ६/७०ब/अर्ज क्र.०१/२०२५ मध्ये दिनांक २८ ऑक्टोबर, २०२५ रोजी दिलेला आदेश रद्द करणेकरीता अपिल दाखल केले आहे. सदर कामी उत्तरार्थी जहुर अहमद मेंहदी, यांना मा. न्यायालयाकडून पाठविण्यात आलेल्या नोटीसीची बनावणी होऊ शकलेली नाही. सदर अपिलाकामी अपिलाच्या मागणीप्रमाणे वर नमुद उत्तरार्थी यांच्या विरुध्द मा. न्यायालयाने जाहीर नोटीसीचा हुकुम केलेला आहे. त्या अर्थी उत्तरार्थी यांना सदर जाहीर नोटीसीव्दारे कळिवण्यात येते की, उत्तरार्थी यांनी मा. उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन यांचे न्यायालयात दिनांक १८/१२/२०२५ रोजी दुपारी ३ वाजता स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहुन आपले म्हणणे मांडावे त्या दिवशी जर का उत्तरार्थी गैरहजर राहिले अथवा त्यांनी त्यांची कैफियत मांडली नाही तर त्यांना कोणत्याही प्रकारे म्हणणे अथवा कैफियत मांडावयाची नाही असे समजुन सदर अपिलाचा योग्य तो निर्णय देण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दिनांक ४/१२/२०२५ आमच्या सही कोर्टाच्या शिक्क्यानुसार दिले.

**सही/-**
**उपविभागीय अधिकारी**
**श्रीवर्धन विभाग श्रीवर्धन**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळिवणेत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल श्री. जितेंद्र अनंत पाटिल रा. घर नं. ३८९, भोकरपाडा, पोयंजे, रायगड - ४१०२२१ यांनी कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे सावळे, ता. कर्जत, जि. रायगड येथिल मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे-**

| जमीन मालक | सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| १. अंजली नामदेव म्हसे<br>२. नामदेव रामचंद्र म्हसे<br>३. निकेश नामदेव म्हसे<br>४. नियती निकेश म्हसे | १४/३/अ | ०.८६.०० पोखराबा ०.०५.०० एकुण क्षेत्र ०.९१.०० | ०.६० |

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा-कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी हक्क, मृत्युप्रत्रांकित दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळिवणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत. कळावे.

तारीख :- ०६/१२/२०२५

**ॲड. कल्याणी रवी गायकर**
ओम श्रम साफल्य को. ऑप. हौसिंग सोसायटी
कोतवालनगर कर्जत, जि. रायगड
मो.नं. ८४४६१४८७८१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळिवणेत येते की खाली वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल श्री. विठ्ठल बाबु पाटील, रा. बोरगाव व इतर यांचे मालकीची आहे.

**मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेती मिळकत**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| २५ | ५ | २.५५.०० | १.९५ |
| २३ | १ | ०.६६.४० | ५.६३ |

पैकी अविभक्त हिश्याचे क्षेत्र

वरील मिळकतीमधील आमचे अशिलांचा अविभक्त हिस्सा त्यांना कोणासही इतर गहाण, बक्षीस, फरोक्त, साठेकराराने, खरेदीखताने, अखत्यारपत्राने अगर इतर कोणत्याही हक्काने तबदील करणेचा नाही. आमचे अशिल व इतर सहहिस्सेदार यांचे वाटप न झाल्यामुळे तसे कोणी केल्यास आमचे अशिलांवर सदर व्यवहार बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी व त्यानंतर आमचे अशिल संबंधित व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करतील याची नोंद घ्यावी. कळावे.

तारीख - ०६-१२-२०२५

**ॲड. दिपाली राहूल शिंदे,**
बी. एल.एस, एल.एल.बी,
ॲडव्होकेट व नोटरी,
मो.नं-९५६१७१९४९४
९०११७१६००१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळिवण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमीन मिळकती त्यांच्या मालकाकडून विकसनाकरीता घेतलेली आहे.
मौजे-तुपगाव/चौक मानिवली तालुका-खालापूर, जि.-रायगड येथील जमिन मिळकती

| मालकाचे नाव | सर्व नं. /मालमत्ता क्र. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| १) रणजित प्रेमचंद ओसवाल<br>२) मंगल प्यारेलाल परमार<br>३) राजेंद्र रघुनाथ परमार<br>४) रजनीकांत मोतीलाल शाह | ११९ | ० | ०-१८-७० | ३-०० |
| १) रणजित प्रेमचंद ओसवाल<br>२) मंगल प्यारेलाल परमार<br>३) राजेंद्र रघुनाथ परमार<br>४) रजनीकांत मोतीलाल शाह | १/२९४ | | एकूण क्षेत्र ३१९६ चौ.मी व त्यावरील घर मिळकत क्षेत्र ८१० चौ.मी | |
| | १/२९५ | | एकूण क्षेत्र ५०० चौ.मी व त्यावरील घर मिळकत क्षेत्र ८०० चौ.मी | |

तरी सदरची जमीन मिळकती/घर मिळकती ह्या वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकसनाकरीता देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील जमीन मिळकती/घर मिळकती ह्या तदृंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकसनाकरीता देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली जमीन मिळकती/घर मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, कुलअखत्यारपत्र, ताबेकब्जा वगैर कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल विकसनाचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी

दि. ६/१२/२०२५

अधिवक्ता
**स्वप्निल बाबूराव देशमूख**
ऑफिस पत्ता. शॉप नं.२४, मार्वल क्षिप्रा मुद्रे
खुर्द ता. कर्जत जि. रायगड
९२७३२२४६८०/८८३०५६०९६२




## राशीभविष्य

- **मेष** : संमिश्र ग्रहमानामुळे विचारपूर्वक निर्णय घ्यावे. महत्त्वाच्या कामात दिरंगाई टाळावी. प्रकृती सांभाळा.
- **वृषभ** : आर्थिकदृष्ट्या समाधान लाभेल. परिणामांचा विचार करून निर्णय घ्या. मानसिक स्वास्थ लाभेल.
- **मिथुन** : कठीण प्रसंगावर मात करता येईल. अतिआत्मविश्वास बाळगू नका. कौटुंबिक समस्या संभवतात.
- **कर्क** : तुमच्या शब्दाला वजन प्राप्त होईल. अनोळखी व्यक्तिवर विसंबू नका. पुरेशी सहनशीलता राखावी.
- **सिंह** : कार्यक्षमतेत अपेक्षित वाढ होईल. पूर्वीच्या ओळखी कामी येतील. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल.
- **कन्या** : शब्दांचा वापर विचारपूर्वक करा. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी. कौटुंबिक समाधान लाभेल.
- **तूळ** : भागीदारी व्यवसायात मतभेद संभवतात. जुनी येणी पुन्हा रखडतील. उपजत गुणांना वाव मिळेल,
- **वृश्चिक** : महत्त्वाचे निर्णय विचारानं घ्यावेत. प्रलंबित कामं मार्गी लागतील. व्यवसायात उत्तम यश लाभेल.
- **धनु** : कामांचा प्राधान्यक्रम ठरवून घ्या. नव्या कामांना अनुकूलता राहील. धार्मिक कार्याकडे ओढा राहील.
- **मकर** : नव्या जबाबदाऱ्या विचारपूर्वक घ्या. ज्येष्ठांचा सल्ला कामी येईल. विद्यार्थ्यांच्या कलांना वाव मिळेल.
- **कुंभ** : प्रलंबित कामं वेगानं मार्गी लागतील. आर्थिक बाबतीत समाधान लाभेल. व्यवसायात चिंता राहील.
- **मीन** : कारकिर्दीला नवी दिशा लाभेल. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. स्वमताग्रह टाळायला हवा.

## दिनविशेष
### ६ डिसेंबर

**१९५६** : दलित जनतेचे नेते आणि भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महानिर्वाण.
**१९८१** : भारताची पहिली दक्षिण ध्रुवीय प्रदेशाकडे जाणारी मोहीम पणजीहून अंटार्क्टिकाकडे रवाना.
**२०१३** : दक्षिण आफ्रिकेचे ज्येष्ठ नेते नेल्सन मंडेला यांचे निधन.
**२०१५** : केरळमधील प्रसिद्ध वडाक्कूनाथन मंदिराला उत्तम कामगिरीसाठी 'युनोस्को'चा पुरस्कार मिळाला.

## आरोग्यमंत्र
### विकार आधीच समजतील

मेंदू गुंतागुंतीचा असेल तितकेच त्याचे कार्य आणि त्यात होणारे रोग समजून घेणे अधिक कठीण आहे. असे अनेक रोग आहेत, ज्यांची लक्षणे लगेच दिसून येतात. परंतु असे काही आजार आहेत, ज्यांची लक्षणे उशिरा दिसून येतात आणि उपचार करणे कठीण होते. अशा परिस्थितीत वेळेवर अचूक तपास आणि त्यानंतर प्रतिबंधात्मक उपाय हेच सर्वोत्तम निदान आहे. मेंदूचा असाच एक दुर्मीळ आजार म्हणजे सीबीडी अर्थात ब्रेन फॉग. या आजारात चालणे, बोलणे आणि गिळण्यात अडचण येते आणि स्मरणशक्तीही कमजोर होते. परंतु या रोगाच्या वाढीचा वेग मंद असतो. म्हणूनच तो पटकन लक्षात येत नाही. परंतु आता वॉशिंग्टन विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी बायोमार्कर ओळखली आहे जी सीबीडी चाचणीचे परिणाम ८९ टक्के अचूकतेपर्यंत देते. पारंपरिक तपास पद्धतींमध्ये केवळ २५ ते ५० टक्के चाचणीचे निकाल योग्य आढळतात. मेंदूमध्ये एका विशिष्ट प्रकारच्या प्रोटीनचा असामान्य संचय असणं हा मज्जासंस्थेचा एक विकार आहे. हा मेंदूतील रोगांचा समूह असतो ज्यामुळे विचार आणि हालचालींमध्ये समस्या निर्माण होतात. शास्त्रज्ञ म्हणतात की, हे बायोमार्कर सीबीडी असण्याची शक्यता तपासण्यासाठी एक साधन म्हणून विकसित केले जाऊ शकते. त्यामुळे संभाव्य रुग्णांची ओळख पटवणे सोपे होईल. याविषयी पुढील संशोधन सुरू असून लवकरच त्याच्या आधारे मेंदूतील क्लिष्ट आजारांची आधीच माहिती समजू शकेल.



## सफर देशांची
### सुजलाम सुफलाम बांग्लादेश

पूर्वी पाकिस्तानचा भाग असणाऱ्या बंगाली भाषिक प्रांताला १९७१ मध्ये स्वत:ची ओळख मिळाली. आकाराने खूप लहान असणाऱ्या या देशाच्या सीमा भारत आणि म्यानमारला लागून आहेत. ढाका ही बांग्लादेशची राजधानी, इस्लाम प्रमुख धर्म तर बंगाली ही इथली अधिकृत भाषा आहे. हा जगातला आठव्या क्रमांकाचा तर आशिया खंडातला पाचव्या क्रमांकाचा सर्वात जास्त लोकसंख्येचा देश आहे. इथल्या चलनाला टाका असं म्हटलं जातं. रॉयल बंगाल टायगर हा बांग्लादेशचा राष्ट्रीय प्राणी आहे तर मॅगपाय रॉबिन हा राष्ट्रीय पक्षी आहे. फणस हे बांग्लादेशचं राष्ट्रीय फळ आहे. या देशाची भूमी सुजलाम सुफलाम आहे. देशात अनेक नद्या आहेत. या नद्या बंगालच्या उपसागराला मिळतात. बांग्लादेशात सतत पूर येत असतात. त्यावेळी वाहून येणाऱ्या गाळामुळे इथली जमीन सुपीक बनली आहे. जगातल्या तिवरांच्या सर्वात मोठ्या जंगलांपैकी एक जंगल बांग्लादेशात आहे. भात हे इथल्या लोकांचं प्रमुख अन्न आहे. शेती हा इथला प्रमुख व्यवसाय असला तरी कपड्यांची तसंच ज्यूटची निर्यातही मोठ्या प्रमाणावर होते.

## सौंदर्यसाधना
### निवड ब्लश ऑनची

मेकअप करताना प्रत्येक गोष्टीकडे नीट लक्ष द्यावं लागतं. फाउंडेशनच्या रंगापासून मस्कारापर्यंत सगळं काही व्यवस्थित निवडावं लागतं. इतकंच नाही तर मेकअपचं प्रत्येक उत्पादन चेहऱ्यावर योग्य पद्धतीने आणि योग्य प्रमाणात लावावं लागतं. ब्लश हा मेकअपमधला महत्त्वाचा घटक आहे. गालांवरची लाली खुलून दिसण्यासाठी चेहऱ्याच्या आकाराप्रमाणे आणि त्वचेच्या पोतानुसार ब्लशची निवड करायला हवी. ते नीट लावायलाही हवं. चेहऱ्याच्या आकारानुसार ब्लश ऑन लावायची पद्धत समजून घेऊ या.

* बदामाच्या आकाराचा चेहरा असलेल्या महिलांनी सी शेप ब्लश ऑन लावायला हवं. कानाच्या कोपऱ्यापासून चीकबोन्सपर्यंत हलक्या हातांनी ब्लश ऑन लावा. यासाठी ब्रशचा वापर करा. यामुळे चेहऱ्याचा आकार उठून दिसेल. * गोल चेहऱ्याच्या महिलांनी गालांच्या मध्यभागी ब्लश लाऊ नये. गालाच्या मधोमध ब्लश लावल्याने चेहरा जास्त गोल आणि फुगीर वाटतो. हलक्या हातांनी चिक बोन्सना हायलाईट करा. यामुळे चेहरा लांबुळका दिसेल. (क्रमश:)

## पंचांग

**शनिवार, ६ डिसेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, मार्गशीर्ष कृ २, चंद्रराशी : मिथुन, नक्षत्र : मृगशीर्ष/आर्द्रा, योग : शुभ, सूर्योदय ७.०१, सूर्यास्त १७.५९

## फॉरवर्डस

**बंद लिफ़ाफ़े में रखीं चिट्ठी सीं हैं ये ज़िन्दग़ी...**

**पतां नहीं अगले हीं पल क़ौन सा पैग़ाम लें आयें...!**

## फॅशन पॅशन

* प्रिंटेड कुर्ता-पायजमा हा पर्यायही तुमच्याकडे आहे. बोल्ड प्रिंटचा एखादा कुर्ता निवडा. त्याच प्रिंटचा पायजमा घाला.
* लेअरिंगने एथनिक्सची शान वाढते. यासाठी ऑल टाईम फेवरिट पर्याय म्हणजे नेहरू जॅकेट. साध्या प्लेन कुर्त्यावर प्रिंटेड नेहरू जॅकेट घालू शकता. कुर्त्याला साजेसं जॅकेट निवडा. यामुळे तुम्ही उठून दिसाल.
* कॅज्युअल ऑकेजनला तुम्ही शॉर्ट कुर्ता घालू शकता. हा कुर्ता तुम्हाला ट्रेडिशनल लूक मिळवून देऊ शकतो हे लक्षात घ्या. लिनन पँटसोबत शॉर्ट कुर्ता कॅरी करा. (क्रमश:)

## करिअरवाटा
### या चुका टाळा

आजकाल विविध क्षेत्रात स्पर्धा तीव्र होत असताना मुलाखतीच्या तयारीत कसूर राहू देणं अयोग्य ठरतं. नोकरीपूर्वी लेखी परीक्षा, मुलाखती घेतल्या जातात. परंतु साधारणपणे नोकरीसंदर्भात लेखी परीक्षा किंवा मुलाखत झाल्यावर त्या त्या कार्यालयाकडून किंवा कंपनीकडून काही कळवलं जात नाही, अशी अर्ज करणाऱ्यांची तक्रार असते. त्याच वेळी अर्ज केल्यानंतर त्याचं पुढे काय झालं याविषयी उमेदवारांकडून चौकशी केली जात नाही असा तक्रारवजा सूरही आढळतो. शिवाय नोकरी मिळाल्यानंतर रूजू न होणं किंवा त्या संदर्भात काही सूचना न देणं असेही प्रकार आढळतात. अर्थात, नोकरीत रस नसणं, मनासारखी नोकरी नसणं किंवा वेतनाबाबत समाधानी नसणं अशी कोणतीही कारणं असली तरी त्या संदर्भात कंपनीला कळवणं गरजेचं ठरतं. अशा व्यक्तींनी पुन्हा कधी नोकरीसाठी अर्ज केल्यास पूर्वीचा अनुभव लक्षात घेऊन त्याची दखल घेतली जात नाही. त्यामुळे कितीही गरज आणि पात्रता असली तरी नोकरी मिळणं कठीण ठरतं. उमेदवाराने दिलेल्या वेळी मुलाखतीला हजर राहणंही महत्त्वाचं असतं. काही अपरिहार्य कारणाने मुलाखतीसाठी वेळेवर पोहोचणं अशक्य वाटत असेल तर फोन करून तशी कल्पना द्यावी. नोकरी करतानाही वेळेत येण्या-जाण्याबाबत काही अडचण असल्यास मोकळेपणानं कल्पना द्यावी. या बाबी संबंधित कंपन्या तसंच उमेदवारांसाठीही सोयीच्या ठरतात.



## खेचाखेची
### दिवेकर कोण?

मध्यरात्री एका घराजवळ काही अट्टल दारूड्यांचा घोळका जमला.
एकाने दाराची बेल वाजवली आणि विचारले, हे उल्हास दिवेकरांचे घर आहे काय?

वहिनी आतून ओरडल्या,
हो, पण कोण पाहिजे तुम्हाला? काय काम आहे?

दारुडे ओरडले, आमच्यातले दिवेकर कोण आहे ते ओळखून त्याला घरात घ्या...

## वेगळं काही

नासा आणि इस्रोसारख्या अनेक अंतराळ संशोधन संस्था मंगळावर संशोधन करत आहेत. या लालबुंद ग्रहावर वारा वाहत असल्याची बाब समोर आली आहे. मंगळावरच्या हवेचा आवाज ऐकण्यासाठी नासाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी लागेल. पृथ्वीवासीय यानिमित्ताने पहिल्यांदाच या ग्रहावर वाहणाऱ्या वाऱ्याचा आवाज ऐकू शकतील. मंगळावर १० ते १५ मैल प्रतितास या वेगाने वारा वाहत असल्याची नोंद करण्यात आली आहे. मंगळावरची अंतर्गत माहिती मिळवणं हा इनसाईट लँडरच्या निर्मितीमागचा मुख्य उद्देश आहे. हे यान ग्रहाच्या पृष्ठभागावरची उष्णता तसंच भूकंपाविषयीची माहिती गोळ करत आहे.

## गेट रेडी
### व्यक्तिमत्त्व खुलवायचं तर...

आता साऱ्यांनाच नववर्षाचे वेध लागले आहेत. नववर्षाच्या संकल्पांवर भर दिला जात आहे. त्याच बरोबर नव्या वर्षात व्यक्तिमत्त्व अधिक आकर्षक करण्यासाठी कोणते फॅशनेबल कपडे वापरायचे वा कोणत्या ॲक्ससरीजकडे लक्ष द्यायचं याचा विचार सुरू असेल. ॲक्सेसरीज, मेक अप, हेअरस्टाईल्सच्या नवख्या ट्रेंड्सची चलती असताना फॅशनबाबत कोणतीही तडजोड न करण्याची अनेक महिलांची भूमिका असते. त्यादृष्टीने हा कानमंत्र उपयुक्त ठरेल.



* मोठ्या आणि जाड आय ब्रोंची चलती असेल तर पार्लरमध्ये गेल्यावर आय ब्रो फार पातळ करू नका. आय लॅश एक्सटेंशन अवश्य ट्राय करा. याने व्यक्तिमत्त्व आकर्षक दिसेल. * रेड कलर लिपस्टिक्स ट्राय करा. स्कीन टोननुसार शेडची निवड करा. फ्रेंच रेड लिप्स हा हॉट ट्रेंड असू शकतो. * आजकाल विविध प्रकारच्या हेड गिअरची चलती आहे. बाजारात ट्रेडिशनलपासून मॉडर्न आणि फॅन्सी हेडबँड्स उपलब्ध असतात. ते ट्राय करता येतील. * डोळ्यांच्या मेक अपची आवड असेल तर ग्राफिक कॅट आय चा विचार करा. या मेक अप नंतर काजळ, लायनरची गरज नसते. हटके हेअरस्टाईलसाठी बेबी बँग्जसचा पर्याय निवडा.

## सुडोकू ३७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ८ | ६ | ४ | | ७ | | | |
| ४ | | | ५ | २ | ३ | ८ | | |
| ३ | १ | ५ | ८ | | ९ | २ | | |
| ७ | | | ९ | | ५ | ४ | १ | ६ |
| | | | | ३ | | | | |
| ६ | ९ | १ | २ | | ४ | | | ८ |
| | | ४ | ३ | | २ | १ | ८ | ७ |
| | | २ | ७ | ९ | १ | | | ३ |
| | | | ६ | | ८ | ५ | २ | ९ |

**टीप -**
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ३६ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ८ | ७ | २ | ५ | ३ | ८ | ६ | ४ |
| ६ | ४ | ३ | १ | ८ | ७ | ८ | ५ | २ |
| ५ | २ | ९ | ८ | ४ | ६ | १ | ३ | ७ |
| ४ | १ | ६ | ५ | ८ | ९ | ७ | २ | ३ |
| ७ | ९ | २ | ६ | ३ | १ | ५ | ४ | ८ |
| ३ | ५ | ८ | ४ | ७ | २ | ६ | ९ | १ |
| ९ | ३ | ५ | ७ | १ | ४ | २ | ८ | ६ |
| ८ | ६ | १ | ३ | २ | ५ | ४ | ७ | ९ |
| २ | ७ | ४ | ९ | ६ | ८ | ३ | १ | ५ |

## शब्दकोडे क्रमांक ३७



**आडवे शब्द :-**
१) भरीवच्या विरुद्ध
२) पडणे
६) गोदातीरीवरील एक तीर्थक्षेत्र
८) युद्धातील स्फूर्तीदायक घोषणा
१०) सरळ वासा
१२) कापडाचे बोचके
१५) युद्धातील समेट
१६) मस्ती, जोम
१७) रुक्षता
१९) भयंकर
२१) यात्रा करणारा
२२) दिवस, वार (सं.)
२३) मगज
२४) गिरी, डोंगर
२५) पाताळातील नाग
२८) राबता, वहिवाट
३१) वरचा मजला
३२) अंगरखा
३४) प्रतिबिंब, सावली
३६) मान्यतेचा शब्द
३७) कृष्णाकाठचे देवळांचे गाव
३८) नूतन
४०) शहर, गाव
४२) पचण्याची क्रिया
४५) घोंगडी विणणारी जमात
४८) नगण्य किंमत
५१) गंमतशीर
५४) दशानन
५५) महाल, राजमहाल
५७) शोध, माग
५८) अस्वल
५९) देवापुढे दिवे लावणे
६१) अनिर्बंध
६५) डावा
६६) एक हजार ग्रॅम द्रवपदार्थ
६८) ओळ, रांग
६९) खायला प्यायला न मिळणे
७०) अथवा, किंवा
७१) अंत:करण.

**उभे शब्द :-**
१) मुलगा
२) पुन्हा
३) मरेपर्यंत
४) पुरुष
५) स्वस्तच्या विरुद्ध
६) जन्मपत्रिकेवरून ठेवलेले नाव
७) वाळवी, उणीव
९) मरगज रत्नाचे एक नाव
११) रक्षा, अंगारा
१३) लाथाडणे
१४) मोठे रांजण
१८) कोवळ्या दुधाचा पदार्थ
२०) दडून बसणे
२२) सरळ नसलेली
२३) गणेशाचे एक नाव.
२६) माफी मागणारा
२७) पटाईत
२९) जपानी चलन
३०) खाज
३३) औषध
३४) पंख, दुसरा
३५) ठसा
३९) गंध, मुक्काम
४०) अस्सल माल
४१) उष्ण
४३) लोणी
४४) एकमेकांपुढे, आमने सामने
४६) साडीचा एक प्रकार
४७) ह्या वर्षी
४९) अल्प, थोडे
५०) तसराळे
५२) कसाबसा
५३) पहाऱ्याचे काम
५६) मच्छर
६०) संरक्षक भिंत
६२) गेरु
६३) कडक
६४) बाळाचा पाणी मागण्याचा शब्द
६५) आघात, प्रहार
६७) दारुचा एक प्रकार

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# कलासक्त



# काळी खडक

## भयाचे वलय आणि निसर्गाचे अभेद्य कवच!

धनंजय शेटये

गावाच्या वेशीवर उभा असलेले ते महाकाय, काळेशार कातळ 'काळी खडक'! नुसते नाव जरी उच्चारले तरी जणू काळजातल्या धडधडीत एक बारीक खटका वाजून जातो. दिवसाच्या उन्हातही जिथे सूर्यकिरणांची पायपीट कमी, तिथे रात्रीचे भय तर कल्पनाही करवत नाही. तो परिसर म्हणजे जणू निद्रिस्त राक्षसाचा प्रचंड देहगडद, गुंतागुंतीचा, अढळ! त्याच्या पायाशीच उभे असलेले पुरातन वडाचे झाड आभाळाला टेकणाऱ्या फांद्यांचं सम्राज्य! त्या वडाचा निष्ठूर साया म्हणजे काळोखाचा दरबारच जणू. एकाकीपणाला छेदणाऱ्या घुबडांच्या कर्कश आवाजांनी रात्रीच्या शांततेला विचित्र थरार यायचा. अधूनमधून गिधाडांची घिरट्याजणू मृत्यूची सावली अगदी हाताशीच फिरत आहे असा भास! स्वाभाविकच, त्या अंधाऱ्या रस्त्यावरून रात्रीच्या वेळी जाण्याची हिंमत गावकऱ्यांनाही नव्हती; यमदूतालाही नसेल!

सह्याद्रीच्या कुशीतला तो वनमय पट्टा म्हणजे लोककथा, दंतकथा, अंधश्रद्धा, भीती आणि निसर्गाची अदृश्य शक्तीया सगळ्यांचा संगम. काळी खडक हे नाव जणू भीतीचे नंदनवन! जवळपास दीड मैलांपर्यंत मानवी वस्ती नाही, दिवसा चिटपाखरू नाही, तरीही संध्याकाळच्या वेळेला एखाद्या घरगुती स्वयंपाकाचा खमंग वास दरवळायचा! कधी गोड पदार्थाचा गंध, कधी मटणाचा... पण, त्या ओसाड माळावर स्वयंपाक करणारं कोण? हा प्रश्न आजही स्मृतीत काट्यांनी कोरलेला आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळातील दरोडेखोरांचे 'वाघरान' इथेच! तालुक्याला, आठवडी बाजाराकडे जाणारा एकमेव मार्ग आणि त्यावर 'काळी खडक'चा नको इतका प्रभाव. त्याच्या शेजारीच घनदाट अरण्यपुरातन, सामर्थ्यशाली आणि कधीही न तुटलेल्या शापासारखे शांत. लोकांच्या मते, हे संपूर्ण क्षेत्र अदृश्य शक्तींनी व्यापलेले. म्हणूनच कधीकाळी येथे झाडांची एकही फांदी तोडण्याची हिम्मत नव्हती. या भीतीमुळेच जणू येथे निसर्गाची अभेद्य तटबंदी झाली होती. वाघ, अस्वल, साळिंदर, कोल्हे, रानडुक्कर मुक्तपणे वावरत.

अंधश्रद्धा म्हणावी की लोकांची कुटुंबवेडी कल्पनाशक्ती; अमावस्येच्या रात्री कोहळे, लिंबं, पिसं, राक्षसी विधींचे अवशेष दिसायचे. त्या रात्री वाऱ्याच्या झुळुकीतही काहीतरी विचित्र दडलेलं असायचं. गावाची सीमा! देवदेवस्कीतला पवित्र पट्टा! या 'काळ्याखडकी'ला एक अलौकिक मान्यता लाभली होती.

बालपणीच्या आजोबांच्या आणि आजीच्या गोष्टींनी तर या ठिकाणाला माझ्या मनात एक वेगळंच, अंधारमय, गूढ साम्राज्य बनवून टाकलं होतं. आजही त्या आठवणींना हात लावला की अंगावर सरसर काटा उभा राहतो. कधी कधी मनात प्रश्न उगवतोइतकी सुंदर सपाट जमीन, कातरवेळी सोनेरी उजेड पसरवणारा गालिचा, आणि निसर्गाचं अप्रतिम दान मग अशी पृथ्वीभूवरील रम्य जागा 'भूतपिशाच्चांचा अड्डा' का ठरावी?

कदाचित, त्या विशालकाय कातळांच्या उंचीवर बसून अदृश्य आत्म्यांना देखील निसर्गाच्या शीतल स्पर्शाची भुरळ पडली असेल. आपण जसे आनंद घेतो, तसे तेही घेत असतील, कुणाला ठाऊक! खरे तर, पूर्वीची माणसं अंधश्रद्धाळू नव्हती; उलट ती निसर्गाची खरी राखणदार होती. भीती दाखवून का होईना, पण त्यांनी वनराई जपली, प्राण्यांना आसरा दिला, पर्यावरणाचे संतुलन राखले.

आज आपण म्हणतो ते 'इको-फ्रेंडली' काम तेव्हा त्यांच्याकडून सहजतेने घडत होतं. पण, बदलाचे वारे अनावर झाले की निसर्गकिल्लाही हलतोच. आज 'काळीखडक'वर ''निसर्गाच्या सान्निध्यात बंगला!'' अशा जाहिराती झळकतात. जिथे माणूस रात्री एकटा चालायलाही भीत होता, तिथे आज वसाहती उभ्या आहेत. प्लॉट्स विकले जात आहेत. कातळांची आणि जंगलांची ओंजळ मोडली जात आहे.

गावांचं गावपण शहराच्या चमकदार मोहात वितळू लागलं आहे. गावकऱ्यांना शहरी संस्कृतीचे आकर्षण आणि शहरात राहणाऱ्यांना गावाच्या निःशब्द सौंदर्याचे! अशा दोन टोकांच्या खेळात निसर्ग मात्र सतत जखमी होत चालला आहे. भावी पिढीला झाडं, वेली, वाघ, कोल्हे हे सर्व फक्त भिंतीवरील चित्रांत किंवा पुस्तकांत पाहावं लागेल का, हा भीतीदायक प्रश्न सतत मनाला कुरतडत राहतो.

निसर्ग उदार आहे, माणूस मात्र निष्काळजी. निसर्गाचा नाश म्हणजे आपल्याच अस्तित्वाचा अंत! 'काळी खडक' आजही धीराने, निःशब्दतेने त्या काळाची, त्या भयाची, त्या सौंदर्याची आणि त्या पवित्र समतोलाची साक्ष देत उभा आहे. त्याच्या सावलीतला प्रत्येक क्षण आपल्याला सांगतो; निसर्गाचा आदर करा, नाहीतर निसर्गसत्तीने आपल्याला नमवेल! •

# रिंकू राजगुरूचा 'आशा'

## एक प्रभावी आणि हृदयस्पर्शी सिनेमा

साभार सोशल मीडिया

मराठी चित्रपटसृष्टीत स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारी अभिनेत्री रिंकू राजगुरू आता एका अगदी सामाजिक आणि जिव्हाळ्याच्या कथेसह प्रेक्षकांसमोर येत आहेनवीन मराठी चित्रपट 'आशा'. सैराटमधील आर्चीपासून ते आजच्या संवेदनशील भूमिकांपर्यंतचा तिचा प्रवास पाहताना तिच्या अभिनयातील प्रगल्भता स्पष्ट जाणवते. 'आशा' हा चित्रपट विशेषतः या कारणासाठी महत्त्वाचा आहे की यात रिंकू एक आशा सेविका म्हणून दिसते. ग्रामीण आरोग्यव्यवस्था आणि गावोगावी लोकांच्या आरोग्यासाठी अहोरात्र काम करणाऱ्या महिलांचे प्रतिनिधित्व करणारे पात्र.



चित्रपटात रिंकूने साकारलेली मालती ही एक साधी, धडपडी आणि जबाबदार आशा सेविका आहे. गावातील लोकांच्या आरोग्याबाबत जागरूकता वाढवणं, गर्भवती महिलांची काळजी, लसीकरण मोहिमा, आपत्कालीन प्रसंगी मदतअशा कामांच्या अत्यंत मेहनती आणि संघर्षमय जगात मालती दिवसेंदिवस झोकून घेताना दिसते. तिच्या कामात येणाऱ्या अडचणी, समाजातील गैरसमज, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि स्वतःच्या भावनांशी लढताना ती ज्या धीराने उभी राहते, त्याचे दर्शन 'आशा'मध्ये अत्यंत वास्तववादी पद्धतीने घडते.चित्रपटाचा दिग्दर्शक दीपक पाटील यांनी कथेला प्रामाणिकपणा आणि वास्तवाची जाण देत संवेदनशील दिग्दर्शन केले आहे. रिंकू सोबत अनुभवी कलाकारांचा उत्तम सहकार्य, ग्रामीण वातावरणातील तांत्रिक मांडणी, आणि कथा सांगण्याची सहजता हे चित्रपटाचे खास पैलू आहेत. चित्रपटाची पटकथा आशा सेविकांच्या आयुष्यातील चढ-उतारांना प्रकाशात आणते. कधी प्रेरणादायी तर कधी डोळ्यात पाणी आणणारी.

'आशा'ने प्रदर्शनाआधीच अनेक पुरस्कार पटकावले आहेत, ज्यात रिंकू राजगुरूला मिळालेला सर्वोत्कृष्ट अभिनेत्री पुरस्कार विशेष ठरतो. तिच्या अभिनयातील नैसर्गिकता, साधेपणा आणि भावनिक खोली या चित्रपटात अधिक उठून दिसते. मालतीच्या रूपात तिने केवळ एक भूमिका केली नाही, तर हजारो आशा सेविकांच्या आवाजाला पडदा दिला आहे.समाजातील दुर्लक्षित पण अत्यंत महत्त्वाच्या महिला आशा सेविका यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारा हा चित्रपट प्रेक्षकांच्या मनाला स्पर्श करून जातो. रिंकूचा 'आशा' हा सिनेमा मनोरंजनापुरताच मर्यादित नसून, समाजाला विचार करायला भाग पाडणारा, प्रेरणा देणारा आणि त्यांच्या कामगिरीचा सन्मान करणारा आहे. •

# पुजा बिरारीचे 'रिअल' लग्न

टीव्ही अभिनेत्री पूजा बिरारी लवकरच विवाहबंधनात अडकणार असून तिच्या लग्नाच्या तयारीला आता वेग आला आहे. आदेश बांदेकर आणि सुचित्रा बांदेकर यांचा मुलगा अभिनेता-निर्माता सोहम बांदेकर सोबत पूजा लग्नगाठ बांधणार आहे. नुकताच पार पडलेला पूजाचा मेंदी सोहळा सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरला. या सोहळ्यातील रंगीबेरंगी फोटो आणि व्हिडिओ चाहत्यांनी मोठ्या प्रमाणावर शेअर केले आहेत. पूजाने स्वतःही तिच्या मेंदीचे खास फोटो तसेच मजेशीर रील पोस्ट करून चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. पूजा-सोहमच्या विवाहाची चर्चा रंगत असताना अभिनेत्रीच्या आयुष्यातील एक सुंदर योगायोगही विशेष ठरत आहे. वास्तविक आयुष्याबरोबरच ती ऑन-स्क्रीन अर्थात 'रील लाइफ'मध्येही लवकरच वधूची भूमिका साकारते आहे. पूजाच्या सध्या प्रसारित होत असलेल्या 'येड लागलं प्रेमाचं' या मालिकेतही कथानक लग्नसोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पुढे सरकत आहे. हा कार्यक्रम लोकप्रिय ठरला असून मालिकेत तिच्यासह अभिनेता विशाल निकम मुख्य भूमिकेत दिसत आहे. मालिकेत त्यांच्या पात्रांची नावे 'राया' आणि 'मंजिरी' अशी आहेत. पूजाच्या लग्नसोहळ्याचे पुढील कार्यक्रम आणि विधींची अधिक माहिती लवकरच समोर येईल.



# समांथाचे लग्न!



दक्षिण भारतीय अभिनेत्री समांथा रुथ प्रभू आणि दिग्दर्शक-निर्माता राज निदिमोरू यांच्या विवाहाविषयी गेल्या काही दिवसांमध्ये सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात चर्चा रंगली. काही संकेतस्थळांनी दिलेल्या माहितीनुसार, एक डिसेंबर रोजी कोईंबतूर येथील ईशा योग केंद्रात अत्यंत निवडक पाहुण्यांच्या उपस्थितीत या दोघांचा विवाहसोहळा गुपचूप पार पडला. साधेपणात झालेल्या या सोहळ्याला अंदाजे तीस व्यक्ती उपस्थित असल्याची माहितीही समोर आली. समंथाने पारंपरिक लाल साडी नेसली होती अशीही चर्चा आहे. या चर्चांनी जोर धरला असला, तरी समंथा किंवा राज यांच्याकडून अधिकृत पुष्टी देण्यात आली नाही.

# 'बिग बॉस'मधील स्पर्धकांची पोलखोल



'बिग बॉस १९' आता ग्रँड फिनालेच्या दिशेने वाटचाल करत आहे. घरातील वाढता तणाव, मीडिया राउंडमधील तिखट प्रश्न आणि सलग होणारे एविक्शन यामुळे या शोने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. गेल्या वीकेंडमध्ये झालेल्या 'डबल एविक्शन'नंतर स्पर्धा आणखी तीव्र झाली असून आता फक्त सहा स्पर्धक मैदानात उरले आहेत. अशनुर कौर आणि शेहबाज बदेशा यांना घराबाहेरचा रस्ता दाखवण्यात आला. या आठवड्यात प्रदर्शित करण्यात आलेल्या ताज्या प्रोमोने तर घरातील वातावरण अधिक तापवून टाकले.

'मीडिया राउंड'साठी काही पत्रकारांना घरात प्रवेश देण्यात आला असून त्यांनी स्पर्धकांवर कठोर प्रश्नांचा वर्षाव केला. अनेकजणांना 'शेर की खाल में लोमड़ी', 'बदतमीज' आणि 'दिखावा' अशा आरोपांना सामोरे जावे लागले. शोच्या 'टॉप ६'जणांच्या यादीमध्ये गौरव खन्ना, अमाल मलिक, तान्या मित्तल, मालती चहर, फरहाना भट्ट, प्रणित मोरे यांचा समावेश राहिला. काही सर्वेक्षणांनुसार गौरव खन्ना आणि फरहान भट या दोन स्पर्धकांना आघाडी मिळत असल्याचे दिसत आहेत, तर तान्या मित्तललाही चाहत्यांचा पाठिंबा मिळत आहे. याच दरम्यान, मराठी प्रेक्षकांसाठीही एक महत्त्वाचे अपडेट समोर आले आहे. अभिनेता रितेश देशमुखने हिंदी बिग बॉसच्या सेटवर हजेरी लावल्यानंतर मराठी सिझनच्या घोषणेची चर्चा रंगू लागली आहे. शोच्या नव्या सिझनविषयी अधिकृत घोषणा अद्याप झालेली नसली तरी, या भेटीनंतर 'बिग बॉस मराठी ६' लवकरच सुरू होण्याची शक्यता असल्याचे संकेत आहेत.

# मराठी ओटीटीवर 'बे दुणे तीन'ची हवा

नोव्हेंबर महिन्याअखेरीस ओटीटी प्लॅटफॉर्मवर एकापेक्षा एक नवे चित्रपट, मालिका प्रदर्शित झाल्या असून प्रेक्षकांकडून त्यांना संमिश्र पण उत्साही प्रतिसाद मिळत आहे. नुकतीच गुन्हेगारी तपासावर आधारित 'दिल्ली क्राईम सीझन ३' ही बहुचर्चित सिरिज प्रेक्षकांच्या भेटीस आली होती. पहिल्या दोन भागांप्रमाणेच या सिझनमध्येही उत्तम लिखाण, तपासाची आणि प्रकरणातील गुंतागुंत, त्याची मांडणी आणि दमदार अभिनय यामुळे मालिकेला प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. याचसोबत 'रोमियो स्क्वॉड' ही नवी ॲक्शन-थ्रिलर मालिका तरुण प्रेक्षकांना भावली असून वाढणाऱ्या गुन्हेगारीवर भाष्य करणाऱ्या कथानकामुळे मालिकेची चर्चा वाढली आहे. दक्षिण भारतीय कंटेंटमध्ये 'शक्ती' हा तमिळ ॲक्शनपट या आठवड्यात दाखल झाला. थिएटरमध्ये हिट ठरलेला हा चित्रपट ओटीटीवरही तितकाच लोकप्रिय ठरत असून दमदार ॲक्शन सीन्स आणि प्रभावी भूमिका यामुळे प्रेक्षकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.



मराठी कंटेंटच्या बाबतीत या आठवड्यात ओटीटी रिलीज 'बे दुने तीन' कडे प्रेक्षकांचे लक्ष लागले. 'झी ५'ने निर्मिलेली ही हलकी-फुलकी कॉमेडी वेब-सीरिज प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. कुटुंबातील तीन पिढ्यांमधील नातेसंबंध, ताणतणाव, प्रेमळ चढउतार आणि त्यातून निर्माण होणारा विनोद यावर ही मालिका बेतलेली असल्यामुळे प्रेक्षकवर्ग आधीपासूनच उत्सुक आहे. या मालिकेचे पोस्टर आणि टीझर प्रसिद्ध झाल्यानंतरच सोशल मीडियावर याबद्दल चर्चा वाढली. विशेषतः हलक्या-फुलक्या मराठी वेब-कंटेंटची मागणी वाढत असताना 'बे दुणे तीन' चांगला पर्याय ठरु शकतो.



# सूर देणारा तंबोरा

तंबोरा किंवा तंबूरा अथवा तानपुरा हे भारतीय शास्त्रीय संगीतात वापरले जाणारे एक अत्यंत महत्त्वाचे तारवाद्य आहे. हे स्वतः धून किंवा गाणे वाजवत नाही. पण ताल आणि सूर यांना आधार देणारा सततचा झंकार निर्माण करते. त्यामुळे गायक किंवा वादकाला आपला स्वर बरोबर ठेवायला मदत होते. त्यामुळे हे साथ वाद्य म्हणून ओळखले जाते.

तंबोऱ्याचे शरीर प्रामुख्याने तुंब्यापासून म्हणजेच भोपळ्यासारख्या मोठ्या वाळलेल्या फळापासून तयार केले जाते. त्याला लांब पोकळ लाकडी दांडा जोडलेला असतो. या दांड्यावर चार किंवा पाच तार लावलेल्या असतात. काही तंबोऱ्यांमध्ये सहा तारा असतात. या तारांवर लाकडी किंवा हाताने घडवलेले छोटे पूल असतात. त्यांना जवरी म्हणतात. तार हळूवारपणे बोटांनी किंवा नखांनी ओढल्या की त्याचा आवाज शांत, घुंगुर आवाजासारखा घुमायला लागतो.

**वाद्यांची ओळख**

तंबोरा दोन प्रकारचा असतो. पुरुष तंबोरा आणि स्त्री तंबोरा. पुरुष तंबोरा आकाराने मोठा आणि आवाजाने घनद असतो. स्त्री तंबोरा थोडासा लहान आणि किंचित बारीक स्वराचा असतो. तंबोऱ्याच्या तारा सामान्यतः सा-पा-सा-सा या श्रुतीत ट्युन केल्या जातात. पण काही वेळा रागानुसार वेगळ्या पद्धतीनेही बांधल्या जातात.

आजकाल इलेक्ट्रॉनिक तंबोरेही वापरले जातात. कारण ते सोयीस्कर आणि वाहून न्यायला हलके असतात. मात्र खऱ्या तंबोऱ्याची झंकार आणि नैसर्गिक कंप प्रत्येकाला शांतता आणि ध्यानासारखा अनुभव देते. म्हणूनच कोणतेही शास्त्रीय गायन तंबोऱ्याशिवाय अपूर्ण मानले जाते. तंबोरा हे फक्त वाद्य नाही तर संगीतातील स्थैर्य आणि श्रद्धेचे प्रतीक मानले जाते.



# उंच आणि विशाल काराकोरम पर्वतरांगा

काराकोरम पर्वतरांग ही हिमालयासारखीच उंच आणि विशाल पर्वतरांग आहे. तिचे स्वरूप अधिक कठीण आणि खडबडीत आहे. ही पर्वतरांग भारत, पाकिस्तान आणि चीन या तिन्ही देशांच्या सीमेवर पसरलेली आहे. इथले हवामान इतके थंड असते की वर्षभर बर्फ पडतच राहतो. काही ठिकाणी तर बर्फ कधीच वितळत नाही. त्यामुळे या भागाला थंड वाळवंट असे नाव दिले गेले आहे. काराकोरममध्ये




जगातील काही सर्वांत उंच पर्वतशिखरे आहेत. त्यापैकीके २ हे माउंट एव्हरेस्टनंतर दुसऱ्या क्रमांकाचे उंच शिखर आहे. अनेक पर्वतरोहक हे शिखर सर करण्याचे स्वप्न पाहतात, पण ते



खूप धोकादायक आणि कठीण आहे.

या पर्वतरांगेत सियाचिन हिमनदी नावाचा जगातील सर्वांत उंच भागात असलेला हिमनदीचा प्रदेश आहे. तापमान कधी कधी उणे ५० अंशांपर्यंत खाली जाते. काराकोरममध्ये प्राणी आणि वनस्पती फारच कमी प्रमाणात आढळतात. कारण इथे ऑक्सिजन कमी असतो. बर्फाच्छादित जमीन लागवडीसाठी योग्य नसल्यामुळे मानवी वस्तीही अतिशय कमी आहे. इतक्या कठीण परिस्थितीतही भारतीय सैन्याचे जवान देशाच्या रक्षणासाठी पहारा देत उभे असतात.

**ओळख पर्वतांची**

या पर्वतरांगेतून अनेक नद्यांना पाणी मिळते. सिंधू नदीच्या काही उपनद्या इथूनच उगम पावतात. त्यामुळे हा प्रदेश भारत आणि पाकिस्तान दोघांसाठीही महत्वाचा आहे. पाकिस्तान आणि चीनला जोडणारा काराकोरम हायवे हा जगातील सर्वांत उंच रस्त्यांपैकी एक आहे. हा परिसर सामान्य लोकांसाठी राहण्यास योग्य नाही. तरीही त्याची भव्यता, बर्फाच्छादित शिखरांची चमक आणि गहन शांतता थक्क करणारी आहे. काराकोरम पर्वतरांग म्हणजे निसर्गाचे एक अप्रतिम आणि शक्तिशाली रूप होय.

# डेस्टिनेशन सायन्स

दोस्तांनो, दहावी-बारावीनंतर करीअरची कोणती वाट निवडायची असा प्रश्न पडतो. विज्ञान शाखेतल्या प्रत्येक विद्यार्थ्याला डॉक्टर



किंवा इंजिनिअर होता येत नाही. पण यामुळे निराश होण्याची आवश्यकता नाही. या शाखेतील विद्यार्थ्यांसाठी इतर अनेक क्षेत्रांमध्ये संधी उपलब्ध झाल्या आहेत. विज्ञान शाखेतल्या संधींवर एक नजर टाकू या...

**कोण होणार?**

✻ गणितात प्राविण्य असणारे विद्यार्थी पॉलिटेक्निकची निवड करू शकतात. तुम्हाला बँकेच्या परीक्षाही देता येतील. यासोबतच नौदल, लष्कर आणि हवाईदलातल्या नोकऱ्यांसाठी अर्ज करता येईल. एमबीबीएस करणं शक्य नसेल तर होमिओपॅथी, आयुर्वेद यासारख्या पर्यायांची निवड करता येईल.

✻ नर्सिंग, बी फार्म यासारखे पर्यायही तुमच्याकडे आहेत. जेईई परीक्षा देणं कठीण वाटत असेल तर राज्याच्या इंजिनिअरींग प्रवेश परीक्षा देता येतील. सिव्हिल, इलेक्ट्रॉनिक, मॅकेनिकल यांसारख्या पारंपरिक शाखांसोबतच बायोटेक, पर्यावरण यासारख्या शाखांमध्येही संधी आहेत. अशा नव्या वाटा निवडण्याकडे विद्यार्थ्यांचा कल दिसून येतोय.

# बनवा खास पदार्थ

छोट्या दोस्तांनो, तुम्हाला जेली आवडत असेल. विविध रंगी जेली पाहताच खावीशी वाटते. डेझर्टसोबतही जेली छान लागते. अमेरिकेत जेलीला जेल-ओ असं म्हटलं जातं. तापमानानुसार जेलीचा आकार बदलतो. ० ते २० अंश सेल्सियस तापमानात जेली सेट होते. पण यापेक्षा तापमान थोडं वाढलं तरी जेली वितळायला लागते. तापमान कमी झाल्यावर ती पुन्हा घट्ट होते. जेली सेट करण्यासाठी कोणत्या घटकाचा वापर केला जातो, हे तुम्हाला माहीत आहे का? यासाठी जिलेटिनचा वापर केला जातो. जिलेटिन हा जेल बनवणारा घटक आहे. प्राण्यांच्या शरीरातल्या टिश्यूंमध्ये सापडणाऱ्या कोलाजन नामक प्रथिनांचा वापर करून जिलेटिन तयार केलं जातं. त्यासाठी विशिष्ट प्रक्रिया अवलंबवली जाते. प्राण्यांच्या टिश्यूंपासून कोलाजनचे तंतू वेगळे होतात. त्यांची पाण्यासोबत प्रक्रिया घडते आणि जिलेटिन तयार होतं. अगदी एक टक्का कोलाजन पाण्यात वितळवल्यानेही जिलेटिन तयार होऊ शकतं.



**नॉलेज अपडेट**

जिलेटिनमध्ये प्रथिनांची मोठी साखळी असते. गरम पाण्याशी संपर्क आल्यानंतर त्यांचं रूपांतर सूक्ष्म तंतूंमध्ये होतं. हे तंतू पाण्यातल्या सूक्ष्म कणांना स्वत:कडे आकर्षित करतात. यामुळे पाण्यातल्या सूक्ष्म कणांची संख्या कमी होते. हे मिश्रण थंड झाल्यानंतर पाणीयुक्त सूक्ष्म कण एकमेकांवर आदळतात आणि गुंतून बसतात. उरलेलं पाणी प्रथिनांच्या तंतूंमध्ये एकत्र बांधलं जातं आणि या मिश्रणाचं रूपांतर जेलमध्ये होतं. मार्शमॅलो आणि आईस्क्रीममध्येही जिलेटिनचा वापर केला जातो. काही वेळा जिलेटिनऐवजी स्टार्च आणि पेक्टिनचा वापर करूनही पदार्थांना घट्टपणा दिला जातो. स्टार्च आणि पेक्टिन हे साखरेचे प्रकार आहेत. त्यांना गुंतागुंतीची कर्बोदकं असंही म्हटलं जातं. तर मग पुढच्या वेळी जेलीचा आनंद लुटताना ही माहिती लक्षात ठेवणार ना?

# ॲटलस आणि आकाशाचा भार

खूप वर्षांपूर्वी पृथ्वीवर टायटन नावाचे राक्षस राहत होते. एकदा टायटन्स आणि देवांमध्ये मोठे युद्ध झाले. या युद्धात देव जिंकले. देवांचा राजा झुआस याने टायटनांना शिक्षा दिली. ॲटलस हा सर्वात बलवान टायटन होता. शिक्षा म्हणून झुआसने त्याला संपूर्ण आकाश आपल्या खांद्यावर उचलायला सांगितले. ॲटलसने ही शिक्षा मान्य केली. त्याने आपल्या खांद्यावर आकाश उचलले आणि तो दिवस-रात्र डोंगरावर उभा राहून तारे, ढग, सूर्य, चंद्र हे सर्व आपल्या खांद्यावर पेलू लागला. कधी कधी तो दमून जायचा. पण त्याच्याकडे पर्याय नव्हता.





एकदा हिराक्लेस नावाचा देवदूत त्याच्याकडे आला. त्याला एका जादुई सफरचंदासाठी ॲटलसची मदत हवी होती. त्याने ॲटलसला तशी विनंती केली

**ग्रीक लोककथा**

ॲटलसने म्हटले, ठीक आहे, मी सफरचंद आणतो. पण तू थोडा वेळ माझ्यासाठी आकाश धर. हिराक्लेसने ते मान्य केले.

ॲटलस जादुच्या बागेत गेला. सफरचंदाच्या झाडाचे रक्षण करणाऱ्या काळ्या दुष्ट नागाला त्याने ठार मारले आणि तो सफरचंद घेऊन परत आला. खांद्यावर आकाश नसल्यामुळे त्याला अगदी मोकळे मोकळे आणि छान वाटत होते. त्यामुळे ॲटलसला वाटले, हिराक्लेसला कायम आकाश धरायला लावू या.

पण हिराक्लेस हुशार होता. त्याने म्हटले, ठीक आहे, मी धरतो. पण ते थोडे घसरले आहे. आधी तू ते धर आणि थोडे नीट खांद्यावर बसवून दे. ॲटलसने क्षणभर आधार दिला आणि आकाश धरले. ती संधी साधून लगेच हिराक्लेस सफरचंद घेऊन निघून गेला. अजूनही बिचारा ॲटलस आकाश धरून उभा आहे.




# बनवा कागदी चष्मे

छोट्या दोस्तांनो, उन्हाळा सुरू झाला आहे. उन्हापासून डोळ्यांचं रक्षण करण्यासाठी गॉगल घातला जातो. तुम्हीही खेळातला गॉगल तयार करू शकता. कसे ते पहा...

**साहित्य** : १३ इंच रूंद कार्डस्टॉक पेपर, पारदर्शक प्लास्टिक किंवा रंगीबेरंगी पारदर्शक कागद, सेलोटेप, कात्री, गम आणि मार्कर किंवा स्केच पेन इत्यादी.



**करून तर पहा**

**कृती** : मोजपट्टीने चेहऱ्याचा आकार मोजून घ्या. आता आपल्याला कार्डस्टॉप पेपरवर चष्म्याचं डिझाइन काढायचं आहे. हे डिझाइन काढताना या मापांचा आधार घ्या. गॉगल तुमच्या चेहऱ्यावर नीट बसायला हवा. गॉगलचा आकार काढल्यानंतर तो कापून घ्या. कडा दुमडून घ्या. आता हा चष्मा छान सजवा. त्यावर चित्र काढता येतील. मणी, मोती चिकटवता येतील. त्यासाठी कल्पनाशक्ती लढवा. मधल्या भागात पारदर्शक प्लास्टिक चिकटवायचं आहे. यासाठी सेलोटेप किंवा गमचा वापर करा. या कागदी चष्म्यांना तुम्ही वेगवेगळे आकारही देऊ शकता. आता हे चष्मे घालून फिरा.

**ठिपके जुळवा**



**जिज्ञासा**

## ओळखा पाहू...

१) २०१८ हे वर्ष केंद्राने कोणतं वर्ष म्हणून साजरं करायचं केलं?
२) 'द सॉल्ट' ही विमान कंपनी कोणत्या प्रकारच्या विमानांची निर्मिती करते?
३) चाबहार बंदर कुठे आहे?
४) एफएसबी काय आहे?
५) इंडियन मिलिट्री अकादमी कुठे आहे?
६) विजय दिन म्हणून कोणता दिवस साजरा केला जातो?
७) सीमा सुरक्षा दलाचे मुख्यालय कुठे आहे?
८) इस्रो सॅटेलाईट सेंटर कुठे आहे?
९) ग्रेट रेड स्पॉट कोणत्या ग्रहावर आहे?
१०) आयसी ड्रोनची निर्मिती कोणी केली आहे?

उत्तर : १) क्रीडा वर्ष २) टायफून ३) इराण ४) रशियन गुप्तहेर संस्था ५) देहरादून ६) १६ डिसेंबर ७) नवी दिल्ली ८) बंगळूरू ९) गुरू १०) फ्रान्स

**दोस्त हे मस्त**

### जॅपनिज मॅकेक्यू

जॅपनिज मॅकेक्यू या प्रकारच्या माकडांना स्नो मंकी असं म्हटलं जातं. या प्रजातीची माकडं मिळेल ते खातात. माकडांच्या इतर प्रजातींपेक्षा स्नो मंकी लवकर माणसाळतात. पानं, फळं आणि छोटे किडे हे त्यांचं आवडतं अन्न आहे. या माकडांना स्वच्छता प्रिय असते. खाण्याआधी ती अन्न धुवून घेतात.



**खादाडी**

### आगळीवेगळी स्मूदी

बदाम आणि गाजराचा वापर करून तुम्ही मस्त स्मूदी बनवू शकता. यासाठी आठ ते दहा बदाम भिजवून ठेवा. सोलून घ्या. अर्धी वाटी चिरलेलं गाजर, अर्धी वाटी द्राक्ष, अर्धा कप दूध, साखर किंवा खजूर हे साहित्य घ्या. हे सगळे पदार्थ मिक्सर किंवा ज्यूसरच्या भांड्यात घाला. चांगलं ब्लेंड करून घ्या. फ्रीजमध्ये गार करायला ठेवा किंवा लगेच प्या. बदाम आणि गाजराची ही स्मूदी खूप हेल्दी आहे.



**लाईफस्टाईल**

### 'पोझिशन' चुकतीये?

वागण्या-बोलण्यावरून आपल्याबद्दल विशिष्ट मत तयार केलं जातं. बसण्याच्या पद्धतीवरूनही आपण नेमके कसे आहोत हे जाणून घेतलं जातं. पाय सरळ ठेऊन पावलं तिरकी करून बसणारे लोक आपल्या समस्या इतरांवर ढकलतात. ते विचार करून बोलत नाहीत. पायावर पाय टाकून बसणारे लोक कल्पक असतात. त्यांचे विचार सकारात्मक असतात. पाय सरळ आणि जोडलेल्या टाचा अशा पद्धतीने बसणाऱ्या लोकांना आरामदायी जीवनशैली भावते. मग दोस्तांनो, तुम्ही कशा पद्धतीने बसता हे जाणून घ्या आणि स्वभाव कसा आहे हे ताडा.



**योगा टाईम**

### करुन पहा उत्तानासन

बरेचदा तुम्हा मुलांवरही बराच ताण येतो. तो कमी करण्यासाठी हे योगासन उपयुक्त ठरू शकेल. उत्तानासन केल्याने ताण कमी होऊ शकतो. या आसनामुळे पचनशक्ती सुधारते. पोटाच्या विकारांपासून रक्षण होतं. पाठ आणि कंबरेचं दुखणंही कमी होऊ शकतं. पण हे आसन रिकाम्या पोटी करायला हवं. तसंच योगासनं करण्याआधी किंवा केल्यानंतर लगेचच जास्त पाणी पिऊ नये.



# निवडक

## आराध्याला कराटे स्पर्धेत सुवर्णपदक



**मुंबई :** महाराष्ट्राच्या आराध्या पांडेयने गुजरातमधील वडोदरा इथे झालेल्या २१ व्या आंतरराष्ट्रीय कराटे अजिंक्यपद स्पर्धेत आपल्या प्रभावी कामगिरीने भारताचे नाव उंचावले आहे. वाडो-काई इंडियाद्वारे आयोजित या स्पर्धेत अनेक देशांतील कराटे खेळाडूंनी भाग घेतला. यास्पर्धेत तिने सुवर्ण आणि रौप्यपदक जिंकले. कुमितेमध्ये आराध्याने नेपाळच्या खेळाडूला हरवून सुवर्णपदक जिंकले, तर काटामध्ये, तिने श्रीलंकेच्या खेळाडूला हरवून कांस्यपदक जिंकले. दोन्ही स्पर्धांमध्ये तिचे तंत्र, आत्मविश्वास आणि शिस्तीचे खूप कौतुक झाले. फोरमोस्ट फायटर कराटे अकादमीच्या इतर विद्यार्थ्यांनीही विविध श्रेणींमध्ये भारतासाठी पदके जिंकली. प्रशिक्षक पुरु रावल खेळाडूंच्या कामगिरीवर अत्यंत खूश आहेत. कठोर परिश्रम आणि योग्य मार्गदर्शनाने ही मुले भविष्यात आणखी मोठे आंतरराष्ट्रीय यश मिळवू शकतात असे त्यांनी सांगितले.

## खेलो इंडियात सिद्धीला कांस्यपदक



**चिपळूण :** राजस्थान येथे २४ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या दरम्यान चालू असलेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेममध्ये सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे नेतृत्व करत रिकव्ह या धनुष्य प्रकारात सावर्डे येथे राहणाऱ्या सिद्धी साळुंखेला सांघिक कांस्यपदक मिळाले. या स्पर्धेसाठी संपूर्ण भारतातून २० विद्यापीठाचे संघ आले होते. खेलो इंडिया युनिव्हर्सिटी खेळामध्ये धनुर्विद्या खेळात पदक मिळवणारी रत्नागिरी जिल्ह्यातील सिद्धी ही एकमेव खेळाडू आहे. यावर्षी भटिंडा पंजाब येथे झालेल्या विद्यापीठ स्पर्धेत ती सहभागी झाली होती. तसेच अहिल्यानगर येथे झालेल्या वरिष्ठ राज्यस्तरीय स्पर्धेत तिने सुवर्णपदक मिळवले. त्याचबरोबर राष्ट्रीय आणि राज्यस्तरावर एकूण ५३ पदके आजपर्यंत मिळवली आहेत. आता ती पुण्यातील ओंकार घाडगे यांच्या अकॅडमीमध्ये सराव करत आहे. दहा वर्षे ओंकार घाडगे यांचे मार्गदर्शन आणि प्रशिक्षण तिला मिळालेले आहे.

## वेदाची इंडियन बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद

**रत्नागिरी :** बाळाचे पाय पाळण्यात दिसतात. मात्र रत्नागिरीतील दीड वर्षाची चिमुरडी पाय पाळण्यात नाही तर पाण्यात पोहताना दिसत आहे. रत्नागिरीची वेदा सरफरे ही दीड वर्षाची मुलगी पाण्यात सराईतपणे पोहत असल्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर जोरदार गाजत आहे.



या चिमुरडीचे पाय नवव्या महिन्यातच पाण्यात दिसले तेही पोहताना. नऊ महिन्याची असल्यापासून रत्नागिरीच्या शासकीय जलतरण तलावात पोहायला सुरूवात करणाऱ्या वेदा परेश सरफरे हिचा प्रवास १ वर्ष ९ महिन्याची असून 'इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड' पर्यंत पोहचला आहे. १०० मीटरचे अंतर केवळ १०मिनिट ८ सेंकदात पूर्ण केले. तिच्या या कामगिरीबाबत वेदा भारतातील सर्वात लहान जलतरण पटू म्हणून तिचे कौतुक करण्यात येत आहे.

## सबाची बॅडमिंटन स्पर्धेसाठी निवड

**वेंगुर्ले :** बॅ. बाळासाहेब खर्डेकर महाविद्यालयाची बॅडमिंटन खेळाडू सबा शेख (द्वितीय वर्ष, विज्ञान) हिची महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ (अश्वमेध) बॅडमिंटन स्पर्धेसाठी मुंबई विद्यापीठ संघात निवड झाली. ही स्पर्धा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे होणार आहे. यापूर्वी सबाने कोकण झोन-सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड बॅडमिंटन संघाचे नेतृत्व करत उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. तिच्या सातत्यपूर्ण उत्कृष्ट खेळामुळे तिची अश्वमेधसारख्या प्रतिष्ठित राज्यस्तरीय विद्यापीठीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. अश्वमेधमधील कामगिरीच्या आधारे तिला पुढील ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेत संधी मिळू शकते, असे क्रीडा विभागातून सांगण्यात आले. सबाला शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्रा. जयकुमार देसाई, दौलतराव देसाई, मंजिरी मोरे-देसाई, प्रशासन अधिकारी पृथ्वी मोरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनराज गोस्वामी, प्रा. जे. वाय. नाईक, डॉ. के. आर. कांबळे, संस्था प्रतिनिधी सुरेंद्र चव्हाण, प्रा. संजय चमणकर, प्रा. सुदाम माने, सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत रत्नागिरीचे संघ सहभागी

**रत्नागिरी :** अहिल्यानगर येथे सुरू असलेल्या ५१ व्या कुमार व मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेत रत्नागिरी जिल्ह्याचे दोन्ही खो-खो संघ सहभागी झाले आहेत. त्यात कुमार गटाच्या कर्णधारपदी आशिष बालडे तर मुलींच्या संघाची कर्णधार म्हणून दिव्या पालये हिची निवड झाली आहे. रत्नागिरी जिल्हा खो-खो असोसिएशनच्यावतीने ओणी हायस्कूल, राजापूर येथे कुमार व मुली जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत मुलांच्या गटात १६ तर मुलींच्या गटात ९ संघ सहभागी झाले होते. मुलींच्या गटात आर्यन स्पोर्ट्स अ आणि ब संघात अंतिम सामना झाला. आर्यन अ संघाने विजेतेपद पटकावले. कुमार संघ : विराज निवते, सार्थक कदम , आर्यन बालदे, आशिष बालदे, पार्थ बुदर, अथर्व गराटे , शुभम सुवरे, साहिश भलबले, ओमकार बेहरे, मयूर मासये, आराध्य मटकर, अरमान वळंजू, निखिल माळी, राज पळसमकर, विनायक पालये, लांजा. प्रशिक्षक - सिद्धांत कानडे, किरण भोसले. मुली संघ : दिव्या पालये (कर्णधार), वैष्णवी फुटक, रिद्धी चव्हाण, सान्वी सुर्वे, मृण्मयी नागवेकर, अस्मी कर्लेकर, सायली कर्लेकर, श्रावणी सनगरे, आर्या डोर्लेकर, तन्वी खानविलकर, साक्षी लिंगायत, स्वरांजली कर्लेकर, दिव्या सनगले, दीक्षा मांडवकर, दीक्षा गोतावडे. प्रशिक्षक - ऐश्वर्या सावंत, अपेक्षा सुतार यांचा समावेश आहे.

# ऑक्शनच्या आधी बदलले नियम

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

**आयपीएल लिलाव १६ डिसेंबरला होणार आहे. या लिलावामध्ये सर्वात जास्त पर्स ही केकेआरकडे आहे. त्यानंतर सीएसकेने अनेक खेळाडूंना सोडले आहे. बीसीसीआय आता १६ डिसेंबर रोजी अबू धाबी येथे होणाऱ्या आयपीएल २०२६ च्या मिनी लिलावाची तयारी करत आहे. आगामी लिलावापूर्वी, बीसीसीआयने परदेशी खेळाडूंसाठी एक नवीन नियम लागू केला आहे, ज्यामुळे मिनी लिलावात विकल्या जाणाऱ्या परदेशी खेळाडूंना मोठा धक्का बसला आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आता मिनी लिलावात मोठी कमाई करणाऱ्या खेळाडूंचे खिसे कापले आहेत.**



- **परदेशी खेळाडूंच्या खिशाला बसणार फटका**
- **काही मेगा लिलावात भाग घेणे टाळतात**

काही परदेशी खेळाडू जाणूनबुजून मेगा लिलावात भाग घेणे टाळतात. त्याऐवजी, ते मिनी लिलाव-ात त्यांची नावे सादर करतात. खरं तर, फ्रँचायझी मेगा लिलावात त्यांचे संघ तयार करण्याचा प्रयत्न करतात, त्यामुळे परदेशी खेळाडूंवर कमी पैसे खर्च होतात. दरम्यान, फ्रँचायझी त्यांच्या संघातील पोकळी भरून काढण्यासाठी मिनी लिलावात भाग घेतात. परिणामी, फ्रँचायझी स्टार परदेशी खेळाडूंवर करोडो रुपये खर्च करतात. सर्व फ्रँचायझींनी याबद्दल बीसीसीआयकडे तक्रार केली आहे.

आता, बीसीसीआयने असा नियम स्थापित केला आहे की परदेशी खेळाडू लघु-लिलावात १८ कोटी (अंदाजे १.८ अब्ज) पेक्षा जास्त कमवू शकत नाहीत. जरी ते २५०-३०० दशलक्ष (अंदाजे २.५ अब्ज किंवा ३.० अब्ज) मध्ये विकले गेले तरी त्यांना फक्त १८ कोटी (अंदाजे १.८ अब्ज) पगार मिळेल. उर्वरित निधी बीसीसीआय स्थानिक खेळाडूंच्या कल्याणासाठी राखून ठेवेल. या नियमामुळे, बहुतेक परदेशी खेळाडू आता १८ कोटी (अंदाजे १.८ अब्ज) पेक्षा जास्त कमवू शकणार नाहीत.

आयपीएल २०२६ च्या मिनी लिलावात कॅमेरॉन ग्रीनला २५ ते ३० कोटी रुपयांची बोली लागू शकते, परंतु त्याला फक्त १८ कोटी रुपये मिळण्याची शक्यता आहे. या मिनी लिलावात कॅमेरॉन ग्रीन आणि लियाम लिव्हिंगस्टोन हे दोनच खेळाडू मोठ्या प्रमाणात पैसे कमवण्याची शक्यता आहे.

शाहरुख खानचा कोलकाता नाईट रायडर्स सर्वात मोठ्या रकमेसह मिनी लिलावात उतरत आहे, तर महेंद्रसिंग धोनीचा चेन्नई सुपर किंग्ज दुसऱ्या स्थानावर आहे. दोन्ही संघांनी ज्या खेळाडूचा पाठलाग केला आहे त्याचे नक्कीच नशीब बदलणार आहे.

# उरणच्या मोहितला टेक्नो २९३ स्पर्धेत रौप्यपदक

**| उरण | प्रतिनिधी |**



जॉम्टियन बीच दरम्यान पटाया, थायलंड येथे टेक्नो २९३ आशियाई अजिंक्यपद स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील उरण येथील मोहितने अप्रतिम कौशल्य आणि जिद्दीच्या जोरावर रौप्यपदकाची कमाई केली. त्याच्या या कामगिरीमुळे देशासह रायगड व उरणच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला. या स्पर्धेत भारताचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर उरणच्या मोहित म्हात्रे कोरल्याने त्याचे सर्वस्तरातून कौतूक करण्यात येत आहे. वयाच्या केवळ १३ वर्षांमध्ये मोहितनी विंडसर्फिंग क्रीडा प्रकारात कसून मेहनत, करत स्पर्धात्मकता दाखवत भारताचा तिरंगा अभिमानाने फडकावला आहे. सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या सिंगापूर नॅशनल चॅम्पियनशिपमध्ये रौप्यपदक जिंकल्यानंतर, मोहितने टेक्नो २९३ एशियन चॅम्पियनशिपमध्ये प्रभावी कामगिरी केली होती. २५३० नॉट्स कठीण आणि धोकादायक वाऱ्याचा सामना करताना मोहितने अचूक तंत्र आणि प्रचंड मानसिक स्थैर्य दाखवले होते.

अंडर-१५ गटातून भारताचे प्रतिनिधित्व करताना त्याने १५ शर्यती यशस्वीरीत्या पूर्ण केल्या आहेत. त्यांनी आठ शर्यतीत प्रथम क्रमांक तीन शर्यतीत द्वितीय क्रमांक पटकावला. अंतिम दिवशीही त्याने उत्कृष्ट कामगिरी कायम ठेवत १३ आणि १४ व्या शर्यतीत पहिला आणि दुसरा क्रमांक पटकावला. मुख्य प्रशिक्षक संदीप म्हात्रे, प्रशिक्षक चेन्हाई यांचे त्याला सततच्या मार्गदर्शनासाठी, उच्च उद्दिष्टांच्या दिशेने प्रेरित केल्याबद्दल मनापासून आभार मानले.

# विराट-रोहित खेळणार २०२७ चा 'वर्ल्ड कप'

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**



रोहित व विराट यांनी त्यांच्या खेळीतून निवृत्तीच्या चर्चांवर टोलेबाजी केली आहे. विराटने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सलग दोन वन डे सामन्यांत शतक झळकावले आणि त्यामुळे तिसऱ्या सामन्याच्या तिकिटांसाठी प्रेक्षकांची झुंबड उडत आहे. विराट व रोहित यांना २०२७ चा वर्ल्ड कप खेळायचा आहे, परंतु मुख्य प्रशिक्षक व निवड समितीला युवा खेळाडूंसोबत पुढे जायच आहे. रोहित व विराटचे वय त्यांना खटकत आहे, परंतु त्यांचा फॉर्म जबरदस्त सुरू आहे. त्यामुळे ते दोन वर्षानंतर होणारा वर्ल्ड कप खेळतील, असा चाहत्यांना विश्वास आहे. भारत आत आफ्रिकेविरुद्ध वन डे मालिका खेळत आहे. त्यानंतर भारतीय संघाला न्यूझीलंड, अफगाणिस्तान, इंग्लंड, वेस्ट इंडिज, श्रीलंका या संघांचा सामना करावा लागणार आहे. या मालिकेतील कामगिरी रोहित व विराटचे भविष्य ठरवणारी असणार आहे.

### खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धा २०२५

# महाराष्ट्राचा कुस्तीगीर अजयला एकमेव पदक

**| जयपूर | वृत्तसंस्था |**



खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेतील कुस्ती प्रकारात महाराष्ट्राने निराशाजनक कामगिरी प्रदर्शन घडवले. पुरूष गटात मजुरचा मुलगा असणाऱ्या अजय निंबाळकरने ग्रीको रोमन ५५ किलो गटात रौप्य तर सृष्टी भोसले व समृध्दी घोरपडे यांनी कांस्य पदकाची कमाई केली आहे. पुरूषांच्या गटात पदक विजेता ठरलेला अजय हा महाराष्ट्राचा एकमेव कुस्तीगीर ठरला आहे.

भरतपूर येथे संपलेल्या कुस्ती स्पर्धेत ग्रीको रोमन ५५ किलो गटात अजय निंबाळकरने अंतिम फेरीत मजल मारून चमकदार कामगिरीचे प्रदर्शन घडवले. आक्रमक खेळ करीत सलामीच्या फेरीत जळगावच्या धनराज सोनवणेवर ८-० केली. दुसऱ्या फेरीत चौधरी देवी लाल विद्यापीठाच्या अभिषेकला ८-० केले. उपांत्य फेरीत अजमेर विद्यापीठाच्या दिपककुमारला १३-५ हरवून अंतिम फेरीत मजल मारली होती. सुवर्णपदकाच्या लढतीत गुणांवर कुरुक्षेत्र विद्यापीठाच्या मनीषकुमारने ८-५ गुणांवर अजय निंबाळकरला पराभूत केले.

इंदापूरमधील श्री छत्रपती कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिकणाऱ्या अजयचे वडिल साहेबराव निंबाळकर हे मजुर आहेत. त्याचे आई, वडिल, भाऊ व आजी हे मारीआई देवींचे काम करत असतात. पंटू पवार, किरण शितोळे यांनी खुराकाला मदत केल्याने व तालमीत मोफत सुविधांच्या जोरावर तो राष्ट्रीय कुस्तीपटू घडला आहे. काका पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तो पुण्यात आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुलात सराव करीत असतो.

महिलांच्या कुस्ती लढतीत शिवाजी विद्यापीठाच्या मुली चमकल्या. फ्री स्टाइल कुस्तीच्या ५३ किलो वजन गटात समृद्धी घोरपडेने ६५ किलो वजन गटांत सृष्टी भोसलेने कांस्यपदकाची कमाई केली. कोल्हापूरातील कागल तालुक्यातील सृष्टी भोसलेने कांस्यपदकाच्या लढतीत पंजाब विद्यापीठाच्या खेळाडूवर मात केली. सृष्टी शाहू कारखान्याचे मानधनधारक खेळाडू आहे.

खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पदकतक्यात ६ व्या स्थानावर आहे. ६ सुवर्ण, ११ रौप्य व ९ कांस्य अशी २६ पदकांची कमाई पुणे विद्यापीठाने केली आहे. शिवाजी विद्यापीठाने २ सुवर्ण, २ रौप्य व ७ कांस्यपदके पटकावून १४ व्या स्थानावर आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ५ तर ५५ व्या तर मुंबई विद्यापीठ ४ पदकांसह ५६ व्या स्थानावर आहेत.

# १०० मीटर शर्यतीत महाराष्ट्राची हुकुमत

**| जयपूर | वृत्तसंस्था |**



गायत्री, रिंकीला रौप्यपदक

खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धेत महाराष्ट्राची विजयी घोडदौड थलेटिक्स ट्रॅकवरही झळकली. लक्षवेधी १०० मीटर धावणे शर्यतीत सुवर्ण, रौप्यसह कांस्यपदकावर महाराष्ट्राच्या खेळाडूंनी नाव कोरले. २० मीटर चालणे शर्यतीत गायत्री चौधरीने तर ५००० मीटर धावणे शर्यतीत रिंकी पवार विजयी ठरली.

सवाई मानसिंग क्रीडा संकुलातील थलेटिक्स ट्रॅकवर वेगवान धावपटू होण्याचा मान शिवाजी विद्यापीठाच्या ऋषी प्रताप देसाईने संपादन केला. १०.५३ सेकंदाची वेळ नोंदवून कोल्हापूरच्या ऋषीने बाजी मारली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या लौकिक मेलगे १०.५९ सेकंदाची वेळ देत रौप्यपदकाचा मानकार ठरला.

मुंबईच्या सौमया विद्याविहार विद्यापीठाच्या जय भोईरने १०.८६ सेकंदात शर्यत पूर्ण करीत कांस्यपदकावर नाव कोरले.

शासनाच्या संभाजी नगरमधील क्रीडा प्रबोधिनीत सराव करणाऱ्या ऋषी प्रताप देसाईने पर्दापणातच पदकाचा करिश्मा घडविला आहे. जागतिक विद्यापीठ स्पर्धेत पदक जिंकण्याचे ध्येय असणारा ऋषीचे वडिल शेतकरी आहेत. रौप्यपदक विजेता लौकिकचे वडिल अनंत मेलगे हे रिक्षा चालक आहेत.

पुण्यातील क्रीडा प्रबोधिनीत अरविंद चव्हाण यांचे मार्गदर्शन त्याला मिळत आहे. मुंबईत सराव करणारा जय भोईरचे खेलो इंडिया स्पर्धेतील हे पहिलेच पदक आहे. ५००० मीटर कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रिंकी पवाराने खेलो पदकाची हॅटट्रिक पूर्ण केली.

रवींद्रनाथ टागोर विद्यापीठाच्या बुशरा खानने सुवर्णपदक पटकावले. रिंकी पवाराने उत्तरप्रदेश स्पर्धेत कांस्य, गतवर्षी आसाम स्पर्धेत रौप्यपदक पटकवले होते. जयपूरमध्ये १८:२०.५२ मि. वेळ नोंदवून तिने सलग दुसऱ्या वर्षी रूपेरी कामगिरीचे प्रदर्शन घडवले. मूळची नंदूरबार येथील रिंकी नाशिकमध्ये सराव करीत असून विश्व विद्यापीठ स्पर्धेत तीने देशाचे प्रतिनिधित्व केले आहे.

# केरळचा मुंबईवर विजय

**मुंबई :** संजू सॅमसनच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या केरळ संघाने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी टी-२० स्पर्धेत मुंबईवर १५ धावांनी विजय मिळवला. केरळने सलग तीन पर्वात मुंबईवर विजयाची नोंद केली. केएस आसिफने या सामन्यात २४ धावांत ५ विकेट्स घेतल्या आणि मुंबईच्या जबड्यातून विजय खेचून आणला. सर्फराज खानचे अर्धशतक व्यर्थ गेले. केरळने प्रथम फलंदाजी करताना ५ बाद १७८ धावा केल्या. संजूने २८ चेंडूंत ८ चौकार व १ षटकारासह ४६ धावांची खेळी केली. विष्णू विनोदने नाबाद ४३ धावा केल्या, तर शराफुद्दीनने १५ चेंडूंत ५ चौकार व २ षटकारासह नाबाद ३५ धावांची खेळी केली. त्याच्या फटकेबाजीमुळे केरळला १७८ धावांपर्यंत पोहोचता आले.

# कटकमध्ये टी-२० तिकिटांसाठी रांगा

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यामध्ये सध्या एकदिवसीय मालिका खेळवली जात आहे. या मालिकेचा आता शेवटचा सामना खेळवला जाणार आहे त्यानंतर सुर्याकुमार यादवच्या नेतृत्वाखाली पाच सामन्यांची टी-२० मालिका रंगणार आहे. यामध्ये शुभमन गिल आणि हार्दिक पांड्या यांचे संघामध्ये पुनरागमन होणार आहे. २०२६ च्या विश्वचषकाआधी ही मालिका भारतीय संघासाठी महत्वाची असणार आहे. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील टी-२० मालिका ९ डिसेंबरपासून सुरू होत आहे. या मालिकेसाठी चाहते खूप उत्सुक आहेत.

हार्दिक पंड्या मैदानात परतणार आहे आणि सर्वांच्या नजरा कर्णधार सूर्यावर असतील. पहिल्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्याच्या तिकिटांसाठी जोरदार स्पर्धा सुरू आहे. सूर्या आणि हार्दिकला खेळताना पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत. अलिकडेच एक व्हिडिओ समोर आला आहे ज्यामध्ये तिकिटांसाठी गर्दी दिसून येत आहे.

टी-२० मालिकेसाठी संघ

सूर्यकुमार यादव (कर्णधार), शुभमन गिल (उपकर्णधार), अभिषेक शर्मा, टिळक वर्मा, हार्दिक पंड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल, जितेश शर्मा (यष्टीरक्षक), संजू सॅमसन (यष्टीरक्षक), जसप्रीत बुमराह, वरुण चक्रवर्ती, अर्शदीप सनद, हरदीप सनद, यष्टिरक्षक, यष्टिरक्षक, यष्टिरक्षक, सुर्यकुमार यादव.

### रत्नागीरी-रायगड जिल्ह्यातील २५ शाळेतील विद्यार्थ्यांचा सहभाग

# प्रकल्पस्तरीय क्रिडा स्पर्धेत पिंगळस आश्रमशाळा विजयी

**| कर्जत | प्रतिनिधी |**



कर्जत तालुका हा बहुल आदिवासी भाग असून, अनेक आदिवासी भागातील विद्यार्थी हे शासकीय आश्रमशाळेत शिक्षण घेत आहेत. याच आदिवासी विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी पेण प्रकल्प आदिवासी विकास विभाग अतर्गत शासकीय माध्यमिक व उच्च माध्यामिक आश्रमशाळा ही पिंगळस येथे कार्यरत आहे. या आश्रमशाळेमध्ये चौथ्या वर्षीचे प्रकल्पस्तरीय क्रिडा स्पर्धांचे २०२५-२६ चे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धांमध्ये रत्नागिरी, रायगड जिह्यातील २४ शाळामधील काही शासकीय तर काही आनुदानीत आश्रमशाळेतील एकूण १२३५ विद्यार्थी, विद्यार्थांनी खेळात सहभाग घेतला होता. या स्पर्धांमधील कबड्डी, खो-खो, हॉलीबॉल, रनिंग, हॅन्डबॉल, गोळाफेक, रिले, लांबउडी यासारख्या स्पर्धा जिंकून रायगड, रत्नागिरी जिल्ह्यातील शाळामधून अव्वल गुण मिळवून प्रकल्पस्तरीय क्रिडा स्पर्धत तिसऱ्यांदा कर्जत तालुक्यातील पिंगळस शासकीय आश्रम शाळेच्या विद्यार्थी- विद्यार्थिनींच्या उत्कृष्ट खेळातील कामगिरीच्या जोरावर चॉम्पियन ट्रॉफिची मानकरी ठरली आहे.

प्रकल्पस्तरीय क्रिडा स्पर्धाचे उद्घाटन अपर आयुक्त आदिवासी विभाग ठाणे गोपीचंद सुंदराबाई मुरलीधर कदम, प्रकल्प अधिकारी ए. आ. वि. प्रकल्प पेण तेजस्विनी मंगल रघुनाथ गलांडे, प्रमुख उपस्थिती उपजिल्हाधिकारी ललिता बाबर-भोसले, यांच्यासह आयोजक मुख्याध्यापक तथा क्रिडासंचालक प्रकल्पस्तरीय क्रिडास्पर्धा पेण रमेश द्रौपदी साहेबराव चव्हाण यांच्या हस्ते दिपप्रज्वलीत करून छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आदिवासी क्रांतीकारक बिरसा मुंडा, सरस्वती प्रतिमेला हार अर्पण करून क्रीडा स्पर्धाना सुरुवात करण्यात आली.

शासकिय माध्यमिक उच्च माध्यामिक आश्रमशाळा पिंगळस येथे चौथा वर्षीचे स्पर्धचे नियोजन पेण प्रकल्पस्तरीय रायगड, रत्नागीरी जिल्ह्यातील एकूण २४ शाळेतील एकूण १२३५ विद्यार्थी, विद्यार्थिनी सहभाग घेऊन आपले क्रीडा कौशल्य आपआपल्या खेळामधून प्रदर्शित केले आहे.

या स्पर्धत कबड्डी, खो-खो, हॅलीबॉल, रनिंग, हॅन्डबॉल, लांबउडी, या स्पर्धा तीन दिवासाच्या खेळवल्या गेल्या. या स्पर्धाना दि. २९ नोव्हेबर पासून सुरु करण्यात आली असुन, त्या आलेल्या क्रीडा स्पर्धांचे (दि. १) डिंसेबर रोजी बक्षिस वितरण करून तीन दिवशीय प्रकल्पस्तरीय क्रिडा स्पर्धा खेळवल्या गेल्या आहे. शेवटच्या दिवशी बक्षिस वितरण, परितोषिक घेऊन सर्व शाळा त्याच दिवशी आपल्या शाळेवर परतीच्या प्रवासानी निघून गेल्या. यावेळी पेण प्रकल्प सहय्याक अधिकारी, तालुक्यातील आदिवासी समाज संघटना कर्जत, आदिवासी महादेव कोळी समाज संघटना पदाधिकारी, सर्व शाळेचे मुख्याध्यापक, अध्यक्षक, शिक्षकवृद, कर्मचारी उपस्थित होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)